
# ... वरवर्णिनी.



862
D.V.POTDAR
S P COLLEGE
D02277
862
Var
5722
368
2277

कालिंदी—चला तुम्ही, मी आतां मुळीं बोलतच नाहीं.

नमो भगवते वासुदेवाय ।

# संगीत वरवर्णिनी

अथवा

## सती सावित्री.

हें नाटक

श्रीयुत भार्गवराम विठ्ठल वरेरकर,

संगीत कुंजविहारी, संजीवनी, सरस्वती,

कृष्ण-कामिनी, प्रेमाचा खेळ

इत्यादि नाटकांचे कर्ते

यांनीं लिहिलें.

प्रथमावृत्ति.

१९१४

[ या नाटकासंबंधें सर्व हक्क ग्रंथकारानें आपल्याकडे ठेविले आहेत. ]

किंमत १० आणे.

मुंबईः—खेतवाडी ब्यॉकरोड घर नं. १–२ व ३ येथें ' तत्त्वविवेचक '
छापखान्यांत रा. भिवाजी हरी शिंदे यांनीं छापिलें तें रा. निळकंठ
भाऊ गांधी यांनीं केळेवाडी मुंबई नं. ४ येथें वैश्य मासिका-
साठीं प्रसिद्ध केलें.

To

MY ESTEEMED FRIEND

Dr. V. G. Nadgir M. S.,

IN APPRECIATION OF HIS QUALITIES

OF

HEAD & HEART

**The balm for many a diseased !**

**The help for many a needy ! !**

**The light for many an aspirant ! ! !**

# प्रकाशकाचे दोन शब्द.

सती सावित्रीचें निर्मल चरित्र ज्याला माहीत नाहीं अशी व्यक्ति निदान या महाराष्ट्रांत तरी सांपडणें कठीण. लहानापासून थोरापर्यंत, सज्ञानापासून अज्ञानापर्यंत, सुशिक्षितांपासून अशिक्षितांपर्यंत, सर्वांना सती सावित्रीचें चरित्र आदरणीय असेंच आहे. स्त्रियांच्या दिव्य सतीत्वाचा आदर्श, नीतितत्वबोधाचें भांडार अशा या चरित्राला ' कुंजविहारी ' कर्ते श्रीयुत भार्गव विठ्ठल वरेरकर यांनीं आपल्या कल्पनाशक्तीनें विशेष नटवून त्याची हीं रंगावृत्ति फारच चित्ताकर्षक केली आहे.

सावित्रीच्या घाबरलेल्या मनास स्वकर्तव्याबद्दल आत्मविश्वास उत्पन्न करणारी कालिंदीची वाणी ऐकून स्त्रियांच्या अंगीं पातिव्रत्य सद्गुणानें केवढी दिव्यशक्ति प्राप्त होते या गोष्टीची साक्ष पटते. अश्विनी व तुंबरु यांचा मार्मिक विनोद सहृदय वाचकांच्या मनोवृत्ति उल्हसित करतो. स्वकुलधर्म-संरक्षणासाठीं प्रत्यक्ष कन्येचाही मोह सोडणाऱ्या आईबापांची धर्मश्रद्धा पाहून साभिमान कौतुक वाटतें. शिवाय शिष्टप्रणीत स्वयंवराच्या शुद्ध चालीचें व प्रौढ विवाहमंडणाचें उद्घाटणही फारच मार्मिक तऱ्हेनें झालें असल्यामुळें तर हें नाटक चित्ताल्हादक व बोधप्रद असेंच वाटतें.

केव्हां केव्हां असें घडून येतें कीं, अत्यंत परिश्रम करूनही न घडून येणारी सुधारणा दुसऱ्या एकाद्या अनिष्ट प्रकाराच्या प्राबल्यानें सहजीं घडून येते. इतकी वर्षेपर्यंत प्रौढ-विवाहाविषयीं होणारी चळवळ जें कार्य करूं शकलें नाहीं तेंच कार्य वाढत्या हुंड्याच्या अनिष्ट चालीनें घडवून आणलें आहे. अशा वेळीं धर्मभीरुपणाचा लटकाच गैरसमज करून घेणाऱ्या कांहीं दुबळ्या मनाच्या लोकांस पडत असलेला पेंच सती सावित्रीच्या चरित्रानें उलगडून टाकणें शक्य आहे. प्रौढ-विवाहाच्या समर्थनार्थ अशीं पुष्कळ पौराणिक चरित्रें दाखवितां येतील खरीं, पण सावित्रीचें चरित्र या अशा सर्व चरित्रांत श्रेष्ठतम आहे यांत शंका नाहीं.

आजपर्यंत याच चरित्रावर अनेक नाटकें झालीं आहेत पण प्रस्तुत नाटक त्या सर्वांहून भिन्न असल्याचें दिसून येईल. नाटकाला नसता रंग ओढून आणण्यासाठीं पौराणिक चरित्रांत कोणताही फरक न केल्यामुळें भाविक वाचकांच्या मनावर यांत अकल्पित आघात होत नाहीं. प्रौढ-विवाहाच्या मंडणार्थ या नाट-

कांत यापेक्षां जास्त चर्चा करतां येणें अशक्य होतें असें नाहीं. तरीही अधिक मात्रेनें उपदेशाचें चऱ्हाट वळून प्रतिपाद्य विषय रंगभूमीवर कंटाळवाणा होऊं देणेंही बरें नव्हतें. दुसरें, नाट्य-विनोद संगीत कंपनीचे उभय मालक यांनीं ज्यावेळीं हें नाटक लिहून द्यावयाचा रा. वरेरकरांस आग्रह केला, त्यावेळीं ते कौटुंबिक प्रसंगांत होते. वटपौर्णिमेला तर हें नाटक रंगभूमीवर आणणें जरूर होतें व इकडे ग्रंथकारावर पत्नीवियोगासारखी भयंकर आपत्ति येऊन पडली होती! अशावेळीं अशौच-कालांतील नुसत्या पांच सहा दिवसांच्या अवधींत लिहिलेल्या नाटकांत क्वचित् कांहीं वैगुण्य राहिलें असल्यास सहृदय वाचकांना तें क्षम्यच वाटलें पाहिजे

या नाटकाच्या प्रकाशनासंबंधें आणखी एक अकल्पित योगायोग आहे, त्याचा उल्लेख करणें अप्रस्तुत होणार नाहीं. स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी एके काळीं करीत असलेलीं 'कुंजविहारी व संजीवनी' हीं नाटकें अगर नाट्यविनोद संगीत नाटक मंडळी हल्लीं करीत असलेलें 'सरस्वती' नाटक इत्यादि प्रस्तुत ग्रंथकाराचीं बरींच नाटकें यापूर्वीच लोकप्रिय झालीं असून, वरवर्णिनी ही त्यांनीं या सर्व नाटकांत शेवटीं लिहिलेली कृति आहे. असें असूनही कुंजविहारीसारखी नाटकें कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें पुस्तकरूपानें प्रसिद्ध होण्याचें मागें पडून, हें सर्वांत मागाहून लिहिलेलें नाटक सर्वांच्या आधीं प्रकाशित होत आहे, हा योगायोग अकल्पित तर खराच. दुसरी गोष्ट-वैश्य मासिकाला आजपर्यंत जीं तीन पुस्तकें बक्षीस देण्यांत आलेलीं आहेत तीं सर्व वरेरकरांनींच लिहिलेलीं आहेत. या बक्षीस पुस्तकाशिवाय इतर धार्मिक लेख व कविता लिहून आरंभापासून वैश्य मासिकाला त्यांनीं कायमचें ॠणि करून ठेविलें आहे-या गोष्टींचा उल्लेख करून मित्रभावानें त्यांनीं केलेल्या मदतीबद्दल त्यांचें मनःपूर्वक आभार मानणें अत्यंत जरूर आहे.

या नाटकांतील निरनिराळ्या प्रसंगांचे फोटो घेण्याचे कामीं, नाट्यविनोद संगीत नाटक मंडळीचे उभय मालक-श्रीयुत शेट्ये व स्वदेशहितचिंतक नाटक मंडळींतील सुप्रसिद्ध नट श्रीयुत सोहनी इत्यादि मंडळींची जी मदत झाली तिजबद्दल आम्ही त्यांचेंही फार आभारी आहोंत.

ही कृति महाराष्ट्रीय सहृदय वाचक गोड करून घेतील अशी आशा आहे.

वैश्य मासिक कचेरी, मुंबई.<br>ता. १५।३।१४ } विश्वनाथ गोपाळ शेट्ये.

नमो भगवते वासुदेवाय ।

# संगीत वरवर्णिनी

## अथवा

## सती सावित्री नाटक.

### नान्दी.

पद-[ ममदसा रंगिलेरे. ]

नियमिलें जगा जयें, तयातें निज मन द्यावें ।
मग भयरहित जगा करावें ॥ ध्रु० ॥
सरल-हृदय नचिकेता । जनक वचनिं जाता ।
पुढती ये यमहि भय धरित, पायीं हो
विनत हरि कृपा हे ॥ १ ॥

# अंक १ ला.

## प्रवेश १ ला.

[ नगराची एक बाजू. कंचुकी प्रवेश करतो. ]

**कंचुकी**—काय चमत्कार आहे पहा ! इतके भाट गेले पण शेवटीं नकार घेऊनच परत आले. राजकुमारीला अनुरूप असा वर एकालाही ठरवितां आला नाहीं ! एवढें वय झालें तरी अविवाहित रहावें असेंच काय तिच्या नशिबीं आहे ! राजाची मुलगी—त्यांत रूपानें लक्ष्मी सारखी—गुणानें दुसरी सरस्वती—असल्या सर्वांगसुंदरीला वर मिळूं नये ना ? कां ? हा काय दैवाचा खेळ ? ब्रह्मदेवाची इच्छा देखील इतकी विलक्षण कां असावी ? आतां मुलीला सोळा वर्षें पुरी होतील, मग राजाराणी काळजीनें उन्मत्त झालीं आहेत यांत कांहीं नवल नाहीं. असे एका मागून एक भाट निराश होऊन परत आल्याचें ऐकतांच एकेक दिवस त्यांचा धीर खचतच जाणार. त्यांची तरी काय समजूत घालावी ? आणि ती घालावी तरी कशी ? दररोज महाराज मला भाट परत आल्याचें विचारतात, पण त्यांच्या निराशेची हकीगत मी त्यांना कोणत्या तोंडानें सांगूं ? 'महाराज, या पृथ्वीवर आपल्या मुलीला वरच नाहीं' असेंच ना सांगावयाचें ! आतां कुणी तरी देवताच मनुष्यरूप धारण करून येईल तरच कुमारी सावित्रीचें लग्न होईल असें मला वाटूं लागलें आहे.

[तुंबरू प्रवेश करतो.]

**तुंबरू**—कंचुकी महाराज, दुःखामुळें स्वगत भाषण मोठ्यानें बोलत अहांत खरें, पण बोलतां ते सारें खरेंच आहे.

**कंचुकी**—कोण तो तुंबरू ?

**तुंबरू**—अरे कसला आला आहे तुंबरू! किती झालें तरी मी गद्य-गंधर्व. मी गेलों होतों पृथ्वीपर्यटणाला. तुंबरूचा झालों नारद. सारी पृथ्वी पालथी घातली. खालीं मी चेंगरलों नाहीं हे उपकार समजावयाचे!

**कंचुकी**—नारद कसा काय झालास बुवा?

**तुंबरू**—पायावर नक्षत्र पडलें होतें. सारें जग फिरून आलों पण नारदासारखी जटा वाढायच्या ऐवजीं डोकें खाजवितांना टक्कल पडण्याचीच भीति जास्त उत्पन्न झाली. ऐक सांगतों—ताईसाहेबांना वर शोधून आणणाराला अर्धे राज्य बक्षीस देण्याचा महाराजांचा ठराव ऐकतांच माझ्या तोंडाला पाणी सुटलें. म्हटलें, थोड्याशा श्रमानें जर लहानसा राजा व्हावयाला मिळत आहे तर माळा गुंफतां गुंफतां हात मोडून तरी कां घ्या? असा विचार करून कंचुकी महाराज, वरशोधार्थ तर निघालोंच.

**कंचुकी**—बरें मग पुढें?

**तुंबरू**—गांवावर गांव, देशावर देश—सात समुद्र, तेरा नद्या—कांहीं म्हणून शोधावयाचें ठेविलें नाहीं, पण पात्र कांहीं मिळेना. कुमारी सावित्रीचें नांव घेतलें, कीं प्रत्येक तरुण 'आई' म्हणून नमस्कार करून पुढें जात असे. फार टेंकीस आलों. शेवटीं असा विचार केला, वयस्क पात्र तर मिळत नाहीं—अर्थात् आम्हाला राज्यही मिळत नाहीं. विचार करतां करतां कंचुकी महाराज, एक बेत तर करून चुकलोंच. असें पहा, माझ्या एका प्रश्नाचें उत्तर द्या. वराचें वय तरी किती असावें?

**कंचुकी**—असेंच चोवीस पंचवीस.

**तुंबरू**—अरे! अरे! अरे! फार नुकसान झालें, कंचुकी महाराज, फार नुकसान झाल! हातीं सांपडलेले फुकट गेले हो!

**कंचुकी**—तें कसें काय?

**तुंबरू**—चमत्कार! चमत्कार!

**कंचुकी**—काय? म्हणतोस तरी काय?

**तुंबरू**—भरपूर चोवीस वर्षें हो!

**कंचुकी**—यावयाला कबूल होते का?

**तुंबरू**—येणें जाणें कसलें म्हणा, उचलून आणावयाचे.

**कंचुकी**—दिसण्यांत कसे काय होते?

**तुंबरू**—दिसण्यांत चार चौघां सारखे. थोडेसे गोरे, थोडेसे काळे, थोडेसे बळकट, थोडेसे छानछोक; थोडेसे चार शब्द बोलणारे तर थोडेसे केवळ पंडीत. आतां बुद्धि—कुठें मुळींच नाहीं तर कुठें झणझणीत बुद्धिवान्; थोडेसे बृहस्पती तर थोडेसे—माझ्याच सारखे म्हणाना—म्हणजे निव्वळ शतमूर्ख!

**कंचुकी**—काय—सांगत आहेस तरी काय हें?

**तुंबरू**—एवढें सांगून ही कळत नाहीं. ऐका तर. सारी पृथ्वी धुंडाळतां एकही स्थळ मिळत नाहीं असें जेव्हां पाहिलें, तेव्हां सहा सहा वर्षांचे चार मुलगे पाहून ठेविले. काय सांगूं कंचुकी महाराज, प्रत्येकाला लग्न करतोस कीं काय म्हणून विचारतांच प्रत्येक जण ताड् ताड् होय म्हणत गेला. मी म्हटलें, आतां जुळलें. चोवीस वर्षांचा एक मिळत नाहीं, तर सहा वर्षांचे चार मिळाले हेच घेऊन जावें. एकाला घेतला डोकीवर, दोघे दोन बगलेंत मारले, आणि शिंक्यांत घालून एकाला गळ्यांत बांधला. मोठ्या आनंदानें यावयाला निघालों तों डोकीवरचा खालीं पडला, त्याला उचलावयाला गेलों तों बगलेंतले खालीं पडले, त्यांना सांवरतो तों शिंकेंच तुटलें. झालें, चौघांनीं मिळून भरतवाक्य म्हणायला केली सुरवात; जिकडून तिकडून लोक जमा झाले, मुलांचीं आईबापें तर मला कांठ्यांनींच झोडपूं लागलीं.

**कंचुकी**—समजलों—समजलों, पुरें झालें.

**तुंबरू**—इतक्यांत एक जटाधारीबुवा 'मा भैः' 'मा भैः' म्हणत माझ्याकडे येऊं लागला. तेव्हां मी देखील 'बाबा रे:' 'बाबा रे:' करीत पळत सुटलों. प्राणच जावयाचा त्या वेळीं! काय भयंकर प्रसंग तो!

**कंचुकी**—कोणी महापुरुष तर इकडे येत नसेल ना?

**तुंबरू**—निःसंशय महापुरुषच तो. त्याची ती दाढी आणि ती जटा, लंबीचौडी देहयष्टी! महापुरुषच तो, यात कांहीं शंका नाहीं. मी देखील त्या वेळीं मागें फिरलों. म्हटलें, धुऊन पुसून साफ केला तर हा देखील वर कांहीं वाईट दिसणार नाहीं. पुनः अर्धे राज्य मिळविण्याची आशा सुटली आणि गुळांतही वाळू घालावयाला तयार झालों. मी त्यांना म्हटलें 'म्हातारेबुवा, एक मुलगी आहे. तिला सोळा वर्षें भरत आलीं आहेत. बिचाऱ्या आईबापांचा गृहधर्म बुडावयाची वेळ आली आहे. कुणी तिच्याशीं लग्न करावयाला तर तयार होत नाहीं, तुम्हीं करतां का लग्न?' ऐकतांच म्हातारेबुवा म्हणतात 'सोळा वर्षांची मुलगी? कुणी लग्न करावयाला तयार होत नाहीं म्हणतोस? तिचें रूप कसें काय आहे सांग पाहूं?' सौंदर्याच्या सगळ्या उपमा देऊन मी तिच्या रूपाचें जसजसें वर्णन करूं लागलों, तसतसें बुवाजींचे डोळे मिटूं लागले. डोळ्यांतून टपाटप आसवें येऊं लागलीं. पहातां पहातां दम बंद—पोट फुगून हा—नगारा झाला. झालें, म्हटलें आमच्या कपाळीं ब्रह्महत्येचें पाप आलें. मी धरून बुवाजींना हाकवूं लागलों. त्या सरशीं हूँम् शब्द करून ते सावध झाले, आणि मला अशी (कंचुकीला मिठी मारून) मिठी मारून म्हणाले 'तुंबरूरे, इतके दिवस होतास तरी कुठें?'

**कंचुकी**—हां—हां! हें काय? हें काय?

**तुंबरू**—थांब तुला चांगलें समजावून देतों.

**कंचुकी**—आधीं सोड मला. पुरे झालें तुझें समजांवणें.

**तुंबरू**—शेवटीं मिठामिठीची सुटासुटी होऊं लागली-कशी ती दाखवूं का?

**कंचुकी**—नको बाबा नको. पुरे झालें तुझें दाखविणें.

**तुंबरू**—जशी आज्ञा. ते पहा बुवाजीच इकडे येत आहेत. त्यांच्याकडूनच काय तें पाहून घे. मोठे कठीण आहेत हो ते! एक वेळ म्हणे सुळावर देखील गेले होते.

**कंचुकी**—सुळावर?

**तुंबरू**—हो सुळावर, पण काय बेट्याचें कसब पहा—हजार वर्षें सुळावर झोंप घेत राहिले!

**कंचुकी**—सुळावर? तर मग ते मांडव्य ऋषि तर नव्हत ना?

**तुंबरू**—ते आतां तुमचें तुम्हीच पाहून घ्या. हे पहा ते आलेच. आतां तुम्ही भाषण सुरू करा तोंपर्यंत मी पलायन करतों. [जातो व दुसऱ्या बाजूनें मांडव्य ऋषि प्रवेश करतो.]

**कंचुकी**—यावें भगवन्, मी अभिवादन करतों.

**मांडव्य**—विष्णवे नमः—कोण आपण?

**कंचुकी**—मी राजकंचुकी आहें भगवन्.

**मांडव्य**—अश्वपति महाराज राजधानींतच आहेत ना?

**कंचुकी**—होय भगवन्, आपण इकडे कुणीकडे?

**मांडव्य**—तीर्थपर्यटणार्थ निघालों तों सहज इकडे आलों.

**कंचुकी**—महाराजांचा प्रतिनिधि या नात्यानें आपली पायधुळ येथें लागावी अशी विनंति करतों.

**मांडव्य**—पायधुळ नव्हे कंचुकी—अश्वपति महाराजांचा वाडा हेंच माझें तीर्थस्थान आहे.

**कंचुकी**—असें इकडून यावें भगवन्. [जातात.]

---

## प्रवेश २ रा.

[ **राजवाडा**—अश्वपति आणि मालवी. ]

**मालवी**—महाराज, यापुढें लोकांना समजावून राखणें कांहीं शक्य नाहीं.

**अश्वपति**—तुझ्या समजावणीसाठीं लोकें इतकी उतावीळ होण्याजोगी अशी गोष्ट तरी कोणती ?

**मालवी**—तें इकडे माहीत का नाहीं. मुलीला आतां सोळावें वर्ष संपत आलें. जीं भेटायला येतात तीं लग्न कधीं आहे म्हणून विचारतात. त्यांना आतां उत्तरें तरी काय द्यावींत ?

**अश्वपति**—मला देखील कुणी विचारीत नाहींत असें का आहे ? पण काय करावें—

**पद**–( किंतितरि सखिचें मनोज्ञ हास. )

**बहुपरि छळितो मना विचार । गुणयुत नृपसुत**
**विलसति जरी अपार ॥ धृ० ॥ व्यंग नसुनि मम**
**कुमारि कोणी । केंवि नादरिति नकळे मजला ॥**
**नसेचि कोणि विशाल हृदयीं उदार ॥ १ ॥**

**मालवी**—पण आमच्या या सांगण्यावर विश्वास ठेवणार कोण ? लोकांना वाटतें, एकुलती एक मुलगी म्हणून या आईबापांना तिचें लग्नच मुळीं करवत नाहीं.

**अश्वपति**—त्यांच्या वाटण्याला आम्ही तरी काय करणार ? लोकांच्या मनावर सत्ता चालविण्याइतकें आमचें पुण्यबल तरी कोठें आहे ? अठरा वर्षें तपश्चर्या करून ही मूर्तिमंत काळजी मात्र घरांत आणली. एवढें ऐश्वर्य आहे पण तें देखील मनाला डांचतें. स्वतःच्या डोळ्यानें पितरांची अधोगति पहावी असेंच का माझ्या नशिबीं आहे ? अठरा-

वर्षांच्या तपश्चर्येचें हेंच काय फल ? देवाच्या कृपेनें ही मुलगी झाली— आतां माझा धर्मलोप व्हावा अशीच जर त्याची इच्छा असली तर मनाला वाईट वाटून घेण्यांत तरी काय अर्थ आहे ?

**मालवी**—एकूण आमच्या सावित्रीच्या कपाळीं लग्नच लिहिलें नाहीं का ?

**अश्वपति**—आहे कीं नाहीं तें एका विधात्यालाच ठाऊक—आणखी कदाचित् लग्न झालें तर सोळा वर्षें होऊन गेल्यावर त्या लग्नाचें तरी काय फल ? कुलाचाराप्रमाणें धर्मदृष्ट्या मी पतित ठरणारच.

**मालवी**—काय देवा ही विटंबना !—

पद–[ अनुभविक लोक जगभरि निरखिति. ]

**नव सरसिं दीप्त सुविमल पंकज तेंवि मुग्धबाला ॥ ध्रु० ॥**
**कीं हिमाद्रि-वासिनि नगजा मूर्त ये धरेला ॥**
**कन्यका तशी ही विमला कां मुके वराला ॥ १ ॥**

**अश्वपति**—तुझें हें दुःख माझ्याजवळ काय कामाचें ? मुलगी सुलक्षणा आहे हेंच तर मोठें संकट. जो तिला पहातो त्याच्या मनांत तिच्याविषयीं भक्तीचा उद्रेक होतो. सौंदर्यावर भाळणारे म्हणजे तरुण—पण ते देखील सावित्रीला पहातांच मातृभावानें नमस्कार घालतात. अशी जर स्थिति आहे, तर तुझ्या मुलीचें लग्न व्हावें कसें ? सावित्री देवीच्या आराधनेनें मला ही मुलगी मिळाली. तिलाच आतां तिची काळजी. देवीच्या मनांत काय आहे कोण जाणें !

**मालवी**—देवीच्या मनांत काय आहे तें समजावयाचें आतां काय राहिलें आहे. कुलाचें नांव राखण्यासाठीं मुलगा असावा म्हणून इकडून देवीची तपश्चर्या करण्यांत आली, तर देवीनें ब्रह्मदेवाकरवीं मुलगी देण्याचा आशिर्वाद देवविला. शेवटीं नशीब असें आडवें आलें. कुलधर्म रक्षणासाठीं तप केलें—पुत्राच्या कामनेनें यज्ञ केला आणि फळ काय मिळालें तर कन्या. बरें मुलगी झाली, ती शंभर पुत्रांसारखी

वाटली. पण आतां तिची अशी स्थिति होत असलेली पाहून निश्चित कसें रहावेल ?

**अश्वपति**—मी तरी निश्चित कुठें आहें ? देशोदेशीं लोक पाठवीत आहें, चौकशी करीत आहें, आतां शेवटीं वरशोधार्थ स्वत: मींच जावयाचें काय तें राहिलें आहे. तसें करूनही जर कांहीं झालें नाहींच तर मात्र शेवटीं शास्त्राज्ञेप्रमाणें करणें भाग पडणार आहे.

**मालवी**—शास्त्राज्ञेप्रमाणें काय करायचं ?

**अश्वपति**—काय करावयाचें ? तेवढें मात्र विचारूं नकोस. ते कठोर शब्द ऐकण्याइतकें धैर्य तुझ्याअंगीं मुळींच नाहीं.

**मालवी**—तर मग सांगाच काय तें.

**अश्वपति**—त्या वाक्याचें एक एक अक्षर तुझ्या कोमल हृदयावर हजारों वज्राइतका आघात करील. नाहीं मालवी, तें तुझ्यानें सहन करवणार नाहीं.

**मालवी**—ज्यावेळीं तसें करणें लागेल त्यावेळीं तर सहन केलें पाहिजे ना ? मग आतांच तें ऐकून थोडासा भार हलका करून घेणें काय वाईट ?

**अश्वपति**—शास्त्राज्ञा अशी आहे—

**पद**—[ स्वमन आवरा झडकरि. ]

**त्यजिन बालिका खचितांचि । करिन कठिन विचलित**
**मन, शोक-विकल जरिहि करिल, हृदयदारिका ॥ ध्रु० ॥**
**हृद्ग्रंथी जरि तुटली । माया-सरिता अटली ।**
**मति विटली । गति खुटली । धर्मकारिका ॥ १ ॥**

**मालवी**—देवा ! कठोर तपाचा शेवटीं हाच परिणाम होणार ना ! महाराज, सावित्रीला वर शोधून आणणाराला सर्व राज्य बक्षीस देण्याचा डांगोरा तरी पिटवा.

**अश्वपति**--राणी, जो पत्नी म्हणून सावित्रीचें पाणिग्रहण करील तो काय तुच्छ राज्याची इच्छा करील? [ दूत प्रवेश करतो. ] काय आहे?

**दूत**--बातमी कांहीं शुभ नाहीं. तर शोधार्थ गेलेले सर्व भाट निराश होऊन परत आले.

**मालवी**--तर मग सगळ्या भरतखंडांत माझ्या सावित्रीचें पाणिग्रहण करणारा कोणी नाहींच का मिळाला?

**दूत**--राजपुत्रांच्या उन्मत्ततेची बातमी सर्व भरतखंडांत सर्वतोमुखी झाली आहे. कोणीही राजपुत्र राजकुमारीशीं लग्न लावावयास तयार नाहीं. कोणताही राजा आपल्या मुलाला वधू-परीक्षेसाठीं मद्रदेशास पाठवावयाला तयार नाहीं.

**अश्वपति**--[ कपाळावर हात मारून ] शेवटीं लग्नाच्या आशेवर देखील जलांजला पडली.

**दूत**--असें झालें आहे खरें महाराज. भाट म्हणतात दूर देशींचे लोक देखील कुमारी सावित्रीचें नांव ऐकतांच साष्टांग नमस्कार घालतात. ही मूर्तिमती देवी सावित्रीच मनुष्य रूपानें जन्माला आली आहे, असेंच कुणी तरी त्यांच्या कानांत सांगितल्याचा भास होतो.

**मालवी**--काय करूं? महाराज, आतां काय करूं? स्वर्गातल्या साऱ्या देवतांचेच तेज नष्ट झालें काय? जगाचे नियमन करणारा धर्म देखील लोपला काय? असें आम्ही कोणतें पाप केलें होतें कीं हें संकट आमच्यावर यावें!

**अश्वपति**--कर्तव्य मोठें दारुण आहे. प्रजारंजन, लोकापवाद आणि धर्माचें रक्षण हीं तिन्हीं साधणें मोठें दुर्धर आहे. समजलों, माझ्या सत्वाची परीक्षा पहाण्यासाठींच--भयंकर दुःखसमुद्रांत मला लोटून बुडवि-ण्यासाठींच--ईश्वरानें ही कन्यारूपी शिला माझ्या पदरीं बांधिली.

उत्सुकतेनें सर्व प्रजा माझ्या तोंडाकडे पहात राहिली आहे. आज माझ्या हातून जर समाजधर्माचा नाश झाला तर सर्व नाशच होणार म्हणावयाचा. स्वभावत:च मनुष्य प्राणी स्वतंत्रताप्रिय आहे—अशांतच जर रूढाचाराविरुद्ध कोणतीही गोष्ट माझ्या हातून घडली तर सर्व प्रजा माझेंच अनुकरण करूं लागेल, आणि त्या सर्वांच्या पापाचें ओझें माझ्या मस्तकावर येऊन पडेल. वर्णसंकराला मग अवधीच रहाणार नाहीं, आणि डोळ्याची पापणी लवते न लवते तोंच पापांच्या भयंकर ज्वाळांनीं समाज जळून खाक होईल.

**मालवी**—महाराज, आपल्या सभेंत मोठमोठे विद्वान् ब्राह्मण आहेत; ते अशावेळीं आपल्याला कांहीं तरी योग्य मार्ग दाखविणार नाहींतच काय ?

**अश्वपति**—माझे आश्रित म्हणविणारे मला काय उपदेश करूं शकतील? जोंपर्यंत माझ्या आश्रयाची त्यांना इच्छा आहे तोंपर्यंत मला गोड वाटेल असाच उपदेश ते करीत रहाणार. राजसभेंतील ब्राह्मणांना राजाच्या कल्याणापेक्षां आपल्या पोटाची काळजीच जास्त वाटते. अशांना कां विपत्कालीं शरण जाऊं?

**कंचुकी**—[ प्रवेश करून ] महाराज, भगवान् मांडव्य ऋषि आपल्याला आशीर्वाद देण्यासाठीं इकडेसच येत आहेत.

**अश्वपति**—एकून ईश्वराजवळ अजून थोडी दया आहे म्हणावयाची. राजाच्या निश्वासाबरोबर मान न डोलवणारा एक निरिच्छ सत्पुरुष आपण होऊन माझ्या घरीं चालत येत आहे हें माझें मोठें भाग्यच आहे म्हणावयाचें. मालवी, ऊठ—ऊठ त्यांच्या सत्काराची तयारी कर. [मांडव्य येतो.] यावें भगवन्, या आसनावर बसावें. [ प्रणाम करतो. ]

**मांडव्य**—जयोऽस्तु महाराज.

**मालवी**—या आसनावर बसावें भगवन्. [ प्रणाम करते. ]

**मांडव्य**–चिरायुष्मती भव, सर्वाभिष्ट प्राप्तिरस्तु. हा बसलोंच. राणी मालवी, अश्वपति महाराज, तुमचें आतिथ्य गृहण करण्याचा आज मला सुप्रसंग मिळाला हें माझें मोठें भाग्यच समजतों. सर्व तीर्थे फिरत फिरत निघालों तो इकडून ही जावें असें मनांत आलें. कारण–

**पद**–[ दिल्कु चैन. ]

**अखिल भूमी आक्रमी विधि भूतिशी तव कन्यका**
**अवतरे या भूतलीं तव गेहिं तापनिवारका ॥ १ ॥**
**त्यजिलि काशी धांवलों तव धामिं येउनि पातलों**
**सकल काशी ही सुकेशी स्त्रीजनांसीं दीपिका ॥ २ ॥**

**मालवी**–काय म्हणतां महाराज ?

**अश्वपति**–हें जर खरें म्हणावयाचें तर आज आम्हीं अशा संकटांत कां पडत आहोंत.

**मांडव्य**–कसलें संकट महाराज ?

**अश्वपति**–सावित्रीच्या वयाला सोळा वर्षे पुरीं होत आलीं, पण अझून कोणीही राजपुत्र तिचें पाणिगृहण करण्यास तयार नाहीं. हें असें कसें व्हावें ?

**मांडव्य**–यांत असें विशेष तें काय झालें ? शास्त्रदृष्टया पाहिलें तर षोडशवर्षीया कुमारी म्हणजे मूर्तिमती देवी अंबिका. ती मनुष्य असूनही स्त्रीरूपी जगन्माता. सर्व जीवांना–सर्व मानवांना–एवढेंच नव्हे तर सर्व देवतांनासुद्धां वंदनीय. अशा मुलीचें जो पाणिग्रहण करील तो नरदेहधारी उमापतीच समजावयाचा. महाराज, आपण गिरिराज हिमालयासारखे भाग्यवान् अहांत. राणीसाहेब, आपण सुद्धां मेनके प्रमाणें महा भाग्यवती अहांत असें मी समजतों. धन्य तुम्ही, कीं तुमची मुलगी सोळा वर्षेपर्यंत अविवाहित राहिली.

**अश्वपति**–काय सांगतां हें भगवन् ?

**मांडव्य**—मी शास्त्रवचनच सांगत आहें.

**मालवी**—आतां कुठलीं शास्त्रें तरी मानावीं? राजसभेंतील पंडीत एक सांगतात, तर आपण हें आतां निराळेंच सांगत अहांत. तें खोटें म्हणावें तर काशीयात्रा करण्याचेंही टाकून आपण इकडे आलां अहांत हें पुनः आठवतें. काय सांगावें भगवन्—

पद—[ जाहले आभार भारी आपुले. ]

**पातली साकार देवी ही जरी ॥ विसरली कैशी पतीतें यापरी ॥ घृ० ॥ घेउनी रणरंगिनिशा मूर्तिला। कां न त्याहुनि घाव घाली अंतरीं ॥ १ ॥ काय नेतिल ओढुनी मगरीपरी। देवता नरलोकिंच्या नरकांतरीं ॥ २ ॥**

**मांडव्य**—किती परस्पर विरोधी बोलत अहांत हें राणीसाहेब?

**अश्वपति**—काय करील बिचारी! मुलीच्या लग्नाच्या काळजीनें वेडी पिशी झाली आहे.

**मालवी**—हजारों प्रयत्न करूनही माझ्या सावित्रीला पतीसुद्धां मिळूं नये ना? भगवन्, आतां आमचें पुढें काय होणार हें तुह्मींच सांगा. लोकनिंदेच्या ज्वालेंतून तुह्मीच आतां आह्माला वांचवा.

**मांडव्य**—काय म्हणतां वर मिळत नाहीं? सावित्री कुरूप आहे काय?

**मालवी**—फारच कुरूप, महाराज फारच कुरूप! आपल्या शची लक्ष्मी, पार्वती आदीकरून सर्व कुरूपच आहेत काय? भगवन् आपण अंतर्ज्ञानी अहांत; जीव जळतो म्हणून आपल्या चरणांचा आश्रय करीत आहों. आपण ही अशी वेळ पाहून आमची थट्टा करीत अहां काय? कुरूप?— माझी सावित्री काय कुरूप आहे? तीन त्रिभुवनांतलें सौंदर्य जिच्या ठिकाणीं एकवटलें आहे ती माझी सावित्री काय कुरूप?

**मांडव्य**—ठीक आहे. मुलीला एक वेळ इकडे घेऊन या, म्हणजे काय प्रकार आहे तें मी पहातों.

**अश्वपति**—जा मालवी, लवकर सावित्रीला इकडे घेऊन ये.

**मालवी**—नुसत्या समजावणीनें माझें काय समाधान होणार आहे ? महाराज, ज्या अर्थी आपले पाय आह्मां गरिबांच्या घराला लागले आहेत, त्या अर्थी आमचा कांहींतरी सोक्षमोक्ष केल्यावांचून आम्ही आपल्याला मुळींच जाऊं देणार नाहीं.

**अश्वपति**—ठीक ठीक—सावित्रीला घेऊन ये जा पाहूं ? मग काय बोलावयाचें असेल तें बोल. [ मालवी जाते. ]

**मांडव्य**—सावित्री—सावित्री—किति सुंदर तरी नांव हें ? हें नांव कुठून मिळविलें महाराज ?

**अश्वपति**—सावित्री देवीच्याच प्रसादानें ही जन्म पावली म्हणूनच नांव सावित्री असें ठेविलें आहे.

**मांडव्य**—अशा मुलाला वर मिळत नाहीं म्हणतां ?

**अश्वपति**—पुष्कळ ठिकाणीं शोध केला—मोठमोठ्या गुणसंपन्न राजपुत्रांनां दाखवावयाला आणिलें. पण प्रेमदृष्टीनें हिच्याकडे पहाण्याचें एकालाही साहस झालें नाहीं. जो जो राजपुत्र हिला पाहण्यासाठीं म्हणून येत असे तो तो तिला पहातांच दूरून नमस्कार करून जात असे.

**मांडव्य**—तुमचें चुकलें तें इथेंच. सावित्री सर्वगुणसंपन्न आहे असें जर तुह्माला वाटतें, तर पतीची निवड करण्याचें काम तुह्मी तिच्यावरच कां सोंपविलें नाही ?

**कंचुकी**—स्वतः पतीची निवड ? मुलीनें स्वतः ?

**मांडव्य**—मुलीनें स्वतः निवड कां करूं नये ? वराला मात्र आपल्या मनाजोगी वधू पाहिजे आणि वधूनें मात्र आपल्या मनाजोगा वर शोधूं नये काय ? पार्वतीनें आपला पती आपणच मिळविला ना ? सर्व देवतांना टाकून समुद्रमंथनकालीं लक्ष्मीनें विष्णूच्या गळ्यांत माळ घालतांना कुणी आडकाठी आणिली काय ? वधूनें वराची परीक्षा स्वतः करण्याला शास्त्राची आडकाठी असती तर स्वयंवर हा शब्दच मुळीं

प्रचारांत आला नसता. तुह्मी माझें ऐका! तुमच्या हातून कांहीं होत नाहीं हें तर ठरलेंच आहे. आतां या कामाचा भार सावित्रीवरच टाका.

**अश्वपति**—खरेंच भगवन्, ही गोष्ट मुळींच आमच्या लक्ष्यांत आली नव्हती. [ मालवी आणि सावित्री प्रवेश करतात. ]

**मालवी**—ही पहा महाराज, आपली मुलगी. मुली, मुनीराजांना प्रणाम कर आणि त्यांच्याकडे अनुरूप वर मिळण्याची प्रार्थना कर. असा आशीर्वाद घे कीं ज्यामुळें तुला पतिलाभ होऊन मद्रवंशाचेंही धर्मरक्षण होईल. [ सावित्री प्रणाम करते. ]

**मांडव्य**—( स्वगत ) बोलावयाचा विचार दिसत नाहीं!

**मालवी**—हें काय मुली? उगीच कां राहिलीस?

**मांडव्य**—तसेंच कांहीं कारण असल्याशिवाय उगीच का कुणी बोलल्याशिवाय रहातें? महाराज, तुमच्या मुलीचें लग्न आजवर कां झालें नाहीं याचें कारण मला आतां कळलें. मुक्या मुलीशीं लग्न कोण करील?

**मालवी**—बोल मुली बोल.

**अश्वपति**—प्रार्थना केल्याशिवाय देवता तरी आशीर्वाद कसा देणार? मुली बोलत कां नाहींस?

**सावित्री**—भगवन्, शास्त्रवचन असें आहे—

**पद**–[ बांधुरे बदन बांधो. ]

**विशदा स्थिती विशाला, मागे वर कसला पापमला, । विधि-बला हरिल कुणि काला । स्थिती विशाला ॥ ध्रु० ॥ जरी न कुणि पूजितसे विभवा त्यजोनियां ॥ कां देइल वराला ॥ १ ॥ विकास हृदयांतरिंचा॥ दैवी गती सम। दाता वरदतेला ॥ २॥**

**मालवी**—मग आतां बरी बोललीस?

**सावित्री**—तरीपण मी ऐकिलें आहे कीं आईबापांचें वाक्य म्हणजे वेदवाक्यासारखें मानिलें पाहिजे. आतां तर त्यांनीं मला आज्ञाच केली—मग मी तिचे उल्लंघन कसें करूं?

**मांडव्य**–शास्त्रानें ब्राह्मणाला आशीर्वाद देण्याचा अधिकार दिला आहे, त्याला अनुसरून मी तुला सांगतों कीं मुली तुझें अभीष्ट पूर्ण होवो.

**मालवी**–आराधना करावयाला मिळाली नाहीं म्हणून एवढें दुःख ! त्यांत तें एवढें काय वाईट वाटून घ्यावयाचें ! आतां तुझ्याच मनासारखें करतें. आज हे मुनीराज आपल्याकडे अतिथी होऊन आले आहेत, त्यांची सेवा करण्याचा सर्व भार तुझ्यावर राहिला.

**अश्वपति**–सावित्री, आज दोन दिवस तूं उपवास केला आहेस. त्याचें अतिथींचा प्रसाद ग्रहण करून पारणें फेड. दुसरें असें पहा, तुझ्या वयाला सोळा वर्षें पुरी होत आलीं आहेत. तुला पती शोधण्याचे आमचे सर्व उपाय फुकट गेले आहेत. आतां तुझें तूंच पहा. आणि—

पद–[ मृगया वनि करितां. ]

**वदना नच मजला पतिविण पुढती दावि या ॥ धृ० ॥**
**उदास पितरां षोडश वर्षें दुःख दिलें त्वां भारी ॥**
**झालिस केवळ कटु कंटकशी उभयां या संसारी ॥**
**मजला नरकीं अथवा लोटीं स्वर्गीं सौख्य विधाना ॥ १ ॥**

**सावित्री**–मी कुठें जाऊं बाबा ?

**अश्वपति**–तुझा धर्म तुला जिकडे ओढून नेईल तिकडे तूं जा. इष्टकार्य सिद्ध झाल्याशिवाय घरीं परत येऊ नकोस. आणि जर तुझ्यानें तें होत नसेल, तर मद्रवंशाचा आणि तुझा संबंध कायमचा तुटला असें समजून तुला जें वाटेल तें कर—आणि वाटेल तिकडे जा.

**सावित्री**–जशी आज्ञा. [ खालील पद म्हणत मुली प्रवेश करतात.]

पद–[ चालो साहेली. ]

**चाल वरांगी हे मृदुळांगी पतिसुखभागी ये फिरुनी ॥ विधि**
**वश झाला जगतिं लपाला ओढिं तयाला कर धरुनी ॥ धृ० ॥**
**मृदुगलदेशीं ठेविं करासीं घेइं तयासीं हृदिं भरुनी ॥**

धन्या नृपकुल कन्या जगभरि अन्या तुजसम नसत कुणी ॥
सुखजलवारिद सिंचिति वसुधा पतिरत सति विलसति बघुनी ॥ १ ॥

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

[ रस्ता—तुंबरू आणि अश्विनी प्रवेश करतात. ]

**तुंबरू**—अश्विनी, काय केलेंस हें ? राजकुमारी वनवासाला निघून गेली म्हणून दावण सुटलेल्या गाईसारखी चौखुरावर पळत आलीस. त्या तुला काय म्हणावें ? कुठें येऊन पडलों हे ? आपल्याला तर बुवा रस्ता कांहीं उमगत नाहीं.

**अश्विनी**—आणखी काय करायचं म्हणून विचारतां ! किती झालें तरी मी बायकोमाणूस. मनांत आलें ती निघालें. तुम्ही चांगले धडधाकट पुरुष—तुम्हांला रस्ता माहीत नाहीं असें मी तरी कशावरून समजावें ?

**तुंबरू**—आतां पुरुषांना बायकांनींच रस्ता दाखविण्याची वेळ आली आहे. तशांतूनही तुला रस्ता सांपडत नसेल तर ये—रस्त्यावर हात पाय जुळवून आडवें पडून दोघेंही मरून जाऊं.

**अश्विनी**—आतां मरायचं तें काय राहिलें आहे. ताईसाहेब ज्या क्षणीं आम्हाला टाकून गेल्या तेव्हांपासून आम्ही काय जिवंत आहोंत ? मरणाचें भय एवढें कशाला दाखवितां ? भय तर तुम्हांलाच. तुम्ही चांगले धडधाकट असतांना मी एकदाची मेलें म्हणजे सुटलें.

**तुंबरू**—वा, वा—इकडे भुकेनें मी तळतळत आहें—तहानेनें प्राण कासावीस होत आहे—शिवाय अर्ध्या राज्याची आशा होती तीही गेल्यामुळें मन नुसतें खावयाला येत आहे. अशावेळीं तूं मरणार म्हणतेस ? वा, छान—माझे स्वतःचेच पाय उचलत नाहींत तों ऐरावतासारखा तुझा हा देह खांद्यावर टाकून मी फिरावें, खाशी इच्छा तुझी अश्विनी.

**अश्विनी**–पहा, पहा तरी काय मेले दयेचे पुतळे.

**तुंबरू**–हें बघ, मरायची गोष्ट सध्यां काढूं नकोस—

पद–

**वसुधा भरुनियां क्षुधा। ही करी द्विधा।**
**कोणत्या बुधा। गमत मरण करुण संपदा ॥ धृ० ॥**
**जरी कोणी यम येई सांगु त्या तदा। अन्न मला।**
**मरण तुला। विपद हनन अशन दे सदा ॥ १ ॥**

**अश्विनी**–पुरे, पुरे झालें बोलणें—कळली अक्कल. हे घ्या पोहे. बायकांना बुद्धि असते म्हणून तर आज उपाशी मरायचें टळलें. नाहीं तर तुम्हांला घरून कांहीं खायचें आणावयाची आठवण झाली होती का?

**तुंबरू**–शेवटीं बायकांची अक्कल कांडून पोहेच ना निघाले? आतां रस्त्याच्या कडेला जसें कुत्रें हाड चघळीत बसतें, तसे हे पोहे चघळीत मी इथें बसावें वाटतें?

**अश्विनी**–कोरडे खायची संवय कांहीं आजचीच नाहीं. तरी पण थांबा, ती पलीकडे एक गाय चरते आहे, तिचें थोडेसें दूध पिळून घेऊन येतें.

**तुंबरू**–जा, जा तरमग—लवकर घेऊन ये. [ अश्विनी जाते. ] छे बुवा, प्रयत्नाची परमावधि झाली. महाराजांनीं राजकुमारीला एक प्रकारें वनवासाला पाठविलें आहे म्हणावयाचें. नवरा मिळाला तर परत यावयाचें, नाहींतर फिरून मद्रदेशांत तोंड दाखवावयाचें नाहीं—कोणत्या प्रकारची आज्ञा ही? सावित्री जर परत आली नाहीं तर आमची घरधनीण तरी कुठली परत येते. कारण, शिवपूजेचीं फुलें रोज आणून देण्याचें काम तिचें आहे. तसेंच सावित्रीवरही तिचें तसेंच प्रेम आहे, आणि जिथें प्रेम जडेल तिथें ती सदा चिकटून राहवयाची. म्हणूनच ना माझी ही अशी स्थिति? मग ताईसाहेबांना

सोडून ती कशी राहील ? इतक्यांतच बिचारी अगदीं अर्धमेली झाली आहे, आणि अशी बायको मेल्यावर मी काय कपाळ जगतों ? अहाहा ! काय पण बायको ? ही काय बायको ? ही तर नुसती वंशपरंपरार्जित संपत्ति. दया किती ! माया किती ! छे बुवा, विचार करतांच बुद्धीचा नुसता चिवडा होऊन जातो. जाउं दे! ती येईपर्यंत एवढे पोहे खाऊन मन तरी गुंतवून ठेवावें. अरे बापरे—पुनः ते 'मा भैः'—बुवा इकडे आले. आतां लपवूं कुठें ? आड लपावें म्हटलें तर अश्विनीही इथें नाहीं. असला प्रचंड किल्ला हरवून ऐन प्रसंगीं उघडा पडलों. आतां करूं तरी काय ? आलेच हे. काय करूं म्हणजे—आतां सपाटून हे पोहे खावे झालें. [ मांडव्य येतो. ]

**मांडव्य**–[ स्वगत ] सावित्री गेली कुठें ?

पद–[ व्यक्त रदन बघुनि वदन. ]

**तातसदन त्यजुनि, विपिन आक्रमी सती ॥**
**वीरोचित शोधितसे आपुला पती ॥ ध्रु० ॥**
**सागरतटिं भानु जसा उगवतो नभीं ॥**
**तैसा पति दिसतां जी वैभवा न भी ॥**
**पाहिन कधिं मम कुमरी राहिली उभी ॥**
**अर्घ्यांजलिशी माला वाहि सन्मती ॥ १ ॥**

अरे, हा कोण ? कोणरे तूं ? काळोखांत भर रस्त्यावर बसून काय करीत आहेस ?

**तुंबरू**–( स्वगत ) शेवटीं पकडलें. याला मागें पुढें दोन्ही बाजूला डोळे आहेत कीं काय नकळे.

**मांडव्य**–बोलत कां नाहींस ? कोण तूं ?

**तुंबरू**–बोलणें शक्य नाहीं.

**मांडव्य**–तें कां ?

**तुंबरू**—मी खात आहें पोहे—उँ करायला जाईन तर त्याचा ॐ सारखा होईल उच्चार. मी आहे शूद्र आणि मी ॐ म्हटलें असें जर राजसभेंतल्या पंडितांना कळलें तर ते माझा प्राणच घेतील.

**मांडव्य**—काय वेडेपणा हा? ज्या प्रणवापासून सर्व जगताची उत्पत्ति त्याचा उच्चार करूं नये असें सांगणारांना काय संबोधन द्यावें? बापाचें नांव अमुक मुलांनीं घ्यावें आणि अमुक मुलांनीं घेऊं नये, असे नियम करण्याचा कुणाचा अधिकार आहे? तुझें नांव काय मुला?

**तुंबरू**—मी.

**मांडव्य**—मी कुठला?

**तुंबरू**—ओळखून घ्या.

**मांडव्य**—तुझें नांव काय?

**तुंबरू**—रस्ता बंद. उँ करण्याची अडचण तुम्ही टाळलीत खरी पण दुसरी एक आहे. घशांतून शब्द यावयाला रस्ता नाहीं.

**मांडव्य**—तो कसा काय?

**तुंबरू**—हा खात आहें पहातां ना? बोलावयाची सवड नाहीं.

**मांडव्य**—मग एवढा वेळ बोलत आहेस तो?

**तुंबरू**—बोलत आहें कसला? पोहे खायला तोंड उघडतों त्यावेळीं ओंठावर आलेले शब्द घसरून खालीं पडत आहेत झालें.

**मांडव्य**—अरे हा तर तुंबरू!

**तुंबरू**—आतां कुठला आला आहे तुंबरू?

**मांडव्य**—कां बरें? असें काय झालें?

**तुंबरू**—तुंबरूच्या विण्याची तारच तुटली. भुकेनें प्राण व्याकूळ झाले तर गंधर्व देखील बेसूर गातात, मग या माझ्यासारख्या नामधारी गंधर्वाची काय स्थिति व्हावी?

**मांडव्य**—पण, तूं राजकुमारीला वर शोधून आणावयास गेला होतास ना?

**तुंबरू**—होय गेलों होतों.

**मांडव्य**—मग पुढें ?

**तुंबरू**—पुढें काय—हे पोहे खात आहें.

**मांडव्य**—पण स्थळ शोधायला गेलास त्याचें काय झालें ?

**तुंबरू**—कोणत्याही स्थळीं पोहे खावयाला कांहीं हरकत आहे असें मला वाटत नाहीं.

**मांडव्य**—एकूण स्थलपेषण करताना तुझ्या हातीं पोहेच राहिले म्हणावयाचे.

**तुंबरू**—दुसरें काय तर ! राजकुमारीच्या नशिबीं नवरा नाहीं म्हणून माझ्या भुकेच्या नशिबीं पोहेसुद्धां असूं नयेत !

**मांडव्य**—मग आतां जात आहेस कुठें ?

**तुंबरू**—हे दोन पाय जेथें नेतील तेथें.

**मांडव्य**—हें वैराग्य झाल्याचें बोलणें झालें. संसारांत तुला मागे पुढें कोणी नाहींच काय ?

**तुंबरू**—कां असूं नये ?

**मांडव्य**—स्त्री पुत्र कोणी आहेत का ?

**तुंबरू**—स्त्री ? सधवा कीं विधवा ?

**मांडव्य**—स्त्री ? आणि विधवा ?

**तुंबरू**—होय महाराज, माझी एक विधवा पत्नी आहे.

**मांडव्य**—विधवा पत्नी कशी होईल ?

**तुंबरू**—ज्या दिवशीं मी तिला घरांत आणिली, त्या दिवसापासून तिच्या गुणानें मी मरूनच गेलों आहें म्हणावयाचा. तेव्हां ज्या अर्थी मी मेलों आहें, त्या अर्थी माझी पत्नी विधवाच आहे.

**मांडव्य**—पण स्त्रीला टाकून तूं एकटाच कोणीकडे चाललास ? तसें करण्यांत पाप आहे हें तुला ठाऊक नाहीं काय ?

**तुंबरू**—म्हणतां काय महाराज ?

**मांडव्य**–स्त्री म्हणजे प्रत्यक्ष गृहदेवता–केवळ वंशजननी. तिचा त्याग आणि आईचा त्याग एकच.

**तुंबरू**–म्हणतां काय महाराज? बायकोला आई समजावयाचें?

**मांडव्य**–स्त्रीच कुलरक्षण करते. तशीच कुलाची रक्षाही करते. तिला भोजनकालीं माताच मानिली पाहिजे–

**तुंबरू**–पुढें बोलूंच नका महाराज, आतां भोजन आणि स्त्री हे दोन शब्द एका जागीं येतांच माझ्या हृदयांत भक्तिरसाचे फवारे उठूं लागले आहेत.

**मांडव्य**–पहा तुंबरू तूंच पहिल्यानें मला सावित्रीचा शोध लावून दिलास हे तुझे उपकार मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. तुंबरू, सावित्रीचा शोध लागेपर्यंत घरीं परत न जाण्याचाच तुझा जर विचार असेल तर आपल्या पत्नीला घेऊन माझ्या आश्रमांत चल. सावित्री तुला तेथेंच भेटेल अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे.

**तुंबरू**–भेटेल म्हणतां? आपल्या आश्रमांतच राजकुमारी भेटेल म्हणतां?

**मांडव्य**–राजकुमारीही भेटेल आणि तिचा पतीही भेटेल.

**तुंबरू**–काय, म्हणतां काय महाराज?

**मांडव्य**–जा, वेळ घालवूं नकोस. पत्नीला घेऊन माझ्या आश्रमांत जा.

**तुंबरू**–फार उपकार झाले महाराज—[ जातात. ]

---

## प्रवेश ४ था.

[ अरण्य. कंचुकी व सावित्री. ]

**कंचुकी**—राजकुमारी, काय केलेंस हें? महाराजांनीं तुझ्याबरोबर राजकुमारीला शोभेलसा लवाजमा दिला असतांही त्या सर्वांना घालवून देऊन तूं एकटीच वर शोधार्थ निघालीस हें बरें का?

**सावित्री**—मद्रवंशाचा तुह्माला अभिमान आहे हें मी जाणत नाहीं का? पण सध्यांची माझी स्थिति पहा आणि मी करीत आहें हें योग्य आहे कीं अयोग्य आहे तें तुम्हीच सांगा.

**कंचुकी**—तुला शिकविण्याची माझी पात्रता कुठें आहे? नुसत्या वार्धक्यानेंच कांहीं बुद्धिवैभव येत नाहीं. राजकुमारी, तूं बुद्धिमती आहेस, सर्व शास्त्रांत पारंगत आहेस, तेव्हां तूं करीत आहेस तें अयोग्य आहे असें मी कसें म्हणूं? केवळ ममतेमुळेंच तूं एकटी जाऊं नयेस असें मला वाटलें तेंच मी बोललों.

**सावित्री**—अशा स्थितींत एक आठवडा उलटून गेला तर माझी काय स्थिति होईल याची तुम्हांला कल्पना आहेना?

**कंचुकी**—भविष्यकालीं कुणाची काय अवस्था होईल हें कुणी कसें सांगावें? फार दूरकालीन गोष्टी कशाला? पण उद्यां होणारी गोष्ट अमुकच रीतीनें होईल असें सांगणारा भविष्यवादी तरी कुठें आहे?

**सावित्री**—कुणी भविष्य सांगो वा न सांगो, भविष्यत्कालच्या अस्तित्वावर प्रत्येकाचा थोडाना थोडा तरी विश्वास असतोच, आणि त्या विश्वासामुळें स्वतःच्या बलावर मनुष्य कोणतीही कार्यें करीत येत असतो. पुढें ज्ञानी व्हावें म्हणून मनुष्य आज विद्यार्जन करतो; वंशरक्षणासाठीं पुत्राची इच्छा करतो; दारिद्र्यापासून मुक्त व्हावें म्हणून अर्थसंचय करतो. भविष्यकालावर जर मनुष्याचा विश्वास नसेल तर त्याला एक पाऊलही टाकतां येणार नाहीं.

**कंचुकी**—तर मग कुमारी, भविष्यकालावरील विश्वासामुळेंच तूं या महत्कार्यासाठीं एकटीच निघाली आहेस असें मीं समजावें ना?

**सावित्री**—असें निश्चयानें मी तरी कसें म्हणूं? पण एवढें मात्र खरें कीं——

पद—[ लिख्खी ह्राय तकसीर. ]

**झालें विधिवश मी वनवासी त्यजिलें मातापितरांनीं ॥**
**विधिलेखन जयिं, होई पुरें, येइन तैं फिरुनी ॥ १ ॥**
**षोडश वर्षें भरती जरि तीं मज पतिलाभावांचोनी ।**
**मद्रकुलाचा इहजन्माचा संबंध जाई तुटुनी ॥ २ ॥**

**कंचुकी**—कुलाचा संबंध कसा तुटेल? तूं राजाराणीच्या डोळ्याची तारका—सर्व प्रजाजनाची प्राणज्योति, अखिल ब्राह्मणवर्गाला मंत्रस्वरुपा—वात्सल्यानें, मायेनें, आणि धर्माचरणानें, सर्वांच्या हृदयांत जें सिंहासन तुला लाभलें आहे तें मेरु पर्वताप्रमाणें अढळ आहे.

**सावित्री**—सर्पानें दंश केल्यास हात तोडून टाकावा लागतो. राज्यरूपी सर्व शरीराच्या संरक्षणासाठीं माझ्यासारखी एकादी सर्पदंशित करांगुळी तुटली तर काय झालें? आठच दिवस राहिले आहेत. कंचुकी महाराज, तुम्ही ब्राह्मण अहांत. ज्या कार्यासाठीं मी निघालें आहें तें कार्य सिद्ध होण्याचा मला आशीर्वाद द्या. इकडे पहा, हें समोर उपवन दिसत आहे. मोठमोठे महात्मे दारिद्र्यरूपी सिंहासनावर विराजमान होऊन सर्व जगताच्या कल्याणासाठीं धर्मरत्नांचा संचय करीत आहेत, त्यांच्यापुढें क्षणभंगुर वैभवाचा टेंभा मिरवीत जाणें योग्य होईल का?

**कंचुकी**—पण ज्या पायांना मातीचा कधीं स्पर्शसुद्धां झाला नाहीं ते पाय अशा काट्याकुट्यांतून——

**सावित्री**—काय म्हणतां हें कंचुकी——

पद—[ हरि हरि डरियन. ]

**विहरति अविरत मुनिगण भवनीं ॥ चरणरेणुंच्या स्पर्शें ॥**
**ही धरणी झाली पूता । कशि पाय ठेउं या स्थलिं विमला ॥ धृ० ॥**
**रमती कुमरी तरुलताश्रिता, वनज लता कुसुमें भूषा ठावी**
**नच ज्यां स्वैरकुमती, केंविं त्यासिं सुवैभव दावुनि निंदनी-**
**यता वरुं मी स्वमनीं ॥ १ ॥**

**कंचुकी**—हाय भगवन्, एवढेंच पहाण्यासाठीं मी कुमारीबरोबर एवढ्या दूरवर आलों काय?

**सावित्री**—विचार करण्याची ही वेळ नव्हे. दुःख करण्यांत काय फल आहे?

**कंचुकी**—काय म्हणतेस हें सावित्री? या हृदयावर बाळगून मी तुला लहानाची मोठी केली आहे. या भयंकर अरण्यांत तुला एकटी सोडतांना मला कांहींच का वाईट वाटूं नये?

**सावित्री**—माया—माया—ज्ञानवृद्ध ब्राह्मणा ही माया टाक, सर्व जग धर्माच्या पायावर उभारलें गेलें आहे. वरती प्रारब्धाचेंच छत पसरलें आहे. तेथें भोगवासनास्वरुप घनघोर कादंबिनी तळपत आहे; तीच ही माया. हें हास्य खेरें पण तें चंचल सौदामिनीचें. ज्ञान-सूर्याच्या आड येणारे ढग ते या मायेचेच. माया!—ही माया मोठी कठीण आहे. अज्ञानाच्या दुर्भेद्य अहंकारांत मनुष्यप्राण्याला कोंडून देण्यासाठीं वारंवार चमकणारी विद्युल्लता तीच ही माया. हें चमकणें सुखदायी नव्हे—या चमकण्याच्या अल्प प्रकाशामुळेंच मनुष्यप्राणी शेवटीं ठेंचाळून तोंडघशी पडतो. कंचुकी, ही माया टाका आणि तिच्या-बरोबरच मलाही टाका.

**कंचुकी**—आतां या पुढें मी काय बोलूं? हृदयावर ओझें पडलें आहे खरें; तें कसें बसें वाहून नेलें पाहिजे खरें. सावित्री, मी निघालों.

**सावित्री**—थांबा, तुमच्या चरणाचें पुनः दर्शन घडेल असा आधीं मला आशीर्वाद द्या.

**कंचुकी**—भगवंता, बापाचें सत्व राखण्यासाठीं—शास्त्राची मर्यादा राखण्यासाठीं—अखिल स्त्रीजातीला ध्येयस्वरूप होण्यासाठीं—ही माझी सावित्री जो हा अवर्णनीय स्वार्थत्याग करीत आहे, त्याला तूं साक्षी हो. सावित्री, सर्व स्त्रीजातीची मर्यादा तुझ्याकरवीं राखली जावो. एवढाच या गरीब ब्राह्मणाचा तुला आशीर्वाद आहे. जा—आनंदानें जा. एक आठवडाभर मी तुझी वाट पहात नगराच्या द्वारदेशींच राहतों. [जातो.]

**सावित्री**—एवढी मोठी व्याख्यानें दिलीं खरीं, पण कंचुकी जातांच माझें हें हृदय कां धडधडूं लागलें? बाबांच्या आज्ञेप्रमाणें मी निघालें खरीं, पण आतां मी जाऊं कुठें? आणि करूं तरी काय? मला भिव-विण्याकरितांच की काय लक्ष लक्ष बाहु पसरून हें अरण्य पुढें उभें राहिलें आहे——

**पद**—[ अफ्सोसके आंखोंसे. ]

**विषमा विभीषका, भयभाव-सूचका ॥**
**मज विघ्न द्यावया उभी राही सन्मुखा ॥ ध्रु० ॥**
**पसरोनियां स्वकरीं रवि ठेविती तिमिरीं**
**तरु हे विभावरी, दिनिं आणिती वद कां ॥ १ ॥**

सोबत कंचुकी होते पण कर्तव्यासाठीं म्हणून त्यांना देखील मी घालवून दिलें. आराध्य देवतेच्या दर्शनाला एकट्यानेच गेलें पाहिजे नाहीं का? सर्वसंगपरित्याग केल्याशिवाय काय एकाग्रता होणार आहे? आणि एकाग्रता झाल्याशिवाय माझी इष्टदेवता मला कसें दर्शन देईल? मना, असें घाबरूं नकोस. इष्टदेवतेचें स्मरण कर. गुरुजनांचे आशीर्वाद काय फुकट जातील असें तुला वाटतें? काय करूं? या वेळीं मला मार्गदर्शक कोण होईल?—

पद—[ सुनियो बालम मोरा. ]

पडलें घोर तरंगीं ॥ ध्रु० ॥ येइ निराशा,
लपवी हृदयेशा ॥ कोण तोडि पाशा
जनिता न जगीं ॥ १ ॥

**कालिंदी**–[ प्रवेश करून ] बाबांनीं एकूण मला फसविलेंच—

पद—[ मोहे नीके लागे शर. ]

मधुमूर्ती कोठें जाय लोपवि शशि दिग्भागीं ॥ ध्रु० ॥
उदित नवीना अरुणकरांची पुंजीकृत नव माळ ॥
जीवप्रदायी सुरम्या प्रतिमा, कोमल कलित कृशांगीं ॥ १ ॥

**सावित्री**–देवी, तपोवनाला जावयाचा मार्ग मला दाखवाल का?

**कालिंदी**–आलीस का एकदांची? मी केव्हांपासून तुझीच वाट पहातें आहें?

**सावित्री**–म्हणजे?

**कालिंदी**–माझे बाबा–मांडव्य ऋषि–तुला आहेत ना ते माहीत?–त्यांनीं तुझी वाट पहात रहावयाला मला सांगितलें होतें. चल चल, लवकर आश्रमांत.

**सावित्री**–मी आश्रयास पात्र आह कीं नाहीं याचा तुम्ही विचार केला आहे का?

**कालिंदी**–तूं राजराजेश्वर ऐस नाहींतर भिकारी ऐस–देवी ऐस किंवा मानवी ऐस–ब्राह्मणकुमारी ऐस किंवा चांडाळकुमारी ऐस–आमच्या आश्रमाजवळ तूं निराश्रित आली आहेस, त्या अर्थी तूं आमची इष्ट देवताच आहेस.

**सावित्री**–देवी–

**कालिंदी**–देवी नव्हे ताई. तपोवनांत कसला आला आहे लहान-मोठेपणाचा संबंध? गरीबीच्या संसारांतील जर थोडी सुखें चाखावयाची असतील, तर सर्वांनीं एकाच पायरीवर राहिलें पाहिजे. तूंही माझी

देवी नव्हेस आणि मीही तुझी देवी नव्हे. आह्मी दोघी बहिणी बहिणी. मी आहे ब्राह्मणकन्या आणि तूं—

**सावित्री**—क्षत्रियकुमारी.

**कालिंदी**—झालें तर. मी मोठी बहीण, तूं धाकटी बहीण. चल ये ताई—

पद–[ कांते बघ अंबरीं. ]

**सौम्या गगनांगणीं । हंसति नव तारा । कुसुमित सरसि**
**हंस रमती । गमतें जग हरिखत मुख तव बघुनि ॥ १ ॥**
**मलिन वदन तुजला ॥ नच बघवत अणुभरि भगिनी ॥**
**करिं मुख मधुर बघुनि विलसो अवनी ॥ २ ॥**

**सावित्री**-ताई, हे प्राण तुझ्यावरून ओंवाळून टाकावे असें मला वाटूं लागलें आहे. कुठली कोण मी! सहज भेटतें काय, तूं माझें स्वागत करतेस काय, आणि उभयतां बहिणी बहिणी होतों काय! सारेंच कांहीं विलक्षण. जसा माझा संकल्प विलक्षण, तसाच तुझा हा आश्रय पण विलक्षण.

**कालिंदी**—कसला तुझा संकल्प?

**सावित्री**—इष्टदेवतेच्या चरणावर हें प्राणपुष्प अर्पण करावें एवढीच—

**कालिंदी**—समजलें, समजलें. वरशोधार्थ वरवर्णिनी निघाली आहे. ताई, तूं अगदीं योग्य जागीं आलीस असेंच तुला कळून येईल, आणि तुझा इष्ट हेतु सिद्धीस गेला कीं—

पद–[ बहु विराजशील शची जशी. ]

**पथविहारिणी पतिसंगिनी । मधुयामिनी मज फाल्गुना।**
**त्यजिसी वनीं ॥ धृ० ॥ उदित गगनीं । तरुण किरणीं ।**
**बघुनि तरणी । त्यजिलिं रानीं ॥ पंकजेंही अलिगणीं ।**

मग विसरुनीहि अलिचीं गाणीं ॥ वनविलासिनी ।
स्मृति ठेविना वनविलासिनी ॥ मतिच अशि निरखिति
जगभरुनी ॥ मधुयामिनी मज पाहुनी त्यजिसी वनीं ॥ १ ॥
अंचलांगिं बंधनें सुबद्ध ठेवुनी पती । हो सती महा
उदार होउ माझि विस्मृती ॥ मधुयामिनी ॥ २ ॥

---

## प्रवेश ५ वा.

[ **तपोवन**-तापसकुमार. ]

**१ ला. तापस कुमार**—आज अनध्ययनाचा दिवस आहे, त्याअर्थीं आज शिकण्याची कांहीं गडबड नाहीं. चला तर सगळे मिळून जाउं आणि कांहीं फळें काढून आणूं. व्याकरणाच्या सूत्रादिकांनी क्षुधारूपी दुस्तर सागर पार होतां येत नाहीं असें शास्त्रच सांगत आहे.

**२ रा. कुमार**—म्हणूनच किंचित् हस्तपदाचें संचालन करून वृक्षारोहण केलें पाहिजे, आणि पक्व पक्व हरितकी, बिभीतकी, आमलकी, दाडिंब इत्यादि फळें मुखाचें प्रसरन करून त्यांत निक्षिप्त केलीं पाहिजेत.

**३ रा. कुमार**—म्हणजे दुस्तरा क्षुधासागर पार होतां येईल.

**१ ला. कु०**—हां हां, काय केलेंस हें? एकदम व्याकरणदुष्ट वाक्य बोलून गेलास? सागराला दुस्तरा म्हणून टाकलेंस त्या तुला काय म्हणावें?

**२ रा. कु०**—घात झाला—घात झाला—या व्याकरणदोषामुळें आतां सर्व नष्ट होईल—काव्य नष्ट होईल—विज्ञान नष्ट होईल—क्षुधा नष्ट होईल! व्याकरणदुष्ट जिव्हेनें जर फळें चाखलीं तर अग्निमांद्य, आम्ल, अजीर्ण, राजयक्ष्मा, विषूचिका—

**१ ला. कु०**—एवढेंचसें काय सूतिकापर्यंत देखील रोग होतील.

**सर्व**—ठरलें तर आम्ही दुस्तर क्षुधासागराच्या अलीकडच्या किनाऱ्याला आहोंत.

**२ रा. कु०**—असें जर आहे तर आतां 'किं कर्तव्यम्'

**१ ला. कु०**—कत्रण वने प्रवेष्टव्यम्?

**३ रा. कु०**—'वने प्रवेष्टव्यम्' बोलूंच नकोस मुळीं. आज कुणा तरी शेजाऱ्याच्या आश्रमांतील झाडें पाहिलीं पाहिजेत.

**१ ला. कु०**—छे छे, तसें केल्यास चोरी होईल.

**२ रा. कु०**—मला देखील यापूर्वीं असेंच वाटत असे. परंतु आतां गुरूपदेश घेतल्यापासून माझी ती भीति सपूर्ण नष्टप्राय होऊन गेली आहे.

**१ ला. कु०**—काय उपदेश घेतलास?

**२ रा. कु०**—मी आतां 'नारायण' झालों आहें.

**१ ला. कु०**—नारायण झाल्याचें काय फल?

**२ रा. कु०**—नुसतें फल? फलानि बाबा फलानि. जसें फलम्, फले, फलानि। आम्ही फलानि नारायण करतों.

**१ ला. कु०**—तें कसें काय झालें, त्याची हकीकत तर सांगशील?

**२ रा. कु०**—थांबा, हळु हळु सर्व गोष्टी मी 'नारायण' करतोंच आहें. एके दिवशीं आमचे गुरु रस्त्यानें 'नारायण' करीत होते—

**सर्व**—'नारायण' करीत होते म्हणजे?

**२ रा. कु**—म्हणजे रस्त्यानें जात होते. जातां जातां त्यांना एका झाडावर एक पिकलेला फणस दिसून आला. तेव्हां त्यांना मला सांगितलें—वत्सा, मला प्रबळ क्षुधा लागली आहे, म्हणून या वृक्षावर आरोहण करून तो फणस 'नारायण' कर. म्हणजे मी माझी जठरज्वाला निवारण्यासाठीं 'नारायण' करीन. मी म्हटलें परक्याची वस्तु मी कशी काढूं? तेव्हां खदिरांगारासाखे लाल डोळे करून

गुरु म्हणाले—अरे मूर्खा, या जगतांत परकी कोण आहे. सर्व आहे तें आपलेंच आहे. ‘अयं निजः परो वेत्ति गणना लघुचेतसाम्. ।’ हें माझें हें दुसऱ्याचें असें लघुचित्त असलेले लोकच बोलतात. परंतु, ‘उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्’—जे उदार आहेत ते जगातलीं सर्व कुटुंबें आपल्या कुटुंबासारखीं मानतात. हा उपदेश ऐकल्या दिवसापासून त्यांचा हा प्रिय शिष्य यत्किंचित् तरी उदारचरित होण्याचा प्रयत्न करीत आहे—म्हणजे शेजाऱ्यांच्या बागेंतील आंबे, पेरु, फणस यांच्यावर यथास्थित ताव मारून ‘नारायण’ करीत आहे.

[ ढेंकर देतो. ]

सर्व—ठीक आहे. ‘महाजनो येन गतः स पन्थाः’

१ ला. कु०—चला तर मग आपण जाऊं.

२ रा. कु०—मित्रा, पण पहा समोरून एक दंपतीच इकडे येत आहे.

१ ला. कु०—खरेंच. एक जायापती—जंपती—किंवा दंपती.

सर्व—इति निपातनात् साधु.

२ रा. कु०—चला तर मग आपण ससंभ्रमानें सलज्ज होऊन दण्डायमान राहूं. [ तुंबरू व अश्विनी प्र. करतात. ]

तुंबरू—आम्ही कुठें आलों कांहीं तुला अजमास आहे का? मला वाटतें हाच तो ऋषींचा आश्रम असावा.

अश्विनी—हे सारे उभे आहेत हे ऋषींचे आश्रमच वाटतें.

तुंबरू—ऋषींचे आश्रम नव्हेत. ऋषींना सारे श्रम होतात ते यांच्यामुळेंच. हे तापसकुमार, अहो बाबांनो, ऋषींचा आश्रम कोठें आहे तो दाखवाल का?

१ ला. कु०—ऋषी? त्यांचा आश्रम?

२ रा. कु०—ऋषी कधीं आश्रमांत रहात नसतात. तुला ऋषी हवे असतील तर त्या बिल्ववृक्षाखालीं जाऊन ‘नारायण’ कर.

**तुंबरू**–'नारायण' करूं म्हणजे?

**१ ला. कु०**–शोध कर, शोध कर.

**अश्विनी**–[ हळुच तुंबरूला ] बरे मुलगे दिसत आहेत–बरे गोरे गोमटे आहेत. लग्नाला तयार आहेत कीं काय ते विचारून तर पहा.

**तुंबरू**–आहा–छान् सांगितलेंस. बाबांनो, तुम्हाला मी कांहीं सांगणार आहें, तेवढें ऐकून घ्या. ही जी माझ्याबरोबर स्त्री आहे, तिचा मी पती. [ अश्विनी मुरका मारते. ]

**१ ला. कु०**–आणि तूं तिचा दंपती.

**तुंबरू**–अरे बाबा ही माझी वाडिलोपार्जित संपत्ति. तुमचे दंपती मला काय कळणार. मी आहें मूर्ख—

**अश्विनी**–भलतेंच कांहीं तरी.

**तुंबरू**–अग तूं उगीच रहा ग. मी आहें मूर्ख. आहेंच जर मूर्ख तर मग कबूल करावयाला लाजा कां? तेव्हां मी आहें मूर्ख. मला शास्त्र बिस्त्र कांहीं समजत नाहीं.

**१ ला. कु०**–हं, समजलों, सर्जे पिता माता, भ्राता भगिनी, पती पत्नी—

**२ रा. कु०**–साधु साध्वी,—

**अश्विनी**–मी नाहीं ग बाई साध्वी. माझ्या सासूचें नाव होतें साध्वी.

**२ रा. कु०**–ठीक, ठीक. कबूल तूं साध्वी नाहींस. पण तुम्ही इकडे कुणीकडे 'नारायण' करीत अहांत.

**तुंबरू**–तेंच तर मी तुम्हाला विचारीत आहें ना?

**१ ला. कु०**–हं समजलों. किं कर्तव्य विमूढ होऊन तुम्ही इतस्ततः भ्रमण करीत अहांत.

**तुंबरू**–आहा! आतां कसें समजलें? आतां एक गोष्ट विचारतों त्याचें उत्तर द्या. आपण विवाह करतां का?

**१ ला. कु०**–काय, आम्ही विवाह करीत नाहीं?




१ ता. कुमार—आम्ही सगळे मिळून तुझ्या भार्येला वि-वाह करून घेऊन जाऊं.

**२ रा. कु०**—विवाह? काय विवाह? वि पूर्वक वह् धातु घञ्.

**तुंबरू**—तुमचें घण् घण् कांहीं मला ठाऊक नाहीं. तुम्हीं विवाह करता का?

**१ ला. कु०**—कोण म्हणतो आम्ही विवाह करीत नाहीं म्हणून?

**२ रा. कु०**—अष्टौप्रहर आम्ही वि-वाहच करीत असतों. यज्ञकाष्ठ वि-वाह करतों, अरणी वि-वाह करतों, समिधा वि-वाह करतों—

**१ ला. कु०**—ही तुझी भार्या चालून चालून दमली आहे, तिच्यानें जर चालवत नसेल तर आम्ही तिला वि-वाह करून आश्रमांत घेऊन जातों.

**अश्विनी**—तुझें फुटलें कपाळ तें, मेल्या—

**१ ला. कु०**—लांकडाच्या भाऱ्या वि-वाह करण्याची आम्हाला संवयच आहे. मग तुझी ही भार्या आम्ही वि-वाह करणार नाहीं काय? मी एकटाचसा काय आम्ही सगळे मिळून तुझ्या भार्येला वि-वाह करून घेऊन जाऊं.

**अश्विनी**—अरे माकडांनो, [ तुंबरूला ] कुठें तरी मला घेऊन आलांत हे?

**तुंबरू**—बाबांनो, या वि-वाहाच्या भानगडींत तुम्हीं पडूं नका. मी एकदा विवाह केला तो हा असा रानोमाळ भटकतों आहें. चल् चल, ये अश्विनी, आपण येथून पळून जाऊं.

**३ रा. कु०**—अरे चुप, ते पहा मांडव्य ऋषि समोरून इकडे येत आहेत—चला आपण दुसऱ्या बाजूनें पळून जाऊं. [ जातात. ]

**तुंबरू**—हां, तो पहा मांडव्य ऋषींचा आश्रम. चल आपण तिकडेसच जाऊं. [ जातात व दुसऱ्या बाजूनें मांडव्य व सावित्री प्रवेश करतात. ]

**मांडव्य**—सावित्री, पतिशोधार्थ निघालीस ती माझ्या आश्रमांतच आलीस हें पाहून मला फार आनंद होत आहे.

**सावित्री**—इष्टदेवतेचा शोध तपोवनाशिवाय दुसऱ्या कुठें लागणार ?

**मांडव्य**—एकूण, तुझी आशा सफल होण्यास कांहीं कारणें मिळालीं आहेत वाटतें ?

**सावित्री**—कारणें कांहीं नाहींत. पण आश्वासन मिळालें आहे.

**मांडव्य**—कोणाचें आश्वासन ?

**सावित्री**—आतांच मला एक तापसकुमारी भेटली. तिनेंच मला आश्वासन दिलें आहे व तीच मला या आश्रमांत घेऊन आली.

**मांडव्य**—हां, समजलों. कालिंदीच ती. सावित्री, ती माझा पाळलेली मुलगी आहे. तीच तुला इकडे घेऊन आलीना ?

**सावित्री**—होय महाराज.

**मांडव्य**—सावित्री, किती झालें तरी तूं राजकुमारी आहेस. आज तुझें आतिथ्य करण्याचा सुप्रसंग मला आला आहे, हें मी माझें मोठें भाग्य समजतों.

**सावित्री**—जशी कालिंदी तशीच मला समजा, आणि—

पद–[ कानन सुनाइये. ]

**काननगता जशी नांदे लता विलासें ॥ धृ० ॥ कुमारि**
**होवो पतिच्या संगें । सौख्यरता धर्मावेशें ॥ १ ॥**

**पहिला अंक समाप्त.**

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

[ तपोवन—कालिंदी व सनातन. ]

( या प्रवेशांत कालिंदीचें वस्त्र निळें असावें. )

**सनातन**—आणखी किती दूर मला ओढून नेणार आहेस?

**कालिंदी**—हं—हळु—हळु, घाई करूं नका. हीं आलोंच म्हणायचें.

**सनातन**—आलों, आलों—पोचलों, पोचलों म्हणत एक कोसभर मला ओढून आणलेंस.

**कालिंदी**—त्यांत एवढें तें काय झालें? घटकाभर कालिंदी दिसली नाहीं तर एका घटकेंत वीस कोसाची मजल मारायला देखील कांहीं वाटत नाहीं. हा तर कसला दोन चिंतींचा कोस. कालिंदीचा हात धरूनही एवढी मजल मारवत नाहीं?

**सनातन**—अरे विसरलों. फळें काढून आणावयाचीं होतीं.

**कालिंदी**—मग एवढा वेळ पंपा सरोवराच्या तीरीं बसून केलें काय?

**सनातन**—काय केलें सांगूं?—मी नुसता पहात राहिलों होतों-आणि-

पद—[ चारुगात्रि—मारिकोल्लुवेणू. ]

**नील कांति नीलांबरीं, तोंवि सलिलिं या ॥ नाचे कमल,**
**शोभे विमल, नीलांचल जया ॥ तोंवि सलिलिं या ॥ ध्रु० ॥**
**नीलपणें नील जळीं ॥ नीलें कमलें फुललीं ॥ मृष्टी करित**
**तुष्टी निरत वृष्टी मधुमया ॥ १ ॥**

**कालिंदी**—निळीं कमळें पाहून कुठल्या त्रेतायुगाची आठवण झाली? तरी मघां मी म्हटलेंच एवढी तंद्री कसली लागून राहिली होती?

हळुच जाऊन मी जटासुद्धां ओढली. तरी देखील स्तब्धच. सगळा हिमालय पर्वतच जणुं काय डोक्यावर ठेवलेला.

**सनातन**—छे ! थट्टा करूं नकोस. मी फळें आणतों.

**कालिंदी**—घाई करूं नका, घाई करूं नका. माझ्या बरोबर चला, फळें फळें तीं काय? पुण्यफळ देखील आणून देईन.

**सनातन**—म्हणतेस तरी काय?

**कालिंदी**—आणखी म्हणायचें तें काय? तुम्हीं गम्मत करीत इकडे तिकडे उडतां बागडतां, आणि थोडेसे कष्ट करून तुमच्यासाठीं आम्ही बायकानीं थोडासा पुण्यसंचय जर न केला तर आम्ही सहधर्मिणी कसल्या—उठा. दोनच पावलें चालावयाचें आतां.

**सनातन**—कुठें जायचें हें जर कळलें नाहीं, तर हा सनातनशर्मा आतां एक पाऊलसुद्धां हालणार नाहीं.

**कालिंदी**—कुणी म्हटलें कुठें जायचें आहे म्हणून? कुठेंच जायचें नाहीं बरें. मी जर बरोबर आहें तर जायची वार्ताच मुळीं कशाला? 'गृहिणी गृहमुच्यते' माझ्या बरोबर चालायचें म्हणजे घरांतच असल्यासारखे नव्हे का?—

**पद**—[ तेरे नैनाने जादू. ]

**नभ वितान साजे छत्र धरी ॥ शीतकरा शशि हा वितरी ॥ धृ० ॥ दुग्धफेननिभ शय्या गृहिंची ॥ त्याहुनि तृणिंची राजि बरी ॥ १ ॥ नंदनवन पारिजात फलसे । खद्योतहि चमकति भितरीं ॥ २ ॥**

**सनातन**—हं ! आणि तूं त्या नंदनवनांत विहार करणारी रंभा असेंच ना?

**कालिंदी**—मुळींच नाहीं ! अलीकडे बरेंच दिव्यज्ञान होऊं लागलें आहे असें वाटतें ! मला अप्सरा ठरवतांना मनाला कांहीं वाटलें का?

हे भले कवी सुंदर स्त्रीला अप्सरेची उपमा देतांना आपल्या अभिरुचीचा ओंगळपणा मात्र जगापुढें मांडतात. सौंदर्य कितीका असेना, अप्सरा म्हणजे वेश्याच. असल्या वेश्यांच्या उपमा कुलस्त्रीला देण्यापेक्षां एकाद्या पतिपरायणा चांडाळणीची उपमा जरी दिली असती तरी गोड वाटली असती. चला तुम्ही, मी आतां मुळीं बोलतच नाहीं.

**सनातन**—रागाऊं नकोस, रूपानें तूं रंभा—हृदयांत मर्तिमती विश्वेश्वरी.

**कालिंदी**—पुनः रंभा!

**सनातन**—चुकलों, चुकलों, अशीं रागावूं नकोस. तुझ्यासाठीं मी फळें मुळें शोधीत अरण्यांत हिंडतों, त्याचा उद्देश काय बरें? तुला समाधान व्हावें म्हणूनच ना? मग तूं अशी विरहिणीसारखी अरण्यांतून माझ्यामागून हिंडूं लागलीस तर माझ्या या तळमळण्याचा काय उपयोग?

**कालिंदी**—म्हणजे तुम्ही रानांतून हिंडावें, आणि मी तुमची वाट पहात घरींच बसून रहावें! वाः! चांगला उपदेश!

**सनातन**—कां राहूं नये?

**कालिंदी**—कसें राहवेल बरें? घटकाभर माझें मन गुंतावयाला कुणी सखी तरी पाहिजे होती. आपण तिकडे सत्यवानाबरोबर घटकांच्या घटका बसून रहायचें, आपल्याला मित्र आहे. मला दुसरें कोण आहे बरें? तो कांहीं आपल्याला सोडीत नाहीं. बरें त्याचें लग्न तरी झालें असतें तर माझ्या करमणुकीला मला एक सखी तरी मिळाली असती.

**सनातन**—तें सर्व खरें पण राज्यभ्रष्ट झालेल्या आंधळ्या राजाच्या मुलाला कोण आपली मुलगी देईल?

**कालिंदी**—आणि जर मी एकादें स्थळ दाखवून दिलें तर?

**सनातन**—अगदीं अशक्य. तूं वनांत रहाणारी आहेस. राजेलोकांचे मानापमान तुला कोठून कळणार? जरी द्युमत्सेन हा राज्यभ्रष्ट

झाला आहे, तरीही राजकुलांतील मुलीखेरीज इतर कोणतीही मुलगी तो सून म्हणून पसंत करणार नाहीं.

**कालिंदी**–आणि राजकुलांतीलच मुलगी दिली तर?

**सनातन**–तर मग कालिंदी, शंकरानें जशी गंगेला जटेंत ठेविली आहे तशीच तुला जटेंत बांधून सारें त्रिभुवन एकवेळ फिरून येईन.

**कालिंदी**–पुरे झालें हें गंगाजळी बोलणें.

**सनातन**–मग होऊंद्याच एकदा प्रेमाचा वर्षाव. शंकराला निशा यायला भांग तरी हवी होती, पण तुझ्या या प्रेमाच्या भांगेनें मी अगदीं बेहोष होऊन गेलों आहें.

**कालिंदी**–पुरे झाली थट्टा. तो पलीकडे काय चमत्कार चालला आहे पाहिलात का?

**सनातन**–कुठे, कुठे? मला कोठें दिसत नाहीं तो?

**कालिंदी**–पाहिल्याशिवाय कसा दिसेल?

**सत्यवान**–[ प्रवेश करून ] सनातन, सनातन–ही पाहिलीस का गंमत? निसर्ग देवतेची असली अद्भुत लीला तुला कोठें दिसून आली होती का?

**सनातन**–कसली लीला? कुठे आहे ती?

**सत्यवान**–या पंपातीरावर. चल ये तुला मी दाखवतों.

**सनातन**–[ कालिंदीकडे पहात ] कसा येऊं? मला इथेंच काय तें सांग एकदांचें.

**सत्यवान**–छे छे. त्या शोभेचें वर्णन करणें भाषेच्या पलीकडचें आहे. मी जर तिचें वर्णन करूं लागेन तर मुळची शोभा मात्र कमी होईल, पहा—

**पद**–[ सघन घन आमराई. ]

**धवलकरें वनभागीं । शशिदीप्त धरा नाचे ।**
**विलासीं, ही सृष्टींतूनि होइ काय जागी ॥ धृ० ॥**

**कालिंदी**–एवढेंच का? हें तर आम्ही रोजच पहात आलों आहोंत. मला वाटलें होतें याच्यापेक्षां कांहीं तरी अजब गोष्ट तुम्ही पाहिली म्हणून. एवढ्यासाठींच का असे वेड्यासारखे पळत आलांत ते?

**सत्यवान**–एवढ्यानेंच काय झालें आहे—

( चाल सदर. )

**पंपा झाली धवला, नच नभिंची दीप्ती ही प्रबला,**
**विकास कैंवि येत जगासि कुणी ही रमणी वनी नव**
**पादप तटीं स्थित रमलि संग त्यागी ॥**

**कालिंदी**–असलीं काव्यें नकोत मला ऐकायला. काय तें आम्हांला स्पष्ट सांगा.

**सत्यवान**–तूंच सांग कालिंदी, मी आतां काय पाहिलें असावें असें तुला वाटतें?

**सनातन**–झाडावर बसलेलें एकादें माकडाचें पोर.

**कालिंदी**–अगबाई पण हें काय? [ अशोक वृक्षाखालीं सावित्री बसलेली आहे असा देखावा एकदम दिसतो. ] हें काय? पहातां पहातां हा अशोक वृक्ष एकाएकीं फुलून निघाला.

**सत्यवान**–हीच–हीच ती. पूर्वीं कधींतरी पाहिली होती खास!—

पद–[ प्रेम नोहे. ]

**कोमलांगी । होइल कां ही जागी ॥ धृ० ॥**
**चंचला विद्युल्लता पूंजीकृता नभविहसिता ॥**
**शर्वरी तम खर्वकृत नत उर्वरांगण भूषिता ॥ १ ॥**

**कालिंदी**–पाहिलीत ना कशी गंमत झाली ती?

**सत्यवान**–सनातन–सनातन, कुठें आहेस तूं? कुठें आलों आहे मी? इतका दूर? हिच्यापासून दूर राहूं?

**कालिंदी**–पहा पहा तरी, सत्यवान असें काय करीत आहे तें.

**सनातन**–मित्रा, असें काय हें?

**सत्यवान**—मोहिनी—खरोखरच मोहिनी. पण ही इथें कां आली? पुढें जाऊं का? तिला विचारूं का? काय विचारूं? काय बोलूं छे, छे मला कांहींच सुचत नाहीं. [ जातो. ]

**सनातन**—मित्रा—मित्रा, चाललास कुठें? हें काय आणखी लचांड?

**कालिंदी**—नुसतें तोंड वासून उभें राहून मित्रा मित्रा म्हणून ओरडलें म्हणजे कांहीं झालें नाहीं. जा, जा पळा त्याच्या मागोमाग जा. तो झाला आहे भ्रमिष्ट. काय करील आणि न करील याचा नेम नाहीं.

**सत्यवान**—जाऊंच तर? [ जातो आणि मांडव्य येतो. ]

**मांडव्य**—बाळे कालिंदी, पाहिलेंस ना—

श्लोक [ मालकंस. ]

**आमूलतो विद्रुमरागताम्रम्।**
**सपल्लवं पुष्पचयं दधानः॥**
**कुर्वन्त्यशोका हृदयं सशोकम्।**
**निरीक्ष्यमाणा नव यौवनानाम्॥ १॥**

पहा, मुली पहा—मुळापासून शेंड्यापर्यंत हा अशोकवृक्ष अकालीं का फुलला हें तुला ठाऊक आहे? ही पहा मेघमाला नभोमंडलांत नृत्य करीत आहे. आसमंद्भागांतील सर्व तरुलता आनंदानें डुलत आहेत. हा सर्व उत्सव कोणत्या वरवर्णिनीचें शुभागमन सुचवीत आहे तें तुला ठाऊक आहे काय?

**कालिंदी**—बाबा, आपल्या आनंदमय विशाल हृदयाचें हें प्रतिबिंब आहे असेंच मला वाटतें.

**मांडव्य**—नव्हे मुली, ती पहा मूर्तिमती स्त्रीधर्माची ज्योति अशोकवृक्षाच्या छायेखालीं झळकत आहे. आज स्त्रीधर्माचा उदय झाला. ही अरुणप्रभा आहे; पण बाळे कालिंदी, माध्यान्हीच्या प्रखर तेजांत ज्यावेळीं या प्रभेची परिणती पहाशील, त्यावेळीं तुझे डोळे दिपून जातील. [ जातो. ]

**कालिंदी**–[ पुढें होऊन ] ऊठ, ऊठ सावित्री. एवढें कसलें ध्यान करीत वसली आहेस?

**सावित्री**-[ जागी होऊन ] कोण, कालिंदी?

**कालिंदी**–बाबा आतांच येथून गेले तरी तूं आपली डोळे मिटून स्वस्थ बसलेली, या तुला म्हणावें तरी काय?

**सावित्री**–खरेंच का? चल तर मग आपण गुरुमहाराजांचे पादवंदन करण्याकरितां जाऊं. [ जातात. ]

## प्रवेश २ रा.

[ सत्यवान आणि नारद. ]

**नारद्**–काय अविचार हा मुला. गोंडस दिसणाऱ्या एका रमणीच्या लहानशा मुखाला पाहून काय वेडावून गेला आहेस हा?

**सत्यवान**–मुनिराज, मी लहानपणापासून जरी या तपोवनांत वाढलों गेलों आहें, तरिही मी रजोधर्मगुणविशिष्ट क्षत्रियाचा मुलगा आहें. मला क्षमा करा. माझा नाइलाज आहे. सौंदर्याच्या दर्शनानें मनावर घडणाऱ्या आघातांचा प्रतिकार करण्याइतकें सत्वाचें बल माझ्या अंगीं नाहीं.

**नारद्**–नसल्यास आणण्याचा प्रयत्न कर.

**सत्यवान**–आणण्याचा प्रयत्न केव्हां करूं? आघात व्हावयाचा तो झालाच–मनाला शिथिलता यावयाची ती आलीच–आतां प्रयत्न एकच. आतां प्रयत्न फक्त तिच्या भेटीचे. आतां प्रयत्न फक्त तिचें प्रेम संपादन करण्याचे—

**नारद**—सावध हो, मुला—सावध हो. अविचार करूं नकोस, पतंगासारखा दीपज्योतीवर झांप घेऊं नकोस—

**सत्यवान**—आतां झांप घ्यावयाची राहिली आहे कुठे?—

पद–[ ता ना नादर्दीं. ]

**नच धवल करिं पाहुनि धडके दीपा चपल गति वरीः**
**धरि विकच सुमसम सहज वरित मृति अविकल ॥धृ०॥**
**चित्त धांवे तें रमावें भस्म व्हावें दीप्तिनें ॥ ही काया**
**जाया कां या भीती वाटे कां तरीं ॥ १ ॥**

**नारद**—मुला, मी तुला वेळीं सावध करीत आहें; माझ्या उपदेशाचा अव्हेर करूं नकोस. सावित्री सौंदर्यवती आहे--गुणवती आहे—इतकेंच नव्हे, तर जगांतील सर्व सात्विकतेची दीप्तिमान ज्योति आहे. पण या ज्योतीला स्पर्श करण्याचा जर प्रयत्न करशील तर जळून जाशील हें ध्यानांत ठेव.

**सत्यवान**—केव्हांतरी जळावयाचें हें आहेच. मला सात्विकतेच्या ज्योतीवरच जळूं द्या—

**नारद**—काय हा अविचार! मुला, जरा स्वस्थ हो—पण तुला स्वस्थ हो म्हणून सांगण्याचा तरी काय उपयोग? कामुक मनुष्यांच्या मनाची स्थिति अशीच व्हावयाची. जो एकदां कामिनीच्या तडाक्यात सांपडला, तो सर्वस्वी आपला घात करून घेतल्याशिवाय जागा होणार नाहीं. जो जो त्याला उपदेश करण्याचा प्रयत्न करतो, तो तो त्याला वैऱ्यासारखा भासत असतो—

**सत्यवान**—तसेच तुम्ही देखील मला वैऱ्यासारखे भासत अहांत. माझें मन ज्या जागीं गुंतलें आहे तेथून हालविण्याचा जो जो प्रयत्न करील, तो तो मनुष्य असो वा देव असो, यक्ष असो वा गंधर्व असो, मुनी असो वा तपस्वी असो, त्याच्या शब्दाला मी काडीइतकेंसुद्धां मोल देणार नाहीं.

**नारद**—माझ्या सांगण्याची परमावधी झाली. जा तुला वाटेल तसें कर—स्वतःचा नाश करून घे. तुझ्या अनुषंगानें असतील त्यांच्याही नाशाला कारणीभूत हो, आणि शेवटीं चोहींकडून पेटलेल्या संकटांच्या वणव्यांतून जी उपदेशाची ठिणगी तुझ्या हृदयावर आदळेल, तीच तुला अनुभवसिद्ध ज्ञान प्राप्त करून देवो—

**सत्यवान**—मला उपदेश नको आहे आणि अनुभवही नको आहे. मला पाहिजे आहे ती वस्तु एकच.—

पद—[ पायि पायि तोरे. ]

**कालकामिनी तिजसम दयिता ॥ धृ० ॥ निंद्या झाली जी मुनिराया । ती सुरवंद्या मजला वरितां ॥ १ ॥ भव्या अटवी प्रिय मुनिलागीं । प्रासादांगण नृपकुल जनिता ॥ २ ॥**

[ जातो. ]

**नारद**—गेला वेडा! जा म्हणावें कांहीं हरकत नाहीं. कुणालाही केव्हांही केलेला सदुपदेश सकृद्दर्शनीं जरी फोलसा वाटतो, तरी हृदयांत झालेलें त्याचें सूक्ष्म बीजारोपण कधींना कधीं तरी प्रचंड वृक्षाच्या स्वरुपांत परिणत होत असतें. जावें तर आतां. राजा अश्वपतीची गांठ घेऊन त्यालाही वेळींच सावध केलें पाहिजे. [ जाऊं लागतो तों समोरून तुंबरू व अश्विनी प्रवेश करतात. ]

**तुंबरू**—बस्स—वांचलोंच म्हणावयाचा. अश्विनी, हे पहा कोणी तपस्वी येत आहेत, यांना नमस्कार कर पाहूं आधीं. मुनिराज, आम्हीं गरीब बिचारीं दोन माणसें चक्रव्यूहांत सांपडलों आहोंत, त्यांतून तुम्हींच आतां आम्हांला सोडवा. [ साष्टांग नमस्कार घालतो. ]

**अश्विनी**—नमस्कार करतें मुनिराज.

**नारद**—कोण तूं भद्रे?

**अश्विनी**—आम्ही भद्रे नाहीं महाराज शूद्रे.

**नारद**—तुम्ही येथें कशाला आला अहांत?

**तुंबरू**—आम्ही पळापळ करीत आहों महाराज.

**नारद**—जगांत आम्हां सर्वांची पळापळच चालली आहे म्हणावयाची!

**तुंबरू**—आं! म्हणतां काय महाराज? तुमची देखील पळापळच चालली आहे?

**नारद**—मीच एकटा काय! सारें जग कालचक्राच्या झटक्यासरशीं पळतच आहे.

**तुंबरू**—ऐकलेंस अश्विनी?

**अश्विनी**—मग आमच्या घरादारांची काय वाट?

**तुंबरू**—कसलें घरदार आणि कसला संसार? जगाची पळापळ जर आमच्याबरोबर सुरू झाली असेल तर इतक्या अवधींत आमचें घरदार चूरमार होऊन गेलें असेल.

**नारद**—तुम्हीं चालला अहांत कुणीकडे?

**तुंबरू**—तेंच तर तुम्हाला विचारीत आहें. तेवढें कळलें तरच आता आमची धडगत.

**नारद**—ठीक आहे. कुठें जावयाची तुमची इच्छा आहे;

**अश्विनी**—आपलें नांव काय महाराज?—हो ज्याच्या बरोबर जायचें, त्याचें नांव तरी निदान ठाऊक असावें.

**नारद**—या देहाला नारद म्हणतात बाई.

**अश्विनी**—नाहीं ग बाई नाहीं—वाऱ्यापेक्षां पळणारे तुम्हीं. जगाबरोबर पळायाला तुमची सोबत आह्मांला काय कामाची?

**नारद**—मी तुमच्याबरोबर चालेन, मगतर झालेंना? पण कुठें-जावयाचें तें सांगाल कीं नाहीं.

**तुंबरू**—कसलें जाणें आणि जावयाचें कुठें? ही माझी बायको किती नाजुक आहे, पाहीलीत ना? [अश्विनी मुरका मारते] हे पहा हिचे पाय. यांचा नुसता स्पर्श झाला तर कांटेसुद्धां मोडतात. असल्या या नाजुक पायांनीं साऱ्या जगांत परिभ्रमण करावें, असें सांगण्याइतके तुह्मीं निर्दय अहां काय?

**नारद**—तुह्मां उभयतांनाही मुळींच कष्ट होणार नाहींत, अशा रीतीनें घेऊन जाईन.

**अश्विनी**—नको ग बाई. नको—नको—नको. ऐकलें का? यांचा देखील वि—वाह करण्याचा उद्देश दिसतो.

**नारद**—विवाह—? कुणाचा विवाह?

**तुंबरू**—भिउं नका मुनिराज—तुह्मांला विवाहाचें मुळींच भय नाहीं. ही असली अश्विनी—घोडीच ही—तुमच्या खांद्यावर चढवून मी मारून टाकूं इच्छित नाहीं.

**नारद**—हं, समजलें—वि—वाह.

**तुंबरू**—हं—हं! नि—पूर्वक बहुधा घण् घण्.

**अश्विनी**—घण् घण् कसलें तें. मेलीं तीं माकडें, ऋषींचीं पोरें. त्यांचें तें काय एवढें ध्यानांत ठेवावयाचें.

**तुंबरू**—महाराज, तुमच्या हातांत काय हें? मुसळ का? या मुसळाला सांगा मला वि—वाह करून न्यावयाला.

**नारद**—कुठें जावयाचें आहे तें आधीं सांगशील कीं नाहीं?

**तुंबरू**—आम्ही मद्र देशास जाणार आहोंत.

**नारद**—तुह्मी राजकुमारी सावित्रीबरोबर आलां होतां काय?

**तुंबरू**—बरोबर नव्हतों आलों. आम्हीं येऊन पाहिलें तों राजकुमारी येथेंच आहे. एक तुमच्यासारखेच जटादाढीवाले बुवा भेटले; त्यांनीं राजकुमारी आणि तिचा वर इथेंच भेटेल असें सांगितलें होतें.

**अश्विनी**—राजकुमारी भेटली, तिचा वर देखील पाहिला—पण लग्न कुठें झालें? उगीच आह्मी या माळा गुंफुन घेऊन फिरत आहों झालें.

**नारद**—तुह्मी मालाकार आहांत तर?

**अश्विनी**—होय महाराज. मी आणि आमचे हे—हे शिवपूजेसाठीं राजकुमारीला फुलें आणून देण्याचें काम आह्मी उभयतां करीत असतों.

**तुंबरू**—काय सांगावें महाराज. आजपर्यंत नुसते तीरच होतों. सांगितलें कीं पड तीरासारखा—पण आतां आमची झाली आहे धनुकली. काय या सावित्रीला सांगावें? हिनें वर पाहिला, आह्मांलाही पाहिलें. पण लग्न मात्र केलें नाहीं.

**अश्विनी**—आणि आमच्या माळाही मागून घेतल्या नाहींत.

**नारद**—माळा मागून घेण्याची वेळ अझून कदाचित् आली नसेल!

**तुंबरू**—पहा महाराज. आह्मी देखील फार मानी आहोंत. राजकुमारीनें आह्मांला बोलाविलें नाहीं. म्हणून आह्मींही जाऊन तिला कांहीं विचारिलें नाहीं.

**अश्विनी**—हो, हे मला जाऊन विचार म्हणून पुष्कळ सांगत होते, पण मी म्हणून कांहीं गेलें नाहीं. कां जाईन? आम्ही गरीब नोकर चाकर माणसें खरीं, पण आह्मांला कांहीं मानपान नाहींत!

**नारद**—माळा काय केल्यात?

**अश्विनी**—जेव्हां कुमारीनें माळा मागितल्या नाहींत तेव्हां या करंडींत घालून घेऊन फिरत आहोंत.

**नारद**—कुठें आहेत पाहूं? [ अश्विनी माळा दाखवते ] वाः! या अजून जशाच्या तशाच आहेत.

**तुंबरू**—जशाच्या तशाच म्हणजे? सावित्रीच्या आणि तिच्या वराच्या नांवानें गुंफलेल्या या माळा सुकतील कीं काय?

**अश्विनी**—हो—माळा सुकतील कीं काय! तसें झालें तर आह्मी उभयतां नदींत उडी घेऊन जीव देऊं.

**नारद**–भिण्याचें कांहीं कारण नाहीं. सप्तसागर शुष्क होतील, सूर्याचे किरण देखील निष्प्रभ होतील. पण तुह्मी गुंफलेल्या या माळा कांहीं सुकणार नाहींत. पहा मुली, अजून माळांचा उपयोग करण्याची वेळ आली नाहीं म्हणूनच तुमच्या राजकुमारीनें त्या मागून घेतल्या नाहींत. आजपासून एक वर्षपर्यंत थांबा. तोंपर्यंत तुमच्या या माळा अशाच प्रफुल्लित रहातील, आणि एक वर्ष संपतांच यांचा उपयोग करण्याची वेळ येईल. [ जातो. ]

**तुंबरू**–अरेच्या, बुवाजी बोलतां बोलतां निघून गेले.

**अश्विनी**–जाईनात का, त्यांनीं एकवर्षपर्यंत थांबावयाला सांगितलें आहे ना ?

**तुंबरू**–हो असें तर खरेंच. मग पुढें कसें काय ?

**अश्विनी**–आतां पुढें काय—

पद -[ कामानिया काहे खडी हो. ]

**वन सुमें ठेवूं रचोनि विशाल करूं सुदाम ॥ विशाल करूं सुदाम, त्यजूं निजधाम, जपूं तन्नाम ॥ रचोनि विशाल करूं सुदाम ॥धृ०॥ तापद काननिं, राहुं सुखानें, एक मुखानें, गाउनिं गाणें, सरला, मृदुला, जशी ती उदासी विलासा मुके । हळहळ तळमळ तिजसम काम ॥ १ ॥**

[ जातात. ]

## प्रवेश ३ रा.

[ अश्वपति आणि नारद. ]

**नारद**—महाराज, तुमच्या शालीनतेनें जगांतील सर्व राजेसुद्धां मान वांकवीत आहेत. मीही तुमच्या या गुणांला भुलून भेटावयास आलों, यांत आश्चर्य वाटावयाचें काय कारण आहे? महाराज, तुम्ही उदार अन्तःकरणाचे अहांत, योग्यांनींसुद्धां तुम्हांला मान द्यावा अशी तुमची योग्यता आहे. तुमची सहधर्मचारिणी दक्षपत्नी प्रसूतीसारखीच महाभाग्यशाली आहे. तेव्हां अशा थोर पुरुषांची भेट मला तीर्थदर्शनासारखीच वाटावी यांत कांही नवल नाहीं.

**अश्वपति**—बरींच वर्षेपर्यंत आपली पदधूली या दासाच्या स्थानाला लागली नाहीं ती आज लागल्याचं पाहून मला अत्यंत आनंद होत आहे. जर आमच्या अंगीं महाराजांना दिसण्याजोगे कांहीं गुण आले असतील तर ते याच पायांच्या कृपेनें. गृहस्थाश्रमधर्माच्या अवलंबनानें जर आम्हांकडून कांहीं धर्मसंचय झाला असेल, तर त्याचे अधिकारी आपणच अहांत. माझें मागणें तें एवढेंच कीं मद्रदेशाच्या राजवंशास अधर्माचा स्पर्शदेखील होऊं नये.

**नारद**—तुमच्या वंशाला पापस्पर्श? आणि त्या पापाची उत्पत्ति तुमच्यापासून? छे, छे, महाराज—असें कधींही होणार नाहीं.

**अश्वपति**—मुनिराजांच्या वचनाला मी कसें नांव ठेवावें? पण एवढें खरें कीं या मद्रवंशावर एक भयंकर संकट यावयाचा उपक्रम होऊं लागला आहे. आतां केवळ तीन रात्रींचाच अवकाश आहे. तेवढी वेळ टळून गेली कीं माझें अधःपतन झालेंच.

**नारद**—अशा कोणत्या संकटाचें तुम्हाला भय वाटत आहे, तें मला सांगाल काय?

**अश्वपति**–काय वेडा मी ? मला आतां कसलें भय ? स्वतः भगवान नारद ऋषि माझ्या घरीं आले असतां पापस्पर्शाची शंका माझ्या मनांत यावी तरी कां ?

**नारद**–राजा, तुझी भक्ति खरोखर अलौकिक आहे. तुझ्या या उदार हृदयाला झालेला पापाचा स्पर्श असंख्य तीर्थभ्रमणरूप महापुण्यांत कधींही परिणत झाल्यावांचून रहाणार नाहीं. पण तुमच्यावर येणारें हें कोणतें संकट तें तरी मला सांगाल काय?

**मालवी**–[घाईघाईनें प्र. करून]–महाराज, सावित्री आली–हे कोण? नारदमुनी ? भगवन्, मी प्रणाम करतें. केवढें आमचें नशीब कीं तुह्मीं याच वेळीं येथें आलां आहांत. मुनिराज, अजूनपर्यंत आमचें घर अंधकारमय झालेलें आहे. आतां माझी सावित्री येत आहे ती शुभ समाचारच घेऊन यावी असा मला आशीर्वाद द्या.

**नारद**–सावित्री आली? सावित्री कुठें गेली होती? कसला अंधकार म्हणतां? मला तर कांहींच कळत नाहीं.

**मालवी**–हें काय म्हणतां मुनिराज? आपल्या ज्ञानदृष्टीवर एवढें कसलें झाकण पडलें? त्या दिवशी एक महर्षी आले तेही आपल्याला कांहीं माहीत नाहीं म्हणूं लागले, आज आपण आलांत ते आपणही कांहीं माहीत नाहीं म्हणत आहांत. संकटें तर समोर उभीं आहेतच. त्यांजबरोबर आपल्यासारखे अभयदातेही वेळींच भेट देत आहेत. मुनिराज, तुह्मांला कांहीं ठाऊक असो वा नसो, आतां माझी मुलगी येईल तिला उपदेशाच्या चार गोष्टी तरी सांगाल ना ? भविष्याची थोतांडें आपण सांगत नाहीं हे आमच्यावर मोठे उपकारच आहेत. आह्मांला भविष्यें नको आहेत. आज प्रसंग बिकट आला आहे. यावेळीं काय करावयाचें तें माझ्या मुलीला शिकवा.

**नारद**–राणीसाहेब, असें मन बावरूं देऊं नका–

**मालवी**—मन कसें बावरणार नाहीं? माझी मुलगी फिरून आली म्हणून मला आनंद व्हावा कीं दुःख व्हावें हेंच कळत नाहीं. तिच्या स्वागतार्थ जावें कीं न जावें हें निश्चित ठरवितां येत नाहीं. पुढें पाऊल टाकल्यास हृदय धडधडूं लागतें. अशुभ वार्ता तर ऐकूं येणार नाहींना अशीही शंका येऊं लागते. संकटकालीं पोटच्या गोळ्यासाठीं आईचे प्राण कसे तळमळतात, हें जी आई नाहीं तिला कळणार नाहीं. किती भय वाटत आहे म्हणून सांगूं महाराज? ती पहा—ती पहा आली. मुनिराज, मला आशीर्वाद करा—मला अभय द्या.

**नारद**—भिऊं नका राणीसाहेब. सुवार्ता नाहीं असेंच कांहीं मला म्हणतां येत नाहीं. [ सावित्री प्र. करते. ]

**मालवी**—ये मुली, हे पहा मद्वंशाचे कुलगुरु देवर्षि नारद येथें आले आहेत, त्यांना आधीं नमस्कार कर. [ सावित्री नमस्कार करिते. ]

**नारद**—मुलगी अझून कुमारी आहे वाटतें?

**अश्वपति**—होय मुनिराज, माझी मुलगी अझूनही कुमारीच आहे.

**नारद**—ही गेली होती कुठें आणि आतां आली कोठून? एवढ्या मुलीचें अझूनपर्यंत तुम्हीं कन्यादान कां केलें नाहीं?

**अश्वपति**—एवढ्याचसाठीं तिला पाठविलें होतें, आणि तिकडून तीही फिरून आली आहे. आतां गेली त्याप्रमाणें सफलकार्य होऊन आली कीं नाहीं तें आपणच तिला विचारावें. ये मुली, तुझ्या प्रवासाची सर्व हकीगत मुनिराजांना सांग. ये.

**सावित्री**—पितृवाक्य आणि देववाक्य दोन्हींही सारखींच आहेत. मुनिराज, बाबांच्या अनुज्ञेप्रमाणें मी पतिशोधार्थ निघालें होतें ती दैववशात् एका तपोवनांत जाऊन पोंचलें. शाल्यदेशचा द्युमत्सेन नांवाचा एक प्रख्यात राजा दुर्दैवानें अंध झाला, त्यावेळीं त्याचा मुलगा अगदींच लहान होता; अर्थातच राज्यरक्षणाला कोणी मालक नाहींसा झाल्यामुळें

शेजारच्या एका राजानें त्याला राज्यभ्रष्ट केलें. तेव्हांपासून तो त्याच तपोवनांत येऊन राहिला आहे. मुनिराज—

पद—[ मोरी इतनी अरज सुनें. ]

**मनिं तयासि वरिलें गति तेचि मला ॥**
**हृदयीं धरिला पती तो गमला ॥ धृ० ॥**
**सत्यवान साचा उदार मनाचा हो ॥**
**कां मन जावें कळे न ही कला ॥ १ ॥**

**मालवी**—आई जगदंबे, आज मद्रवंशाची लाज राखलीस.

**नारद**—द्युमत्सेनाचा मुलगा सत्यवान? त्याला पसंत केलें आहेस म्हणतेस! काय केलेंस हें सावित्री? हरहर! महाराज, नकळून सावित्रीच्या हांतून आज मोठा दोष घडला आहे!

**मालवी**—म्हणजे? सावित्रीनें काय केलें? अग दुर्दैवी पोरी! काय करून आलीस हें?

**अश्वपति**—कां मुनिराज, सत्यवान जांवई झाल्यानें आमच्या कुलीनतेला तर कांहीं बाध येत नाहीं ना?

**नारद**-छेछे मुळींच नाहीं-द्युमत्सेनासारखा कुलीन राजा दुसरा कोण आहे?

**मालवी**—तर मग?

**अश्वपति**—सत्यवान निर्बुद्ध आहे काय?

**नारद**—छे छे मुळींच नाहीं! सत्यवानासरखा गुणवान मुलगा साऱ्या त्रिभुवनांतही सांपडणर नाहीं.

**मालवी**—सत्यवान् गुणवान् आहे—कुलीन आहे असें जर आहे, तर त्याचें नांव सावित्रीनें सांगतांच आपण दुःख प्रदर्शित कां केलें बरें?

**नारद**—सत्यवानाचा बाप आणि आई दोघेंही मोठीं सत्याचरणी आहेत. मुलगाही तसाच सत्यभाषी आहे, म्हणूनच तेथील ऋषिमंडळीनीं त्याचें नांव सत्यवान असें ठेविलें आहे.

**मालवी**—तर मग महाराज त्याचा दोष तो काय?

**नारद**—सत्यवान इंद्रासारखा शौर्यशाली, बृहस्पतीसारखा बुद्धिवान, सूर्यासारखा तेजस्वी आणि पृथ्विसारखा क्षमाशील आहे.

**मालवी**—हे त्याचे दोष काय महाराज. असा नवरा मिळणें म्हणजे जन्मजन्मांतरीचें पुण्य असावें लागतें. मग माझ्या मुलीनें यांत दोष तो काय केला?

**अश्व०**—आपण केलेलें वर्णन कोणत्याही राजपुत्राला शोभण्याजोगें आहे.

**नारद**—तो तसाच आहे. गुणवान् तर आहेच पण सौंदर्यांतही श्रीविष्णूलाही लाजवील असा आहे!

**कालिंदी**—[ प्रवेश करून ] महाराज, या नारदमुनीच्या भाषणाकडे आपण काय म्हणून लक्ष्य देतां?

**मालवी**—ही कोण मुलगी?

**नारद**—सत्यवानासारखा सरळ स्वभावाचा मुलगा कुठल्याही राजकुलांत मिळणें शक्य नाहीं. त्याच्यासारखा नम्र तोच!

**कालिंदी**—सावित्री, तूं काय ऐकतेस या आगलाव्याचें! तुझी पसंती अगदीं योग्य आहे. या नारदमुनींची मध्यस्थी घ्यावयाला तुम्हांला कोणि सांगितलें? समविवाह झालेले यांच्यानें पाहावत आहेत कुठें? बिचारी पार्वती कित्येक वर्षें तपश्चर्या करीत हिमाचलावर बसलेली होती, तिला एका राख माखणाऱ्या पिसाट नवऱ्याच्या गळ्यांत बांधणारे तेच हे मुनिमहाराज! यांनां कधीं योग्य जोडपें जुळलेलें बरें का दिसणार आहे?

**अश्व०**—कोण मुली तूं?

**मालवी**—सावित्री, ही कुठली मुलगी? घाबरलेल्या मनाला थोडेंसें तरी सांवरून धरावयास याचवेळीं ही येथें कोठून आली?

**सावित्री**—आई, ही माझ्या पूर्वपुण्याईनें पाठवून दिलेली माझी बहीण—

**नारद**—ही मांडव्य ऋषींची धर्मकन्या, हिचें नांव कालिंदी.

**कालिंदी**—कां कळलावे महाराज, आगीची ठिणगी उडवून आतां स्वस्थसे बसलांत? ही पेटवलेली आग विझवायची नाहीं वाटतें?

**नारद**—तसें कसें करूं? सत्यवान् गुणवान् आहे खरा, पण त्याच्या ठायीं एक मोठा दोष आहे.

**मालवी**—कोणता दोष महाराज?

**नारद**—एकच दोष अनेक सद्गुणांना मातीमोल करून टाकतो—

**कालिंदी**—जशी तुमच्या या कळलावेपणानें तुमच्या सद्गुणांची मातीमोल केली आहे त्याप्रमाणेंच ना?

**अश्व०**—उगि रहा मुली. कोणता दोष महाराज?

**नारद**—आतां कसें सांगूं? हा दोष मोठा भयंकर आहे. महाराज, घाबरूं नका! राणीसाहेब, माझ्यावर मोठें संकट येऊन पडलें आहे! सत्यवान् तेजःपुंज आहे खरा, पण द्वितीयेच्या चंद्राप्रमाणें त्याचें हें तेज अल्प आहे. सावित्री, भयंकर चूक केलीस. सत्यवान अल्पायु आहे—

**सर्व०**—अल्पायु?

**नारद**—आजपासून बरोबर एक वर्षानें शिरोरोगानें सत्यवानाचा अंत होईल.

**मालवी**—हा दैवा!

**नारद**—असें आहे खरें! बिचारी वृद्ध आईबापें, त्यांतून आंधळा बाप—बिचाऱ्या आंधळ्याची काठी यमधर्म हिसकावून नेणार!

**कालिंदी**—कुणी धरून ठेवूं शकणार नाहीं म्हणतां?

**नारद**—अझूनपर्यंत तरी असें झालें नाहीं खरें!

**अश्व०**—सावित्री, सत्यवानाला वरण्याचा संकल्प सोडून दे.

**मालवी**—देवा, दररोज नवीं नवीं दुःखें माझ्यावर आणून टाकीत आहेस, असें पूर्वजन्मीं मीं कोणतें भयंकर पाप केलें होतें? आतां सहन तरी किती करूं! एवढ्या कष्टानें मिळविलेला घास तोंडांत जात अस-

तांना काढून घेतला जावा ना? धर्म गेला—पोटची पोरगी गेली—माया-ममतेची राखरांगोळी झाली!

**अश्व०**—सावित्री, एक वेळ माझी आज्ञा पाळलीस तशी आतांही पाळ. सत्यवानाला हृदयांतून काढून टाक.

**कालिंदी**—काय मुनिराज? आपलें देखील असेंच मत आहे काय?

**नारद**—अल्पायुषी मुलाला जाणून बुजून कन्यादान करण्याची संमति मी तरी कशी देऊं?

**कालिंदी**—तर मग मद्रवंशाच्या कुलधर्माची काय वाट? तीनच दिवसांत—नुसत्या तीनच दिवसांनीं सावित्रीला सोळा वर्षें पुरी होऊन जातील. बोला महाराज, धर्मलोप बरा कीं वैधव्य बरें?

**नारद**—धर्मलोप कां होईल? अझूनही वेळ आहे—अझून तीन दिवस आहेत. एवढ्या वेळांत सावित्रीला अनुरूप असे हजारों हजार राजपुत्र येथें उभे करतां येतील. त्यांतून सावित्रीनें स्वत:साठीं वर पसंत करून घ्यावा. स्वयंवराची चाल अझून कांहीं मोडली नाहीं.

**कालिंदी**—साऱ्या पृथ्वींत सत्यवानाखेरीज सावित्रीला दुसरा अनुरूप वर नाहीं!

**नारद**—ठीक आहे, पृथ्वींत नाहीं तर स्वर्गांत पाहूं. इच्छा केल्यास स्वर्गांतून इंद्रचंद्रादि सर्व देवतांना येथें आणून उभे करितों.

**कालिंदी**—त्यांतील एकही सावित्रीच्या पायाची धूळ झाडण्यास देखील पात्र नाहीं!

**अश्व०**—काय अभिमान हा! मुली, तूं काय बोलत आहेस तें तुला कळत आहे ना?

**कालिंदी**—या देवतांत ज्याचें चरित्र निष्कलंक आहे असा कोण आहे? इंद्र चंद्र या पवित्रतेच्या दीप्तिमान् मूर्तीसमोर एक क्षणभर उभें राहण्याचें तरी साहस करूं शकतील काय?

**अश्व०**—सावित्री, तूं स्तब्ध कां? जें काय बोलावयाचें असेल तें बोलून टाक, आतां मला विचार करावयास देखील वेळ नाहीं.

**सावित्री**—मुनिराज, जन्म आणि मृत्यु एका देहाला जसे एकच वेळ येतात तसेच हें संप्रदानही एकच वेळ होत असतें. व्हावयाचें तें होऊन गेलें. आतां शब्द मागें घेणें शक्य नाहीं.

**अश्व०**—आतां या संकटांत मी काय कारावें?

**सावित्री**—मन—महाराज—मन! बाबा, या सावित्रीच्या मनाकडे लक्ष्य द्या. स्वयंवराची चाल मुलीच्या मनासाठींच प्रचारांत आली. महाराज, मनासाठींच पोटच्या गोळ्याला दुसऱ्याच्या पदराला बांधतात. मनासाठींच मायेचीं आईबापें पारखीं होतात, मनासाठींच परकी माणसेंही आपलीं वाटूं लागतात. महाराज, या दुर्दैवी मुलीच्या मनाकडे पहा, आणि नंतर काय ती आज्ञा करा?

**अश्व०**—आतां मीं काय करावें मुनिराज!

**नारद**—प्रसंग मोठा कठीण तर खराच! मी तरी यांत काय सांगूं?

**सावित्री**—कां? प्रशस्त आणि अनंत विस्तृत असा धर्ममार्ग आपल्या डोळ्यांच्या समोर उघडा आहे; त्यांत कोठें काय अडथळे आहेत ते समजण्याइतकी दिव्यदृष्टी ईश्वरानें आपणांस दिली आहे. या अमर्यादित धर्ममार्गावर पाऊल टाकण्यासाठीं मला जी आज्ञा कराल ती प्रमाणें वागावयास मी तयार आहें. धर्माकडे लक्ष्य द्या, ईश्वरानें मनुष्याचें मन कसें घडविलें आहे तें पहा—पूर्व संस्कारापासून उत्पन्न होणाऱ्या परिणामांची आठवण ठेवा, आणि नंतर मुनिराज, जी काय आज्ञा करावयाची असेल ती करा.

**नारद**—सावित्री, तुला माझा नमस्कार असो. सतीच्या धर्मापासून तुला पराङ्मुख करण्याची माझी छाती नाहीं. महाराज, तुमच्या मुलीचें मन ढळविण्यास ब्रह्मदेव देखील समर्थ होणार नाहीं. हिला अनुरूप

असा पती सत्यवानाखेरीज दुसरा कोणीही नाहीं. आनंदानें हिचें कन्यादान करा. या संकटांतून हिला आतां स्वतः यमधर्मच सोडवो! महाराज मी जातों. [ जातो ]

**कालिंदी**—भिऊं नकोस सावित्री—या ब्राह्मण कन्येच्या वचनाला जर ईश्वराचा पाठिंबा मिळावयाचा असेल तर तुझा पती यमविजयी होईल, जा.


**मालवी**—धन्य मुली धन्य तूं! या संकटकाळीं आम्हांला धीर देण्यासाठीं प्रत्यक्ष सती पार्वतीच या रूपानें आली, असें मला वाटूं लागलें आहे. पण बाळे सावित्री, आतां पुढें तुझें काय होईल?

**सावित्री**—आई, तूं कांहीं भिऊं नकोस—

पद–[ शरणागत नाथजना. ]

अचला मतिनें वरिला भयाकुला न मति हे करिते मला ॥ धृ० ॥ संकट नाशानिं तनु ही नाशिन प्राणाची नच भीति मला ॥ सदय हृदय हरि करो सुफला तुझिया कुला ॥ १ ॥

अंक दुसरा समाप्त.



कालिंदी—तुझा पति यम-विजयी होईल !

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—आश्रम [ कालिंदी आणि सावित्री. ]

**सावित्री**—इतके दिवस होत आले—जवळ जवळ वर्षच होत आलें, पण या सुखाच्या संसारांत पुढल्या परिणामाच्या भीतीनें एक क्षणही समाधानाचा गेला नाहीं. देवर्षि नारदांची ती कठोर भविष्यवाणी प्रत्येक क्षणाला माझ्या कानांत प्रतिध्वनित होत असते. कालिंदी, त्यावेळीं माझी कशी स्थिति झाली होती तें तुला आठवतें ना?

**कालिंदी**—काय आठवायाचें? नारदमुनीनीं तें भविष्य सांगतांच तूं जी स्तब्ध झालीस ती दगडी पुतळीसारखी तशीची तशीच राहिली होतीस!

**सावित्री**—अझूनहि आठवण येतांच माझ्या अंगावर कांटा उभा राहतो! काय भयंकर स्थिति ती!—

पद—[ अष्टमीचा चंद्र शोभे. ]

**ज्ञानशून्या जाहलें मी कंपगात्रां स्तंभिता ॥ विषम-**
**चित्ता मधुनि जातां लहरि संतापान्विता ॥ धृ० ॥**
**हृदयसत्ता हो विमत्ता, शोणिताची प्रखरता । विश्वता**
**जाई दिगंता आत्मभाना विसरतां ॥ १ ॥**

**कालिंदी**—गेल्या गोष्टी आठवून आज ऐन प्रसंगाच्या वेळीं मन हताश कां करून घेतेस! वर्ष पुरें व्हावयाला आजपासून फक्त चारच दिवस राहिले आहेत—

**सावित्री**—चारच दिवस राहिले आहेत! त्या शुद्ध चतुर्दशीची आठवण होतांच सर्वांगाचें पाणी होऊन जातें! डोळ्यांवर काळोखी येते!

कालिंदी, ती भयंकर रात्र निर्विघ्नपणें जाईल असें माझ्या प्राक्तनीं लिहिलें आहे काय? नाहीं—मन म्हणतें—नाहीं! धर्मावरचा माझा विश्वास म्हणतो नाहीं! सर्वकाल हरीनाम उच्चारणारी नारदमुनींची वाणी खोटी होईल काय? नाहीं! खोटी होईल असें मनांत तरी कसें यावें! कालिंदी, तें भविष्य खोटें ठरेल असें सांगणारी कोणी व्यक्ति मला भेटेल काय?

**कालिंदी**—तर मग येत्या चतुर्दशीची रात्र निर्विघ्न जाणार नाहींच म्हणावयाची!

**सावित्री**—कधींही निर्विघ्न जाणार नाहीं!

**कालिंदी**—कालचक्राच्या या गतीचा रोध होणार नाहीं म्हणतेस?

**सावित्री**—देवर्षि नारद असें म्हणाले खरे!

**कालिंदी**—तेवढ्यवरच सर्व भरिभार टाकून तूं स्वस्थ बसणार आहेस तर?

**सावित्री**—तर मग मी काय करूं?

**कालिंदी**—मी तरी काय सांगूं? कालचक्राच्या धडक्यापासून आत्मरक्षणाचा उपाय सांगावयास जगाचें नियमन करण्याची शक्ति माझ्या अंगीं कोठें आहे?

**सावित्री**—उपाय—आत्मरक्षणाचा उपाय? अकाल मृत्यूच्या ग्रासांतून पतीला सोडविण्याचा उपाय?—असंभवनीय! कालिंदी, हें संभवनीय आहे काय? कालचक्राची गति फिरवतां येईल काय? मी अबला आहें. या भयंकर युद्धांत कालाशीं झगडण्यास मी पात्र आहें काय?

**कालिंदी**—अबला? अबला कशी? हातापायांत—किंवा नुसत्या मणगटांतच शक्ति असल्यास कुणि बलवान ठरत नाहीं! मानसिक बल म्हणजे काय बलच नव्हे?

**सावित्री**—काय म्हणतेस हें कालिंदी?

**कालिंदी**—शुंभनिशुंभांना जिनें मारिलें ती काय अबला नव्हती? तुझ्यासारखीच तीही! नुकत्याच उमलणाऱ्या फुलाच्या कळीसारखी एक

कोंवळी पोर होती! हिमालयावरील वाहणाऱ्या थंड वाऱ्यांत वनांतलीं फुलें उधळीत सौंदर्याच्या लहरींचे फवारे उडवीत हिंडणारी एक लहानशी मुलगी होती!

**सावित्री**—स्पष्ट बोल, कालिंदी, काय तें स्पष्ट बोल.

**कालिंदी**—त्या सजीव फुलाच्या सौरभानें शुंभनिशुंभांना भुरळ पाडली! ती कोंवळी कळी खुडून टाकण्यासाठीं दोघे भयंकर दैत्य धांवून गेले! त्यांना वाटलें—एवढीशी लहानशी पोर—जिचें शस्त्र काय तें सौंदर्य—एवढ्या अफाट वनांत एकटी—हें फूल आपल्या अंतःपुरांतील उद्यानाला शोभविण्यासाठींच उत्पन्न झालें आहे! अबलेचें बळ त्यांना ठाऊक नव्हतें! पण सावित्री, तुला ठाऊक आहे ना?—त्या एवढ्याशा पोरीनेंच शुंभनिशुंभासह सर्व दैत्यकुलाचा नायनाट केला! आणि आपण आपली हिमाचलावर बसलेली ती बसलेलीच! ती अबला नव्हती?

**सावित्री**—काय म्हणत आहेस हें कालिंदी?

**कालिंदी**—काय आणखी म्हणावयाचें? तुला सर्व कळत आहे. अज्ञान पांघरणाऱ्याची कशी समजावणी करावयाची? झोंपलेल्याला कोणी उठवील! पण तुझी जागी झोंप! देवर्षिंनीं सांगितले म्हणे! काय काय सांगितलें? अल्पायु जगला नाहीं—या पूर्वी असें कधीं झालें नाहीं—असेंच सांगितलें ना? यापुढें असें कधींही होणार नाहीं—असें नाहींना सांगितलें?

**सावित्री**—[ विचार करीत ] असें नाहींना सांगितलें! बोल कालिंदी, पुढें बोल.

**कालिंदी**—पुढें काय बोलूं? देवर्षींच्या वाक्यावर विश्वास ठेव—भविष्यावरहि विश्वास ठेव पण भविष्य काय तुझ्या हातांत नाहीं? भविष्यें जर खोटीं पडणार नाहींत तर व्रतें वैकल्यें कशाला—शांतिस्वस्त्ययनें कशाला? नियतीच्या आक्रमणाला पराभूत करण्यासाठींच कर्मयोगाची आवश्यकता

आहे! म्हणूनच नशीब आणि उद्योग यांचा झगडा सारखा चालत आला आहे!

**सावित्री**—काय म्हणतेस नशीबाशीं झगडा?

**कालिंदी**—हो—हो—यमाशी लढाई!

**सावित्री**—ठीक आहे. कालिंदी, आज तूं माझे डोळे उघडलेस—

पद—[ तूंही गरुवा लादे. ]

**येवो दशा जी येई। चिंतन खांति कशासि करूं। विरमे जीवन गमे, ये कृतांत, मति भ्रांत होई ॥ धृ० ॥ विधिच्या घरीं, विषमता, नयनजलानें कायती पुसे, कुणि ना शांतिदायी ॥ १ ॥**

**कालिंदी**—डोळ्यांतलीं आंसवें!—डोळ्यांतल्या आंसवांनीं काय होतें? नुसती रडण्याची लालसा मात्र वाढते. डोळ्यांतील आंसवांनीं डोळ्यांपुढील काळोखी मात्र अधिक भयंकर होते, आणि त्यामुळें विधात्याचा लेख मात्र जास्त ढळढळीत दिसूं लागतो. जाणून बुजून नारदमुनींचे भविष्य दूर ठेवून आईबापांची आज्ञा देखील अमान्य करून स्वतःच्या इच्छेच्या जोरावर तूं सत्यवानाला माळ घातली आहेस. इच्छापूर्वक अकालवैधव्य पदरांत बांधून घेतलें आहेस. आतां नुसता विचार करून काय करतेस?

**सावित्री**—आतां विचारच मुळीं करीत नाहीं, झालें ना? इकडे भविष्यवाणी आणि दुसरीकडे तुझ्यासारख्या सतीचा आशीर्वाद—या दोन महा शक्तींत झगडा लागणार म्हणायचा! मन सांगतें—सतीचा आशिर्वाद खरा होणार!

**कालिंदी**—असें तुझें मन सांगणार नाहीं तर सांगणार तरी कोणाचें? तूं तर सती कुलांतली मुकुटमणी! सतीत्व म्हणजे विधात्याच्या सर्व श्रेष्ठ भांडारांतील अतिशय उज्वल रत्न! फुटलें तर हें सांधत नाहीं! देवाचा

देवपणा गेला तरी फिरून मिळूं शकेल, इंद्राचें इंद्रत्व देखील त्यानें मिळविलें आहे! पण हें स्त्रियांचें हृदय—हें आमचें सतीत्व एकवेळ गेलें तर ब्रह्मांड विकल्यास देखील पुन्हा मिळणार नाहीं. असल्या ह्या महाशक्तीशीं इतर कसल्या तुच्छ शक्तीची तुलना करीत आहेस? तुझ्यासारखी सती तूंच! पण प्राक्तनाच्या जोरानें तुझ्या मनावर चिंतेचें आवरण पडलें आहे तें फेंकून दे! ब्रह्मदेवाचा लेख पुसून टाक, आणि स्वतःच्या इच्छेच्या जोरावर नशिबाचा घाट घडवून घे!

**सावित्री**—ही पहा मी तयार झालें.

**कालिंदी**—हें मात्र तुला उत्तम शोभतें! वैधव्य?—कोण देतें वैधव्य? कुठला आला आहे तो ब्रह्मदेव!—अभिमानानें त्याला मी आव्हान करितें! वैधव्य घेणें तर जिच्या तिच्या हातीं आहे! स्त्री जर स्वतः इच्छा करीत असेल तर तींविरुद्ध तिला वैधव्य देणें ब्रह्मदेवाच्यासुद्धां हातीं नाहीं!

**सावित्री**—झाला निश्चय! तुझ्या आशीर्वादाचें कवच पांघरून मी या युद्धाला सिद्ध झालेंच! त्रिरात्र व्रत तर घेतलेंच आहे! आतां पुढें काय होतें तें पहावयाचें!

**कालिंदी**—चल—पुढें हो! तुझ्या आज्ञेनें मृत्यूलादेखील थरकांप सुटेल! चल सावित्री—

पद—[ सांवलिया मन भायोरे बांको यार. ]

**सांवरि ये पति-नामातें राखीं प्राण ॥ धृ० ॥ धीर धरोनी अग्रसरा हो, साधि सुसंधि सुधेची ही, माझी आण ॥ १ ॥ भेरी वाजो जगतिं यशाची, तूंचि सती वसुधा-म्राती होई जाण ॥ २ ॥**

[ पडद्यांत सावित्री सावित्री. ]

**कालिंदी**—जा आतां तूं! तो पहा तुझा नवरा तुला शोधीत इकडेसच येत आहे! मी तुला आणखी जास्त तें काय सांगूं? तूं ज्ञानी आहेस? मी तुला शिकविणें शोभत नाहीं!

**सावित्री**—कालिंदी, तुं आज मला गुरु झालीस.

[ कालिंदी जाते व सत्यवान प्रवेश करितो. ]

**सत्यवान**—वा:! आम्हीं इकडे तुला शोधित हिंडत फिरावें आणि तूं मात्र इकडेस मैत्रिणींबरोबर गप्पा मारीत स्वस्थ बसावें हें चांगलें ना?

**सावित्री**—चूक झाली माझी. पण काय करूं? फार दिवसांनीं कालिंदी आज भेटली, तेव्हां घटकाभर बोलल्याशिवाय जर मी निघून आलें असतें तर तिला कसें वाटलें असतें?

**सत्यवान**—तो सनातनच मोठा मूर्ख आहे! त्यानें तरी आपल्या बायकोला अशी मैत्रिणीशीं गोष्टी करायला कां सवड द्यावी! अं:! हें काय! हीं डोळ्यांत आसवें कां? [ तिचे डोळे पुसतो.] पहा अं:, आतां हें रडें आटोप. नाहींतर मला देखील चार टिपें गाळावींशीं वाटतील! हें पहा सावित्री, मीं तरी काय कारावें? तूं सदोदित बाबांच्या सेवेला गुंतलेली असतेस—मला घटकाभर तुझ्याशीं भाषण करण्याची देखील सवड मिळूं नयेका?

**सावित्री**—असें कुणी कुठें म्हटलें? पण आज—[ रडूं लागते ]

**सत्यवान**—हें काय वेडे! आजच काय चालविलें आहेस हें! मी आल्यापासून पहात आहें—हळूच माझ्याकडे पहावयाचा प्रयत्न करितेस पण नजरानजर होतांच रडूं लागतेस! तुझी रोजची धीरवृत्ति आज काय झाली! हें काय? पुन्हां रडूं लागलीस—

**सावित्री**—काय सांगू! मला आज कसेंसेंच वाटत आहे. काय होतें तें मनालाच मुळीं कळत नाहीं—असें वाटतें—

पद—[ कंगनारे छुमछूमजात. ]

**कर गळां धरूनी करास । न विसंबावें या जिवास**
**हो ॥ धृ०॥ पाहोनियां मुखा, निश्वास सोडावे । त्याहिं**
**सकल आश्वास हो ॥ १ ॥ ठेवोनियां वक्षीं, हे गाल**
**न्हाणावे । लोल नयन जलदास हो ॥ २ ॥**

**सत्यवान**—वेडे आज तुला असें झालें आहे तरी काय?

पद—[ तक्कड तु तात धिमि—कानडा झंपा. ]

**सोडिसि निश्वास अविचलचि सुदती, चलमति, हारिलि कांति नयनसलिलिं, खंती परिहरित हृदयशांति उदासीन कां सती ॥ धृ० ॥ कमलदलिं शोभति, जलबिंदुचि, परि मना करि विकल शोभा, अशि अश्रुभा, सपदि हास्य वरोनि, विदित करिं संताप धरुनि शंका न होई प्रभावती ॥ १ ॥**

**सावित्री**—उगीच कशाला मनाला लावून घ्यायचें ते! केव्हां केव्हां हें मन असेंच माणसाच्या आटोक्याबाहेर बंडाळी करूं लागतें, आणि लगाम सुटलेला घोडा जसा स्वाराला तोंडघशी पाडतो तसेंच आपल्या धन्याला तोंडघशी पाडतें. तशीच काहींशी माझी स्थिति झाली आहे गडे!

**सत्यवान**—सावित्री, तूं खरी गृहिणी आहेस. आपल्या आश्रितांच्या नुसत्या पोटाचीच नव्हे—तर मनाची देखील किती काळजी बाळगित आहेस ही! खरें सांग, सावित्री, तूं आज अशी बिचकल्यासारखी कां झाली आहेस?

**सावित्री**—[ हंसण्याचा प्रयत्न करिते ] भलतेंच काहीं तरी! काय झालें आहे मला? ही जशी रोज असतें तशीच आहें.

**सत्यवान**—तूं हंसावयाचा प्रयत्न कर हवा तर—पण हंसतांना उन्हांत पडणाऱ्या पावसासारखें मागून रडें कोसळत आहे, त्याची काय वाट? हं समजलों! तुझें माझ्याशीं लग्न होऊन एक वर्ष झालें—[सावित्री दचकते ] काय झालें सावित्री?

**सावित्री**—कांहीं नाहीं—सहज माझा पाय घसरला!

**सत्यवान**—लग्न होऊन एक वर्ष झालें—[ पुनः दचकते ] हें काय पुनः हें?

**सावित्री**—एक वर्ष कुठें झालें ? एक वर्ष पुरें व्हायला अझून चार दिवस आहेत—चार दिवस आहेत—

**सत्यवान**—हें काय हें वेडे, असेंच करायचें असेल तर हा पहा मी चाललों.

**सावित्री**—नाहीं—आतां मुळींच नाहीं.

**सत्यवान**—बरें तर. एक वर्ष होत आलें तरी अझूनपर्यंत तुला माहेरीं पाठवितां आलें नाहीं—

**सावित्री**—आतां मी खरीच रागवेन बरें ! माहेरची गोष्ट मी कधीं काढली होती ?

**सत्यवान**—तूं कुठें काढलीस ? मींच हें सांगत आहें ना ? बायकांना नवऱ्याच्या घरीं कितीही सुख असलें तरी माहेरचा कावळा तरी भेटावासा वाटतोच. नाहीं ?

**सावित्री**—मला माहेरची कधीं आठवणसुद्धां झाली नाहीं. उगीच नसता आरोप कां आणायाचा तो !

**सत्यवान**—मग तूं अशी बावरली होतीस कां तें सांग पाहुं ? [ पडद्यांत—सत्यवान सत्यवान म्हणून सनातन हांका मारतो. ] हा आला सूड उगवावयाला !

**सावित्री**—[ स्वगत ] बरें झालें—सनातन भावोजी आले.

**सत्यवान**—सांग—सांग पाहुं आधीं ? [ पडद्यांत—सत्यवान—] हं—थांब आलों—सांग—तूं रडावयाचें कारण सांगितल्याशिवाय मी येथून मुळीं हालणारच नाहीं. [ सत्यवान सत्यवान— ] हं आलों. सांग सांग. [ सनातन येतो. ]

**सनातन**—वा: वा:—माझा ओरडून ओरडून घसा बसला—

**सत्यवान**—तुला कालिंदीनें पाठविलें वाटतें इकडे ?

**सनातन**—हो, कां ?

**सत्यवान**–तुला बायकोनें तोंडघशी पाडलें. नुसता तिच्या हातचें बाहुलें होऊन राहिला आहेस!

**सनातन**–आणि राजश्री, आपण काय करित अहांत? मवांपासून मी ओरडत आहें–

**सावित्री**–मी जातें. मामंजींच्या पूजेची वेळ झाली. [ जाते ]

**सत्यवान**–बरें–जा. छान सूड उगवला तिनें!

**सनातन**–तिनें? कुठल्या तिनें?

**सत्यवान**–तुझ्या तिनें–आतांच ती सावित्रीशीं बोलत उभी होती.

**सनातन**–मग? तिनें सावित्रीशीं बोलूं सुद्धां नये कीं काय?

**सत्यवान**–असें कुठें म्हटलें मीं? ऐकून तर घे. ती आतां बोलत होती इतक्यांत मी आलों, म्हणून सूड उगवण्याच्या इच्छेनें आमच्या भाषणांत विघ्न आणण्यासाठीं तिनें तुला पाठविलें.

**सनातन**–नुसता यःकश्चित् सूड उगविण्याठीं ती मला सोडील इतकी वेडी नाहीं. तिचा तसाच काहीं हेतु असेल.

**सत्यवान**–कसला हेतु?

**सनातन**– तिच्या मनांतल्या गोष्टी मी तिला कधीं विचारित नसतों. आम्हीं ब्राह्मणगडी. दुसऱ्याच्या मनावर ताबा चालवायाला क्षात्रियाच्या कुळांत जन्म घ्यावा लागतो.

**सत्यवान**–एकंदरींत तूं अगदीं तिच्या हातचें बाहुलें झाला आहेस म्हणावयाचें!

**सनातन**–मग? त्यांत वाईट तें काय झालें.

**सत्यवान**–स्त्रीच्या हातचें बाहुलें? असें होणें मला तरी अतिशय हीनपणा आणणारें वाटेल.

**सनातन**–कां वाटावें? पहा–

पद-[ शशि कीं कमल तसें.]

प्रकृती पुरुषयुगा, घडवि जगा । जग हें, प्रकृतिगत हेमनगा ॥ धृ० ॥ विहार विलास नरास न खास सदाहि उदास पुरुष दिसे । जलधर उदास विलसति अपगा । लसन्माया जाया-पुरुष, जशि गति उरगा तशि युवति जगा ॥ १ ॥

**सत्यवान**—पुरे झाली ही तुझी स्त्रीप्रशस्ति! बाबा माझी वाट पहात असतील. चल. पण हा इकडे चमत्कार पाहिलास काय ?

**सनातन**—कसला चमत्कार ?

**सत्यवान**—इकडे पहा—

पद-[ इंतपरा क्या नेणुमा. ]

ही चमके सान चांदणी । निज नीलकिरणीं ॥ धृ० ॥
व्यापि मेघ अंबर हें, धरी पाशिं निज प्रकाश, ।
भेदुनियां, हो अभया । चमकत ठेवि मेदिनी ॥ १ ॥

**सनातन**—ही पुरूषप्रशंसा झाली वाटतें ?

**सत्यवान**—चल—चल लवकर. [ जातात. ]

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—आश्रमांतील अंतरभाग.

[ शिवपार्वतीची पूजा करीत बसलेली सावित्री व द्युमत्सेन आणि शैब्या. ]

**द्युमत्सेन**—हें व्रत ग्रहण करण्याची परवानगी तुला देतांना मला किती संकट वाटलें, तें तुला सांगूं तरी कसें ! तूं नवऱ्याच्या कल्याणासाठीं व्रतें करण्यास सुरवात करावी आणि मी काय व्रताचा भंग कर म्हणून तुला सांगावें ! तरीपण तसें करणें आज भाग झालें आहे खरें ! तीन दिवसपर्यंत नुसत्या पाण्यालासुद्धां शिवली नाहींस ! काय भयंकर व्रत हें !

**शैब्या**—तीन दिवसच कां? चवथ्या दिवसाचा तिसराप्रहर देखील उलटत चालला! सोन्याची प्रतिमा लांकडाच्या बाहुलीसारखी दिसूं लागली! तूं जें हें व्रत पतकरलें आहेस तें आई जगदंबेच्या कृपेनें संपूर्ण होईल! ऊठ मुली! तुझ्या तोंडाकडे पाहिलें कीं मला नुसता थरकांप सुटतो! तीन दिवसांत काय तुझी दशा झाली ही! छे पहावतसुद्धां नाहीं. आई जगदंबे, माझ्या सावित्रीच्या जिवाला कांहीं अपाय होऊं देऊं नकोस!

**द्युमत्सेन**—परमेश्वरानें मला आंधळें केलें आहे—राज्याधिकार गेला, तसाच जगाला पाहाण्याच्या अधिकारापासूनही वंचित झालों! तरीही मुली, तुझी यावेळीं काय अवस्था झाली असेल ती माझ्या अंतःचक्षूपुढें मूर्तिमंत दिसत आहे. लग्न होतांच ज्यावेळीं पहिल्यानें सत्यवानासह तूं मला प्रणाम करावयास आलीस, त्यावेळीं जेव्हां आशिर्वाद देण्यासाठीं मी तुझ्या मस्तकावर हात ठेविला त्यावेळींच तुझ्या मूर्तीचा आभास माझ्यासमोर उभा राहिला! परंतु आज आशीर्वाद करण्यासाठीं मस्तकाला हात लावतांच सर्वांगावर कांटा उभा राहिला. पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राची कौमुदी द्वितियेच्या चंद्रप्रकाशासारखी क्षीण झाल्याचा भास झाला! मुली, असलें कठोर व्रत अंगिकारण्याची तुला कां इच्छा झाली?

**सावित्री**—उगीच मनाला वाईट वाटून कां घेतां? व्रतसमाप्ति व्हावयाला केवळ निश्चल उत्साहाची आवश्यकता असते. तशाच प्रकारच्या उत्साहानें मीं हें व्रत पतकरिलें आहे! आपल्या आशीर्वादानें उपवासामुळें होणारे यत्किंचितही कष्ट मला भासत नाहींत! [ मांडव्य प्रवेश करितो. ]

**शैब्या**—बरें झालें! मांडव्य ऋषि आले! तीन दिवसांच्या निराहार उपवासानें सावित्रीची काय दशा झाली आहे पाहिलीतना महाराज?

**मांडव्य**—देहदंडाखेरीज पुण्यसंचय होत नाहीं! आज सावित्रीचें हे कठोर व्रत तुम्हांला दुःसह भासत आहे खरें! तरीही पण पुढें यामुळें

जें कार्य होणार आहे, त्यामानानें झालेला देहदंड कांहींच नव्हे असें वाटेल! असा एक काल येईल कीं, भरतखंडांतील सर्व स्त्रिया एवढ्या व्रतापुरतें तरी सावित्रीचें अनुकरण करतील, आणि सावित्रीचें नांव चिरकाल अजरामर होऊन राहील!

**शैब्या**–पुढें काय व्हावयाचें असेल तें होवो पण आज तिची काय स्थिति झाली आहे ती पाहिलीतना? हिला या वेळीं आपण शांतिजलानें अभिषिक्त करावें असें मला वाटतें!

**मांडव्य**–सगळ्या स्त्रियांच्या जातीला शांति देणारी जी ही सावित्री तिला मी कसला अभिषेक करणार? तरीही पण मी एवढें करूं शकेन कीं–

पद–[ सुध बिसर गई आज. ]

**नभ सुतल सुरलोक वसुधाजलविहारी। हो देव सप्तऋ-**
**षि हिजला वरदकारी॥ धृ०॥ करुत शांति अवतीर्ण।**
**धीरा उदारा, सतिलागिं शुभकारी॥ १॥**

[ ऋषिकन्या खालील पद म्हणत कमंडलूनीं सावित्रीला अभिषेक करितात. ]

**ऋषिकन्या**— पद–[ श्रीश अंबिकेश सुखउत दंपतीस. ]

**गांग-वारी धौत करुं तुज ये विलोल॥ धृ०॥**
**हें सलिलकवच करु तनु सुकठिन तव॥ १॥**
**घे विजय परिहरुनि रिपु विधिबल हर॥ २॥**

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**–आश्रमाच्या बाहेरील भाग.

[ सत्यवान प्रवेश करितो. ]

**सत्यवान**–आज प्रभातकाळीं जीं कांहीं थोडीशीं फळें मीं जमा करून आणलीं होतीं, तीं सावित्रीनें ऋषिभोजनासाठीं खर्चून टाकलीं. आजचा

दिवस बिचारीच्या पोटांत फळाचा एक लहानसा तुकडा देखील गेला नाहीं! तीन दिवसपर्यंत ही स्थिति! आतां उद्यां—उद्यांहि जर हिनें कांहीं खाल्लें नाहीं तर ही जगेल तरी कशी? काय करावें? मलाही आतांच वनांत गेलें पाहिजे. संध्याकाळ होत आला. होमासाठीं एकही लांकूड शिल्लक नाहीं! पण हिला अशी टाकून कसा जाऊं! अहाहा!—

पद–[ भोर कहिं मिलन भैलवा. ]

**ही पतिनिरत साधुता, सरिता, प्रेमजलयुता, त्यागि जनता वनांत फिरतां ॥ धृ० ॥ शशिकर पुलकित करि जरि तेजें । पतीसाठिं धरि सतत म्लानता ॥ १ ॥**

[ सावित्री प्रवेश करते. ] हें काय? तूं यावेळी इकडे कुणीकडे?

**सावित्री**—मामंजी आणि सासुबाईंची जेवणें उरकलीं——

**सत्यवान**—आणि तूं?

**सावित्री**—मला पारणे फेडावयाला अझून थोडा वेळ आहे!

**सत्यवान**—काय हें सावित्री?

**सावित्री**—तीन दिवस जर असे गेले तर आणखी थोड्याशा वेळासाठीं उगीच खंत कसली बाळगावयाची?

**सत्यवान**—पतीच्या कल्याणासाठीं म्हणून तूं हें व्रत घेतलें आहेस, पण कार्यतः त्याचा परिणाम मात्र अगदीं उलट होत आहे? सावित्री, तुझे कष्ट पाहून मला सुख होईल काय? तुझें कांहीं बरें वाईट झालें तर माझे प्राण राहतील काय?

**सावित्री**—एवढ्या उपासामुळेंच का असें वाटतें? नुसत्या तीन दिवसांच्या उपासानें कां मला मरण येणार आहे?

**सत्यवान**—नाहीं सावित्री नाहीं. असली कठोर तपस्या या कोमल देहाला सहन होणार नाहीं. तुझें माझ्याशीं लग्न झालें तेव्हांपासून मी केवढ्या सुखांत आहें—केवढ्या आनंदांत आहें! राज्य गेल्याचें दुःख त्या

पूर्वी मला थोडेसें जाणवत असें खरें! पण तुझा सहवास मिळाल्यापासून स्वर्गाचें राज्यदेखील तुच्छ वाटूं लागलें आहे! तेव्हांपासून असें वाटूं लागलें आहे कीं—

पद-[ यन्न मरि बारेनु प्रिया. ]

**राहुं सुखदा या विपिनीं । इंद्रभुवन मानूं परिवर्तन ॥ धृ० ॥ दीनकांति शांतिमया । खंति केंवि मलिन जनीं वनिं विजनीं ॥ १ ॥ सान थोर घोर नाहिं । चोर जार वसत न कुणि दीन भवनिं ॥ २ ॥**

**सावित्री**—उगाच भय कां वाटून घ्यावयाचें तें! [ त्याच्या पायाला हात लावून ] या पायांचा जिला आश्रय मिळाला आहे, ती काय मरणाची इच्छा करील? अजून सासुसासऱ्यांची सेवा करण्याचा किती तरी उत्साह आहे! त्यांनींदेखील व्रताला अनुमती दिली, मग इकडेच कां वाईट वाटतें तें! राहुंदे तें—या संध्याकाळच्या वेळीं बाहेर कुणीकडे?

**सत्यवान**—अग्निहोत्रासाठीं एकदेखील लांकूड शिल्लक नाहीं!

**सावित्री**—तर मग गेलेंच पाहिजे खरें! मी पण येतें बरोबर.

**सत्यवान**—तूं?—तूं कशाला?

**सावित्री**—आज एकटेंच बाहेर जाऊं द्यावेंसें मला वाटत नाहीं!

**सत्यवान**—तें कां? आजपर्यंत असला भलताच हट्ट कधींही घेतला नाहींस, रस्ता किती बिकट आहे तें तुला माहित आहे काय? हे उद्यानांतील स्फटिकांचे मार्ग नव्हेत! हे अरण्यांतील खडकाळ रस्ते आहेत? बरें ज्या या नाजूक पायांना फुलांचे रेणुदेखील बोंचतात, ते पाय कांट्याकुट्यांतून कसे चालतील?

**सावित्री**—असे चालतील. [ चालून दाखविते. ]

**सत्यवान**—हें काय लचांड! हिनें तर अगदीं हट्टच घेतला! आतां नाहीं कसें म्हणूं?

**सावित्री**—नाहीं म्हणूं द्यायचीच नाहीं मुळीं!

**सत्यवान**—पण संध्याकाळ झाला ना?

**सावित्री**—म्हणूनच म्हणतें लवकर चलावयाचें! इकडे द्यावयाची ती कुऱ्हाड, मी अशी घेईन खांद्यावर? [ खांद्यावर कुऱ्हाड घेते. ]

**सत्यवान**—हें काय—हें काय? तूं तीन दिवसांची उपाशी आहेस ना?

**सावित्री**—असें काय पाहावयाचें तें तोंडाकडे? इकडचा भार हलका करतांना मला कांहींच का उल्हास वाटूं नये! आणि मी बरोबर येणार आहें ना? कधीं आलें होतें का यापूर्वीं? मग आज येत आहें त्याचा मला कांहींच का आनंद वाटूं नये? आणि आनंद झाला तर उपासाची आठवण तरी ती कुठली राहणार?

**सत्यवान**—ठीक आहे! वनांत येण्यानेंच जर तुला आनंद होत आहे—उपवासाचे क्लेशही त्यामुळें जर कमी वाटत आहेत तर मी तरी नको का म्हणूं? चल ये माझ्या बरोबर. पण थांब. बाबांची परवानगी घेतली आहेस काय?

**सावित्री**—तें माझें काम. [ पडदा उघडतो, द्युमत्सेन शैब्या आसनस्थ. ]

**द्युमत्सेन**—कोण बोलत आहे तें?

**सावित्री**—[ नमस्कार करून ] मी ती.

**शैब्या**—आपली सूनबाई ती.

**द्युमत्सेन**—किती क्षीण झाली आहेस मुली? रोजचा तुझा परिचित आवाज मला ओळखतांसुद्धां येईना. येथें काय करीत आहेस मुली?

**सावित्री**—आर्यपुत्र अग्निहोत्रासाठीं लांकडे आणावयास अरण्यांत जात आहेत.

**द्युमत्सेन**—या अपराण्हकालीं?

**सत्यवान**—सारीं इंधनें होमाला खर्च झालीं. तेव्हां सारी रात्र अग्निहोत्राचा अग्नी पेटत ठेवावयाला आश्रमांत एकडी काष्ठ नाहीं.

**द्युमत्सेन**—जातर—पण फार दूर जाऊं नकोस. आजच्या रात्री-पुरतीं तेवढींच घेऊन ये. उद्यांसाठीं उद्यां पाहूं.

**सावित्री**—[ नमस्कार करून ] माझी एक विनंती आहे.

**द्युमत्सेन**—विनंती! कसली विनंती मुली!

**शैब्या**—आणि विनंती करून नुसत्या आशीर्वादापलीकडे दुसरें कांहीं द्यावयाला आमच्याकडे आहेतरी काय?

**द्युमत्सेन**—तुला काय पाहिजे मुली?

**सावित्री**—येथें येऊन मला आज एक वर्ष झालें, एवढ्या अवधींत मी एकदांसुद्धां आश्रमाबाहेर गेलें नाहीं. अरण्यें कशीं असतात तीं मी अझून पाहिलीं नाहींत, तेव्हां परवानगी मिळाल्यास बरोबर जाईन म्हणतें. आज व्रताच्या उद्यापनाचा दिवस—तेव्हां स्वामींना टाकून मी एकटीच कशी राहूं?

**द्युमत्सेन**—राणी, सावित्रीनें येथें आल्यापासून आमच्याकडे कांहीं मागितल्याचें मलातरी कांहीं आठवत नाहीं.

**शैब्या**—नाहीं, मलादेखील आठवत नाहीं.

**द्युमत्सेन**—मग काय करावयाचें तर?

**सावित्री**—शास्त्रवचन असें आहे—

**शैब्या**—कसली हट्टी मुलगी आहे ही? ती परवानगी घेतल्यावांचून राहणार आहे?

**सावित्री**—शास्त्राज्ञा अशी आहे—

**शैब्या**—कशाला हवींत तीं शास्त्रें? जा तुझी इच्छा असल्यास जा. शास्त्रें तीं काय सांगणार? तुझ्यासारख्या पतिपरायणा साध्वीच्या तोंडून जें येईल तेंच शास्त्रवचन. कां महाराज, मुलीला परवानगी द्यावयाची ना?

**द्युमत्सेन**—जा मुली, मोठ्या आनंदानें तुला परवानगी देतों. सत्यवान, हिला नीट संभाळून घेऊन ये बरें! [ दोघें नमस्कार करून जातात. ] चल राणी, माझ्या सायंसंधेची वेळ होत आली. चल आपण आतां पंपातटाकीं जाऊं. ( जातात. )

---

## प्रवेश चवथा.

स्थळ—अरण्यांतील रस्ता.

[ सनातन आणि कालिंदी. ]

**सनातन**—असें आहे म्हणतेस? मुलगी मोठी धीराची खरी!

**कालिंदी**—तीन दिवसाच्या उपासानें काय स्थिति झाली आहे तें जर पाहिलें असतें, तर तिला द्यावयला उपमाच मुळीं सांपडल्या नसत्या.

**सनातन**—आणि हें तिला लग्नाच्यापुर्वीपासून ठाऊक आहे म्हणतेस? काय लबाड पोरगी तरी! सत्यवानाला या भविष्याचा तिनें मागमोससुद्धां लागूं दिला नाहीं!

**कालिंदी**—म्हणजे एक वर्षानें तुम्हीं मरणार असें तिनें नवऱ्याला सांगावें! आणि नवऱ्यानें मनांतल्या मनांत झुरून एक वर्ष देखील पुरें होऊं देऊं नये! असेंचना?

**सनातन**—बरें, तुलातरी हें केव्हां कळलें?

**कालिंदी**—तिला कळलें तेंव्हांच.

**सनातन**—आणि तूं अझूनपर्यंत मला तें सांगितलें नाहींस? बायकांच्या पोटांत कोणतीही गोष्ट गुप्त राहात नाहीं, असें म्हणणारे सर्व लोक अगदीं मूर्ख आहेत असें मला वाटूं लागलें आहे.

**कालिंदी**—इकडे सांगून साऱ्या जगांत असल्या अमंगळ भविष्याचा डांगोरा पिटवावयाचा वाटतें?

**सनातन**—तेंही खरेंच. माझ्या तोंडांत कांहीं राहात नाहीं खरें. आणि सत्यवानाकडेतर मी कोणतीही गोष्ट छपवून ठेविली नसती. ठीक आहे. आतां मी काय करावें म्हणतेस?

**कालिंदी**—सत्यवानाच्या आश्रमावर चांगली नजर ठेवा; त्याला भेटायचें नाहीं बरें का? पण कांहीं कमीजास्त असल्यास लगेच येऊन बाबांना कळवा.

**सनातन**—जशी राणीसाहेबांची आज्ञा. [ दोघें दोन बाजूंनीं जातात.]

---

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**—अरण्य.

[ सत्यवान आणि खांद्यावर कुऱ्हाड घेतलेली सावित्री प्र. क. ]

**सत्यवान**—काय झालें हें सावित्री? सारें अरण्य हिंडलों पण वाळलेलें एकही लांकूड सांपडलें नाहीं.

**सावित्री**—खरेंच—मोठें आश्चर्य खरेंच!

**सत्यवान**—एवढे श्रम करून शेवटीं रिकाम्या हातांनींच का घरीं परत जावयाचें?

**सावित्री**—तसें कसें होईल? अग्निहोत्राचें काम! लांकडें नेल्याशिवाय कसें चालेल?

**सत्यवान**—आतां या दाट अरण्यांत प्रवेश केला पाहिजे.

**सावित्री**—तसें केल्याखेरीज इलाजच दिसत नाहीं.

**सत्यवान**—पण सावित्री, काळोख पडत चालला!

**सावित्री**—[ भयानें ] घनदाट अरण्यांत जावयाला भय का वाटतें?

**सत्यवान**—राज्यभ्रष्ट झालों म्हणून सावित्री, क्षत्रियत्वालादेखील आंचवलों काय? मला भय वाटत नाहीं. पण ही तूं बरोबर आहेस—त्यावर ही कृष्णचतुर्दशीची रात्र—हें आधींच घनदाट अरण्य——येथें दिवसांदेखील प्रकाशाचा संभव कमी!—आणि त्यांतून हीतर रात्रीची वेळ!

**सावित्री**—पण मी आपल्याबरोबर आहें हें विसरावयाचें वाटतें! ललाटावर पौर्णिमेचा चंद्र बांधलेला असल्यास अमवास्येचें देखील भय वाटावयाचें नाहीं.

**सत्यवान**—ठीक आहे. चल तर. देवाचें नांव घेऊन या दाट जंगलांत प्रवेश करूं. [ तसें करितात. ] काय भयंकर काळोख हा! सावित्री, येथें कांहींच दिसत नाहीं.

**सावित्री**—कां बरें? मला तर चांगलें दिसतें आहे.

**सत्यवान**—छे नाहीं—मुळींच नाहीं—जसा कांहीं काळोखाच्या नदींत बुडालों आहें. काय झालें हें सावित्री! एकाएकीं कुठेंच कांहीं दिसेनासें झालें कसें?

**सावित्री**—सारखें एका नजरेनें झाडाकडे पाहात राहिल्यामुळें डोळ्यांवर काळोखी आली असेल! हे पहा डोळे पुसतें. आतां कसें वाटतें?

**सत्यवान**—आतां पुन्हां दिसूं लागलें—चांगलेंच दिसूं लागलें. ती पाहिलीस, समोरच्या झाडावर एक वाळलेली फांदी दिसत आहे!

**सावित्री**—असावीशी वाटते खरी?

**सत्यवान**—असावीशी कां? चांगली ढळढळीत दिसत आहे. जरा येथें थांब, मी ती तोडून आणतों.

**सावित्री**—काय सांगूं? जाऊंदिल्याखेरीज गत्यंतरच नाहीं म्हणूनच जाऊं देत आहें; नाहींतर कांहीं झालें तरी जवळची हाललेंसुद्धां नसतें. वेळ तर फार होऊन गेला.

**सत्यवान**—असें काय बरें हें? समोर डहाळी चांगली दिसत आहे. एका क्षणांत तोडून आणतों.

**सावित्री**—पहा बरें, जागा चांगली नव्हे, वेळही चांगली नव्हे—ही राक्षसी वेळा! जातांना संभाळून जावयाचें. झाडावर चढावें लागलें तर

सावकाश चढायचें. [स्वगत] संध्याकाळ होण्याच्यापूर्वी क्षितिजावर जशी धूसर छाया उत्पन्न होते, तशीच नाथांच्या चेहऱ्यावर कांहीं चमत्कारिक छाया येऊं लागली आहे काय?—

**सत्यवान**—ठीक आहे सावित्री, एक गोष्ट तुला विचारतों. केव्हांपासून विचारीन विचारीन म्हणत आहें, पण विचारूं कीं न विचारूं असें मनाला वाटत आहे.

**सावित्री**—काय तें विचारून टाकावें एकदां. मला विचारायाला शंका कसली?

**सत्यवान**—घराकडून निघाल्यापासून तूं सारखी माझ्या तोंडाकडे पाहत राहिली आहेस—

**सावित्री**—अं! एवढेंच ना?

**सत्यवान**—एवढेंच कां? आणखीही आहे. वनशोभा पहावयाची आहे असें तूं घराकडून निघतांना सांगितलें होतेंस. रस्त्यानें येतांना मी तुला किती नैसर्गिक शोभा दाखविली—झुळझुळ वहाणारी नदी, फुलांनीं ओथंबलेल्या वृक्षलता, माल्यवानासारखा पर्वतही दाखविला. तसाच तो अशोक—कुठला तो आठवतो ना? ज्याच्याखालीं तुला बसलेली पाहून मी वेडा झालों होतों तोही दाखविला. पण तुझें चित्त माझ्या बोलण्याकडे मुळींच नसल्याचें मला दिसून आलें. बावळ्यासारखी नुसती माझ्या तोंडाकडे पहात मात्र चालत होतीस; कां तें सांग पाहूं सावित्री?

**सावित्री**—कां तें काय सांगूं? वैशाखांतील एका मेघानें एका चातकीला असाच प्रश्न विचारिला होता. तो म्हणाला होता—पृथ्वीवर अनेक नदनद्या, सरोवरें असतांही तूं माझ्या तोंडाकडे कां पहात राहिली आहेस? चातकीनें काय उत्तर दिलें होतें तें मला ठाऊक नाहीं. तुम्हांला आहे का ठाऊक? सर्व शास्त्रें-काव्यें वाचलीं आहेत. आपण माझे गुरु—मी शिष्य! मला सांगाल का? काय सांगूं नाथ! जगतांत सर्वत्र सौंदर्य पसरलेलें असेल, पण—

श्लोकार्ध—[ भैरवी. ]

आपांहि तृप्ताय न वारिधारा ।
स्वादुः सुगन्धिः स्वदते तुषारा ॥

सत्यवान-गोड गोड बोलून मला भुलवून ठेवूं पाहतेस काय? सावित्री-

पद—[ सीतापति रामचंद्र रघुपति. ]

होई तव रूप रम्य तमपाथिं गतिदायी ॥ धृ० ॥ वचनाची तव माधुरि । स्खलित पदा मम सांवरि । नयन किरण-जाल करी । दीप्त दिशा दाही ॥ १ ॥ सहवासाचा सुवास । गुंगवि मज आसपास । पुनरपि ओढी मनास । तुजजवळी नेई ॥ २ ॥

सावित्री—तर मग लौकर जाऊन यावें.

सत्यवान—हा आलोंच पहा. [ जातो. ]

सावित्री—ही शेवटचीच भेट तर नव्हेना?—ती काळवेळा जवळ आली! हें माझें काळीज कसें धडधडत आहे, जीव खालीं वर होत आहे! हें अंधकाराचें जाळें चोहींकडे पसरलें आहे खरें, पण तें माझ्या प्राणेश्वराच्या जीवाला वेढून तर टाकणार नाहीं! आतां काय होणार आहे? आई दुर्गे—भवानी—जगज्जननी! तुझ्या नामस्मरणानें संकटें दूर होतात म्हणतात! पतीची मर्यादा राखण्यासाठीं एकाकालीं तूं जीवन-विसर्जन केलें होतेंस! तुझ्याखेरीज दुसऱ्या कोणाला माझें संकट सांगूं?—

पद-[ एंडि एंडि गारि गारि. ]

व्याल काल ये विशाल फणा उभवोनी। अति कराल जाल मला भिववीतें आई। त्वरित धांव घे विमानिं॥ धृ०॥ विकल हृदयिं धडधड अति, काय राहि संचितिं। चित्त होइ हें भयाण, शकुन गमति अपशकुनी ॥ १ ॥

सत्यवान—[ प्रवेश करितो ] सावित्री—सावित्री.

सावित्री—काय झालें नाथ?

**सत्यवान**–कुठें आहेस तूं?

**सावित्री**–ही मी येथेंच आहें ना?

**सत्यवान**–झालें–मी चाललों! [ खालीं पडतो. ] या मस्तकांतल्या वेदना, धर–सावित्री मला धरून ठेव. शेवटच्या घटकेला तरी तुला पाहावेंसें वाटलें होतें–छे कांहीं दिसत नाहीं–तेवढी आशा राहणार! सोन्यासारखा संसार–बाबा–आई–आतां तुझ्या स्वाधीन! सावित्री–सावित्री ऊं:!


[ निचेष्ट पडतो. ]

**सावित्री**–प्राणेश्वरा! नाथ ही मी येथेंच आहेना? झालें, संपलें! नारदाचें हेंच भविष्य–हाच तो दिवस, तीच ही वेळ, याच क्षणाला सर्व संपलें! काय झालें? मीं काय केलें? धरून ठेवूं शकलें नाहीं! शेवटीं निघून गेले–दासीला अरण्यांत एकटी टाकून निघून गेलांत ना? जीवितेश्वरा? बोला हो बोला? घरीं तुमची वाट पहात असतील! पाहिलात का हा काळोख? अशा वेळीं येथें निजून राहणें बरें का! ऐका–हीं ऐका श्वापदें ओरडत आहेत! हे पहा–हे पहा सर्प येथून चालले! या कोल्ह्यांच्या ओरडीनें मला भय नाहीं का वाटावयाचें? एकदां तरी सावित्री म्हणून हांक माराहो! क्षमा करा! दासीला क्षमा करा—

पद–[ कहे बानु दुखिया. ]

**पतिराया जाया ही धरि पायां, कशी राहूं, एकली मी,**
**अशा समया ॥धृ०॥ नच ठेविलें, कधिं मज विजनीं या।**
**कशि विसर पडे अशा समया ॥ १ ॥ नच बोललें, तरि**
**मज वदवीलें। वच नच वदतां, जरी समया ॥ २ ॥**

नाहीं! संपलें–सारी गति खुंटली! हे भगवन्, माझे नाथ मला फिरून मिळणार नाहीं का? आजन्म मी तुझी सेवा करीत आलें आहें! माझे नाथ ही तुझीच सेवा करीत असत! त्यांना अकाल मृत्यु परत दे–देवा जनार्दना, माझा प्राण मला परत दे! रे धर्मा या संकटांत तूं तरी मला आश्र-




**सावित्री**--हातांत पाश घेतलेले हे कोण ?

यदाता हो—हतभागिनीचा प्राण परत दे! [ यम प्रवेश करितो.] हे कोण? श्याम गौर वर्ण, रक्तवस्त्र नेसलेले, सूर्यासारखे तेजस्वी, हातांत पाश घेतलेले हे कोण? भयानें माझा सर्व देह कांपत आहे! आई जगदंबे, मला शक्ति दे—साहस दे [ यमाला उद्देशून ] आपल्या अलौकिक शरिराव-रून आपण कोणीतरी देवदूत असावेत असें मला वाटतें. महाराज, आपण कोण! येथें कां आलां आहां?

**यम**—सावित्री, तूं पतिव्रता आहेस—तपस्विनी आहेस, म्हणूनच माझ्याशीं तुला भाषण करतां येत आहे. घाबरूं नकोस. तुझ्या नव-ऱ्याचें आयुष्य संपलें. मी यमधर्म आहें. त्याचा प्राण काढून न्यावयाला आलों आहें.

**सावित्री**—भगवन्! जीवांना न्यावयाला आपले दूत येत असतात असा माझा समज होता—

**यम**—धर्मात्म्यांना न्यावयाला मी स्वत: येत असतों. सत्यवान धर्मात्मा होता. त्यांतूनही त्याला तुझ्या अंकाचा आश्रय मिळालेला; त्यामुळेंतर मलाच येणें भाग पडलें.

**सावित्री**—धर्मराज, कृपाकरून आपण मला दर्शन दिलेंत. ती कृपा असंपूर्ण ठेवूं नका. आपल्या चरणापाशीं मी पतीच्या प्राणाची भिक्षा मागत आहें—

**यम**—तें होणें शक्य नाहीं. सावित्री, मेलेला पुन्हां कधींही जिवंत झाला नाहीं.

**सावित्री**—धर्माची कृपा असली तर काय होणार नाहीं?

**यम**—हें नियतीचें कार्य आहे. कृपेचा येथें काय संबंध? बाळे! सत्यवानाचें मस्तक मांडीवरून खालीं ठेव!

**सावित्री**—माझा धर्म, माझें पुण्य, माझें आयुष्य—हवें तर माझे पंचप्राणसुद्धां घ्या—

**यम**—तुझा धर्म तुझा सोबती—जीवनपथांत तुझा धर्म तुझाच सहाय्यकर्ता! दुसरा कोणीही त्याचा वांटेकरी होऊं शकत नाहीं. जा—सत्यवानाची ममता सोडून घरीं निघून जा.

**सावित्री**—आतां मला घर आहे कुठें? आपण माझें घर मोडून घातलें! पुन्हां सांगते—धर्मराज! देवाधिदेव! दया करा—मला अकालीं पतिहीन करूं नका.

**यम**—मला निष्कारण अडथळा करूं नकोस सावित्री! पतीची आशा सोडून घरीं जा म्हणून मी तुला एकदां सांगितलें ना?

**सावित्री**—घरीं कशी जाऊं? अरण्यांत येतांना आंधळ्याची काठी बरोबर घेऊन आलें, आतां एकटी परत कशी जाऊं? तो वनवासी अंध राजा आमच्या पावलांची चाहूल ऐकत राहिला असेल! एकाचींच पाउलें ऐकतांच त्याच्या हृदयाचें पाणी पाणी होईल! एकटी कशी जाऊं? महाराज—एकटी कशी जाऊं? माझी अंधाची डोळ्यांची चांदणी कुठें आहे म्हणून त्यांनीं विचारिलें तर धर्मराज, त्यांना मी काय उत्तर देऊं तें तुम्हींच मला शिकवा. तुमच्या मुलाला मी यमाच्या हातांत देऊन आलें असें का सांगूं? दया करा धर्मराज, दया करा! आम्हां गरिबांचे सर्वस्व हिरावून नेऊं नका.

**यम**—सावित्री, भलतीच विनंती करून उगाच माझा वेळ मोडूं नकोस. या क्षणींच सत्यवानाला खालीं ठेव. मला विधिलेखनाच्या विरुद्ध जातां येत नाहीं. ललाटरेषेंतील अक्षरें अभेद्य आहेत!

**सावित्री**—ठीक आहे. तुम्हांला वाटेल तें करा! [सत्यवानाचें मस्तक खालीं ठेवून सावित्री उभी राहते. सत्यवानाच्या वक्षस्थलाला हात लावून यम त्याचे प्राण काढून घेतो आणि जाऊं लागतो. सावित्रीही त्याच्या मागोमाग जाऊं लागते.]

**यम**—तूं माझ्या बरोबर कुठें निघालीस? मागें फिर आणि सत्यवानाची

उत्तर क्रिया संपादन कर. जेथपर्यंत येणें संभवनीय तेथपर्यंत तूं आली आहेस. जा—याचा तुझा यापुढें कांहीं संबंध नाहीं.

**सावित्री**—जीवनांत असो वा मरणांत असो पतीला अनुसरणें हेंच पत्नीचें कर्तव्य आहे, असें आमचा सनातन धर्म सांगत आहे.

**यम**—माझ्याबरोबर येणें कांहीं तुला शक्य नाहीं.

**सावित्री**—जेथें माझे पती तेथें मी जाऊं शकणार नाहीं काय?

**यम**—तुझ्या पतीचा सूक्ष्मदेह मात्र माझ्या पाशांत बांधला गेला आहे. हा पहा त्याचा स्थूल देह—पक्षी उडून गेलेल्या पिंजऱ्या सारखा जमिनीवर पडला आहे. फिर, मागें फिर. देही जीवाला या मार्गानें जाणें असंभवनीय आहे.

**सावित्री**—माझे पती कोठें तरी जात आहेत, आपणही कुठेतरी जात आहांत, मलाही तेथेंच गेलें पाहिजे! हा झाला सनातन धर्म! तपस्या, गुरुभक्ति, पतिप्रेमव्रत आणि आपल्या कृपेचा प्रसाद माझ्या मार्गांतील विघ्नें दूर करील! दुसरी कोणी देवता असती तर मला आड आली असती, पण **धर्मराज** मला आड येण्याची तूमची छाती नाहीं!

**यम**—काय म्हणतेस? माझी छाती नाहीं?

**सावित्री**—होय—तुमची छाती नाहीं. हें शास्त्रवचनच आहे! धर्माच्या हातून काय अधर्म होईल? आपण जर माझ्या आड येणार नाहीं, तर अर्थातच तेहतीस कोटी देवतादेखील माझा मार्ग रुद्ध करूं शकणार नाहीं!

**यम**—वेडे पोरी काय बोलत आहेस हें?

**सावित्री**—माझ्या प्रिय वस्तूला जसें तुम्हीं आपल्या पाशांत बांधलें आहे, तसेच माझ्या पाशांत तुम्ही सांपडलां आहांत. माझ्या पतीनें जें धर्माचरण केलें आहे, त्याची सहधर्मिणी या नात्यानें मीही जें कांहीं केलें आहे, त्याच्या प्रभावानें आपल्या हांतील हे पाश पूर्णपणें जरी तुटले

नाहींत, तरीहि ठिकठिकाणी कांचून गेले आहेत. पण धर्मराज ज्या पाशांनीं मी तुम्हाला बांधून ठेविलें आहे, ते धर्माचे पाश अझूनपर्यंत आहेत तसेच मजबूत आहेत.

**यम**—काय बरळत आहेस पोरी ?

**सावित्री**—आणखींही ऐका. सात पाउलें तुमच्या बरोबर चालल्यास तुमची मैत्री संपादिली जाते, असें ऋषि सांगत आले आहेत. मीहि तुमच्याबरोबर सात पाउलें चाललें आहें. तेव्हां मित्राच्या नात्याला अनुसरून माझें भाषण शांतपणें ऐकत उभे रहा.

**यम**—ही आहे तरी कोण ? एका शब्दासरशी हिनें मला जागच्याजागीं खिळून टाकलें ! तेजस्विनी, तूं आहेस तरी कोण ?

**सावित्री**—सर्व देवतांत साधूंनीं धर्माला सर्वांत उच्च स्थान दिलें आहे. शास्त्र म्हणतें जेथें धर्म तेथें जय ! आणि आतां—आतां तुमच्या सहवासांत काय मला अपजय यावा ? धर्म नाहीं तर ब्रह्मचर्य नाहीं, धर्म नाहीं तर संन्यासहि नाहीं, गृहस्थाश्रमाचा धर्म हाच मूळमंत्र ! अशा या गृहस्थाश्रमांतील मी एक संन्यासिनी आहे ! आणि धर्माच्या बळावरच मी तम्हांला उभें राहण्याची आज्ञा करीत आहें !

**यम**—[ स्वगत ] हें काय ? माझी शक्ति गेली कुठें ? माझ्या सर्वांगाला कांपरें कां भरलें ? आतां या पोरीच्या हातून मी सुटणार तरी कसा ? छे ! आतां लालुच दाखविण्याखेरीज दुसरा उपाय नाहीं. [ उघड ] सावित्री, तुझ्या गोड भाषणानें मी फार संतुष्ट झालों आहें. वर माग—सत्यवानाच्या प्राणाखेरीज दुसरा वाटेल तो वर माग.

**सावित्री**—माझे सासरे अंध झाले आहेत. आपल्या कृपेनें त्यांना दृष्टी येवो !

**यम**—तथास्तु. जा आतां मागें फीर. [ कांहीं चालून ] हें काय ? अझून तूं माझ्यामागून येत आहेस ? तुला वर दिला ना ?

**सावित्री**–जेथें माझा पति तीच माझी गति! आपण जिकडे त्यांना घेऊन जात असाल तिकडेच मी येणार. जातां जातां मी एक गोष्ट सांगतें ती ऐका. पंडितांनीं साधुसंगाच्या महत्वाचें फार वर्णन केलें आहे! त्यांतूनही साधूंचा स्नेह! हें असलें भाग्य माझ्या नशिबीं होतें असें मला वाटलें नव्हतें! सत्पुरुषांचा समागम कधींही निष्फल होणार नाहीं!

**यम**–काय सांगत आहेस हें सावित्री?

**सावित्री**–आपण साधुतेची प्रतिमूर्ति–अर्थात निष्पाप, आपला सहवास हाच सनातन धर्म! याचें मला फळ मिळालें तर त्यांत कांहीं मोठें नवल नाहीं.

**यम**–सावित्री, आजपर्यंत तुझ्यासारखें भाषण मला कोणींहि ऐकिलें नव्हतें. तूं जसजशी बोलत आहेस तसतश्या मला आनंदाच्या उकळ्या येत आहेत. या माझ्या आनंदाचा तुला फायदा मिळाला पाहिजे. माग–सावित्री, सत्यवानाच्या जीवनाखेरीज वाटेल तो दुसरा वर माग.

**सावित्री**–माझ्या सासऱ्याला त्याचें राज्य पुन्हा मिळावें, आणि धर्मावर सदोदीत त्याची निष्ठा राहावी.

**यम**–तथास्तु. आतां मात्र जा. तुला दुसराहि वर दिलाना?

**सावित्री**–दिला खरा–आणि म्हणूनच मी आपली जन्माची आभारी आहें. पण धर्मराज, आपली आत्मतृप्ति देवतेला निवेदन केली पाहिजे ना? आपण यम अहांत, जें कांहीं करीत असतां तें सदोदित नियमाला वशीभूत होऊनच करितां, म्हणूनच आपलें नांव यम. सर्व भूतांचे ठायीं प्रेम, अनुग्रह आणि दान हाच साधूंचा सनातन धर्म! मनुष्यें प्रतिपक्ष्याच्या शक्तीच्या अनुरोधानें कोमल होतात, पण साधु शत्रूंवरदेखील दया करितात. आपण साधुश्रेष्ठ आहांत. तेव्हां दयाशीलता आपणास पारखी नाहीं.

**यम**—तहानेल्याला जसें पाणी, तसेंच तुझें मधुर आणि ज्ञानपूर्ण भाषण मला आनंद देत आहे. अझून तुझी इच्छा असली तर सत्यवानाच्या जीवनाव्यतिरिक्त तिसरा वर माग.

**सावित्री**—माझा बाप राजा अश्वपति पुत्रहीन आहे, त्याला शंभर सद्गुणी पुत्र होवोत.

**यम**—तथास्तु. अतां मात्र नाहीं हो!

**सावित्री**—माझी आणि माझ्या पतीची ताटातूट करणार काय? आपण स्वयमेव धर्मराज! सत्पुरुषांवर लोकांचा जितका विश्वास असतो तितका स्वतःवर देखील नसतो. आपण सत्पुरुष आहांत! शिवाय बराच वेळ मी आपल्याशीं भाषण करीत आहें, आपणही माझ्याशीं बोलत आहांत. अर्थात शास्त्रवचनाप्रमाणें आपलें माझें आतां नातेंच जुळून आलें आहे. आपल्या नातेवाइकावर आपलें किती प्रेम असतें बरें! प्रेमाच्या माणसाला त्याच्या मर्जीविरुद्ध कुणि कधीं दूर लोटून देईल काय?

**यम**—[ स्वगत ] छे! या मुलीच्या हातून सुटणें फार कठीण दिसतें! हिला मागें फिरविण्याची शक्ति माझ्या अंगीं तरी नाहीं. ही काय अबला! हिच्या तीव्र दृष्टीचा आघात देखील माझ्यानें सहन करवत नाहीं. किती युक्त्या काढते, किती तर्क लढवते,—ज्ञानाच्या गोडगोड गोष्टी सांगून हिनें मला पूर्णपणें पराभूत केलें आहे. मी हिच्या हातचें बाहुलें तर झालों नाहीं ना? कांहीं कळत नाहीं. मी इकडे असा हा घोटाळ्यांत पडलों आहें, पण ही पहावी तीं आपली शांत आणि गंभीर! आतां काय करावें? हिच्या हातून कसें निसटावें? [ उघड ] सावित्री, आतां अगदीं शेवटचेंच—माझ्यानें तुझा हा स्नेह मोडवत नाहीं. आणि म्हणूनच मी पुन्हा वर द्यावयाला तयार झालों आहें. सत्यवानाच्या प्राणाखेरीज चवथा वर माग.

**सावित्री**—केवढी भाग्यवती मी? आपल्या कृपेला अयाचित पात्र होण्याची योग्यता माझ्या अंगीं कुठें आहे? पण ज्याअर्थी आपण प्रसन्न झालां अहांत त्या अर्थी—

पद—[ ललत ख्याल. ]

**द्या वरदान हें, शतसुत हो मला, जे जगीं थोर शौर्याहिं ॥**
**॥ धृ० ॥ नृपकन्या विफला ती, पुत्र प्रसवे न जी । व्हा**
**थोर वरद सुतदानिं ॥ १ ॥**

**यम**—ठीक आहे. हा वर मात्र अगदी अगदीं शेवटचा. पहा सावित्री, तुला शंभर पुत्र होण्याचा वर दिल्यावर तरी तूं मला जाऊं देशील ना?

**सावित्री**—अगदीं त्या क्षणींच.

**यम**—सावित्री, सूर्यासारखे तेजस्वी असे शंभर पुत्र तुला होवोत.

**सावित्री**—धर्मराज, हा पुन्हा माझा प्रणाम घ्या. [ प्रणाम करिते ]

**यम**—ईश्वर तुझें कल्याण करो. [ पळत जातो, सावित्रीही त्याच्या मागून पळत जाते. ]

अंक तिसरा समाप्त.

## अंक चवथा.

### प्रवेश पहिला.

स्थळ–अरण्यांतील रस्ता.

[ मांडव्य आणि सनातन प्र. क. ]

**सनातन**–केव्हांपासून शोध करीत हिंडत आहें, पण या एवढ्या मोठ्या अरण्यांत दोघांपैकीं कुणाचाहि अझूनपर्यंत पत्ता लागला नाहीं. हें मोठेंच आश्चर्य आहे! कोंपरान कोंपरा धुंडाळून पाहिला तरी, कांहींच मागमूस लागूं नये म्हणजे काय! महाराज, तुम्हांला कांहीं आशा वाटते काय?

**मांडव्य**–आशा? काय म्हणतोस हें सनातन? आशा हा शब्द अगदींच फोल आहे? ज्या तरुण दंपत्याच्या मस्तकावर आज शांतिजलाचा अभिषेक झाला आहे—ज्या सावित्रीला सर्व ऋषिमंडळानें अखंड सौभाग्याचा आशिर्वाद दिला आहे, त्यांच्या एका रोमाला तरी धक्का लागेल काय? आशिर्वाद दिल्यापासून दुसऱ्या घटकेला त्यांचा काय सर्वनाश होईल? काय म्हणतोस सनातन? मिळणार नाहीं? पृथ्वीनें जर त्यांना आपल्या पोटांत लपविलें असेल, तर सप्तपाताळापर्यंत पृथ्वि फोडून त्यांना शोधून आणूं! समुद्रानें जर त्यांना गिळलें असेल, तर अगस्ति ऋषिप्रमाणें एका आचमनांत समुद्र निःशेष करून टाकूं? यमानें जर त्यांवर आकालीं घाला घातला असेल, तर एका निश्वासासरशीं यमाच्या विस्तीर्ण नगरींची राखरांगोळी करून टाकूं! म्हणजे पुढें कुणालाच यमाच्या घरीं जावयास नको! मिळणार नाहीं? मिळणार नाहीं म्हणजे काय?

**सनातन**–रिकाम्या हातानें परत जावें लागूं नये म्हणजे झालें! आम्हीं घरीं परत आलों असें कळतांच बिचारा अंधळा राजा आणि म्हातारी राणी धांवत पळत माझ्याकडे येतील. आणि आपला मुलगा आणि सून कोठें आहे म्हणून विचारतील! त्यावेळीं महाराज, मी त्यांना काय उत्तर देऊं?

**मांडव्य**–तूं निश्चित रहा. सावित्री सत्यवानाला घेतल्याशिवाय आतां परत फिरावयाचें नाहीं. जरूर पडली तर यमनगरींतही प्रवेश करूं!

**सनातन**–म्हणतां काय बाबा?

**मांडव्य**–पूर्वी एकदां अपराधी नसतांनाही मला शूळीं दिलें होतें, त्यावेळीं दाद मागण्याकरितां मला यमाकडे जावें लागलें होतें. आतां सावित्रीच्या सौभाग्यासाठीं पुन्हां एक वेळ यमापुढें जाऊन उभा राहीन.

**सनातन**–[ इकडे तिकडे पाहून ] बाबा–बाबा!

**मांडव्य**–काय आहे सनातन?

**सनातन**–झालें–शोधाचें काम संपलें! सारेंच आटोपलें!

**मांडव्य**–सारें संपलें?

**सनातन**–हा पहा, सत्यवानाचा प्राणहीन देह येथें धूळींत पडला आहे!

**मांडव्य**–आं! आणि सावित्री कोठें आहे?

**सनातन**–तीतर येथें कुठेंच दिसत नाहीं! मला वाटतें पतिवियोगानें वेडी होऊन भटकत भटकत कुठेंतरी गेली असेल! हाय हाय! मित्रा काय केलेंस हें? सर्वांना टाकून असा अकालीं कसा निघून गेलास?

**मांडव्य**–काय करीत आहेस हें सनातन? तूं ऋषिकुमार! तूं काय असें रडत बसावयाचें? लोकांना मार्ग दाखविणारे ऋषिच जर अज्ञानाचें पांघरूण घेऊन रडत बसले, तर अजाण लोक दुःखांच्या वेळीं काळजें फोडून घेतील! चल ये, आपण सावित्रीचा शोध करूं.

**सनातन**—आतां तिला कोठें शोधावें?

**मांडव्य**—दुःखानें वेडी होऊन आसवें गाळीत जाणारी सावित्री नव्हे. जाणून बुजून एका अल्पायु तरुणाला जिनें माळ घातली ती काय दुःखानें बेहोष होईल? सनातन, तूं सावित्रीला ओळखलें नाहींस?

**सनातन**—तर मग तिनें काय केलें असावें बरें?

**मांडव्य**—काय केलें असेल म्हणतोस?—

**पद**—[ यूतीं सहज आज. ]

**पाहोनि असुहीन। पतिलागिं ये मरण।**
**सोडील हें भुवन। तेजस्विनी ती ॥ १ ॥**
**झाला विहग मुक्त। पिंजर पडे रिक्त।**
**ती व्याध अनुसरित। ज्या प्राण हातीं ॥ २ ॥**

**सनातन**—तर मग आतां पुढें काय करावयाचें?

**मांडव्य**—तूं येथेंच सत्यवानाच्या देहाचें रक्षण करीत बैस. पुढें काय करावयाचें तें मी करीतों.

**सनातन**—जशी आज्ञा. [ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—आश्रमासमोरील रस्ता.

[ द्युमत्सेन आणि शैब्या प्रवेश करितात. ]

**द्युमत्सेन**—कुठली मला ही बुद्धी झाली! संध्याकाळच्या वेळीं भयंकर अरण्यांत जावयास मी परवानगी तरी कशी दिली! राज्य गेलें, डोळेही गेले, आतां आंधळ्याच्या काठीसारखा एक मुलगा होता तोहि गेला काय? राणी! मी हें काय केलें? यःकश्चित लांकडें तीं काय, आणि त्यांच्यासाठीं भरल्यारात्रीं मुलाला भयंकर अरण्यांत पाठविलें

काय! शेजारच्या ऋषींच्या आश्रमांतून लांकडे मागवून आणण्याची बुद्धि त्यावेळीं मला कशी सुचली नाहीं!

**शैब्या**—आपणच असा धीर सोडलात तर मी तरी काय करावें? मला तर चोहोंकडे काळोख दिसत आहे!

**द्युमत्सेन**—आणखी कसला काळोख! माझे डोळे जाऊन जरी सगळाच काळोख झाला आहे, तरीहि प्रत्यक्ष दिसणारीं सर्व दुःखें मला जाणवत आहेत. परमेश्वरानें कृपा करून सावित्री आणि सत्यवानरूपी दोन डोळ्यांचे तारे मला दिले होते. दोघांच्याही मस्तकांवर हात ठेविल्यास सगळ्या ब्रह्मांडांतलें अपूर्व सौंदर्य माझ्या समोर उभें राहत असे. राणी! आपण होऊन माझ्या हातानें मीं माझे दोन्ही डोळे उपडून किंग काढले. हां—ऐक ही पहा, कुणाची तरी चाहूल आली! कोण—कोण तें? बाळा सत्यवाना, आलास?

**शैब्या**—कोण तें? सावित्री आली वाटतें. [ कालिंदी येते ].

**कालिंदी**—नाहीं आई, मी ती कालिंदी.

**शैब्या**—कालिंदी, पहा मी काय केलें तें! हंसत हंसत सावित्रीला सत्यवानाबरोबर पाठवून दिली. हरगौरीसारखीं दोघेंहि रस्त्यावर प्रकाश पाडीत निघून गेलीं! आणि आतां मी देखील आंधळी झालें काय?

**द्युमत्सेन**—काय झालें तें सर्व मला दिसत आहे—माझ्या दिव्य नेत्रांसमोर सगळें ढळढळीत दिसत आहे! चार दिवसांची उपवासी मुलगी—नुसती अर्धमेली झालेली—नुसती मनाचा उल्हासानें आपल्या नवऱ्याबरोबर निघाली! बिचारीचा दुबळा देह, चालण्याचे श्रम तिच्यानें सहन करवले नाहींत! समजलें—कालिंदी, आतां मला सर्व समजलें. प्रत्येक गोष्ट माझ्या डोळ्यासमोर दिसत आहे! बिचारी पोरगी धुळींत पडली असेल! पतीच्या पायांवर मस्तक ठेवून घरच्या मार्गाऐवजा तिनें स्वर्गाचा मार्ग सुधारला असेल!

**कालिंदी**—पतीच्या पायांवर मस्तक ठेवून जर तिला मृत्यु आला असेल तर तिच्यासारखी भाग्यवती दुसरी कोण आहे? अशा अलौकिक तीर्थाच्या ठिकाणीं जिला मृत्यु येतो तिच्यासाठीं दुःख कसलें करावयाचें? आपले चिरंजीव तेवढे सुखरूप परत घरीं यावे म्हणजे झालें!

**द्युमत्सेन**—कालिंदी, सावित्रीशिवाय सत्यवान जिवंत राहील असें तुला वाटतें काय? माधवी सुकतांच सहकारही सुकून गेला असेल! झालें! माझी आवडती बाग उध्वस्त झाली!

**कालिंदी**—असा धीर सोडूं नका महाराज. माझे बाबा माझ्या पतीसह त्यांना शोधण्यासाठीं अरण्यांत गेले आहेत! ते परत येईपर्यंत तुम्हीं धीर धरून रहा.

**शैब्या**—आजपर्यंत या दुर्दैवी माणसांचें तुम्हींच रक्षण करीत आलां आहांत. आतां या भयंकर प्रसंगाच्या वेळींही तुमच्याखेरीज आम्हांला दुसरा कोणाचा आधार आहे?

**द्युमत्सेन**—आंधळा झालों, राज्य घालवून बसलों, आणि बालवत्सा-स्त्रीला बरोबर घेऊन तुझ्या बापाच्या आश्रमांत आलों. मोठ्या प्रेमानें आम्हांला जवळ करून असे हे वनवासी बनविलें. तूं कालिंदी, कुठूनशी एक सोन्याची पुतळी आणून माझ्या मुलाच्या पदरीं बांधलीस! भविष्यकालाचें गोंडस चित्र दाखवून या वार्धक्यांत आम्हांला पुन्हा संसारी बनविलेंस! तें सुंदर चित्र शेवटीं ते कुठल्या कुठें वितळून गेलें!

**कालिंदी**—भिऊं नका महाराज! माझ्या मनांत अझून कसलाही विकल्प येत नाहीं! भ्यावयाचें कांहीं कारण आहे असें मला मुळींच वाटत नाहीं.

**शैब्या**—दे मुली दे! अभय दे! या प्रसंगीं आम्हांला अभय दे!

**कालिंदी**—उगीच कां घाबरतां आई? सावित्रीनें त्रिरात्र व्रत केलें आहे! त्या व्रतयज्ञाचा होता माझा यमविजयी पिता! तसेच हे सर्व

साधुशिरोमणी ऋषि माझ्या पित्यासह त्या यज्ञांत व्रती झाले होते. यज्ञ तर निर्विघ्न पार पडला! या सर्व ऋषींनीं तुमच्या सुनेला अवैधव्याचा आशीर्वाद दिला. हे ऋषि सामान्य नव्हेत! भविष्यकालीन कलियुगांतील नामधारी महर्षि नव्हेत! त्यांचा आशीर्वाद काय निष्फळ होईल? आजच व्रताचें उद्यापन झालें, आणि—

पद–[ विनतिसि या न अवमाना. ]

**सुखजल–सेक जो झाला। ऋषिकरिं घडला, विरल जनांला।**
**बलवति बाला, तेणें काला॥ सेक जो झाला ॥ धृ० ॥ त्या-**
**जलिं भिजल्या अलककलापा। सिक्त केशिं कर टाकिल कां॥**
**स्पर्शु तयांना, यमहि शकेना। मति ठेवा या कालीं अचला॥ १॥**

**द्युमत्सेन**–[ एकदम दचकून उभा राहून ] हें काय झालें–हें काय झालें? भगवंता हें काय झालें?

**कालिंदी व शैब्या**–काय–काय झालें महाराज?

**द्युमत्सेन**–मला दिसूं लागलें! राणी माझी दृष्टी आली! हें सुंदर जग मला पुन्हा दिसूं लागलें! राणी–होय तूंच राणी किती वृद्ध झालीस ही? आणि ही?–ही कालिंदी, ऋषिकन्ये तुला मी नमस्कार करितों.

**शैब्या**–काय म्हणत अहांत हें महाराज?

**द्युमत्सेन**–पहा–हें पहा मला आतां दिसूं लागलें!

**कालिंदी**–हा त्या सतीचाच प्रभाव! महाराज, खरोखर सती पार्वतीच तुमच्या घरीं चालून आली आहे. त्रिरात्र व्रत करून पार्वतीसारखीच आज ती तुम्हांला शांतिदात्रि झाली. आतां भय कसलें आहे?

**द्युमत्सेन**–सुंदर!–सुंदर!–चोहोंकडे सर्व सौंदर्यच दिसत आहे! पण राणी, वीस वर्षांपूर्वी ज्या मनोमोहिनी मूर्तीला पाहतांना माझ्या डोळ्यांची तृप्ति होत नसे, तीच काय तूं ही शैब्या? कीं नुसती तिची छाया? आणि ही कालिंदी!–आहाहा!–ही मांडव्यकन्या कालिंदी! जिचे

गोड शब्द ऐकून माझ्या हृदयांत मधुमय सौंदर्य नाचत असे–आहाहा! त्याहींपेक्षां ही किती तरी सुंदर! आतां किती बोलूं? आणि पाहूं तरी किती? आहाहा! भगवंता, धन्य तूं!

**कालिंदी**–आणि आपली सून? अशा शंभर कालिंदी जरी एक ठिकाणीं केल्या तरी तिच्या सौंदर्याच्या शतांशाच्या पासंगालाहि पुरणार नाहींत! महाराज! तुमची दृष्टि आली! ज्या लहान अर्भकाला तुम्हीं पाहिलें होतें, तो आतांचा दिव्य देहधारी सत्यवान तुम्हांला पाहावयाचा आहे ना? त्याच्याजवळच सूर्याच्या प्रभेसारखी सती सावित्री तुम्हांला पाहावीशी वाटते ना? चला आपण हरगौरीचें जोडपें पहावयास जाऊं.

**शैब्या**–देवा, माझ्या पतीला जसे डोळे दिलेस, तसाच डोळ्यांचा ताराही केव्हां देणार आहेस?

**कालिंदी**–पण या अरण्यांत हे कोण दरबारी मनुष्य इकडे येत आहेत?

**अमात्य**–[ प्रवेश करून ] महाराजांचा जयजयकार असो!

**द्युमत्सेन**–कोण अमात्य? वीस वर्षांनीं तुम्हांला आपल्या राजाची आठवण झाली काय?

**अमात्य**–महाराजानीं दुःखावर डाग उगिच कशाला द्यावा? हीं वीस वर्षें आम्ही कशा दुःखांत काढलीं हें एक परमेश्वरालाच ठाऊक! पण आज त्याचें चीज झालें! महाराजांना दृष्टि आल्याचें पाहून मला जो आनंद होत आहे, त्या आनंदांत भर टाकण्यासाठीं ही सामुग्री मी आणली आहे त्याचा स्वीकार व्हावा. [ राजमुकुट आणि राजवेष पुढें ठेवितो ]

**शैब्या**–हें काय अमात्य? हा तर राजमुकुट!

**अमात्य**–आपलें राज्य बळकावणारा राजा एकाएकीं मृत्युमुखीं पडल्यामुळें सर्व प्रजा हा मुकुट पुन्हां धारण करण्याची महाराजांना विनंती करीत आहे.

**द्युमत्सेन**—डोळे आले!—पुन्हां राज्य मिळालें!—हा राजमुकुट आतां मी धारण करणार काय?—आतां कशाला हवा मला राजमुकुट! माझ्या मुकुटाचा मणीच हरपल्यावर हा असला मुकुट घेऊन मी काय करूं? जा अमात्य, जसा आणलात तसे हा मुकुट घेऊन परत निघून जा.

**अमात्य**—महाराज, असें काय करीत आहेत हें!

**कालिंदी**—थांबा अमात्य, आतां सर्व कांहीं आपोआप दिसून येईल. महाराज, निष्कारण दुःख कशाला करतां? सुचिन्हें कधीं दुश्चिन्हांचीं दर्शक असतात काय? आतांपर्यंत ज्या गोष्टी घडून आल्या त्या सर्व आपोआपच घडून आल्या असें तुम्हांला वाटतें काय? यांत दैवी शक्तीचा कांहींच का हात तुम्हांला दिसत नाहीं? उठा महाराज—चला राणीसाहेब—या अमात्य, मी तुम्हांला तुमचे युवराज आणि युवराज्ञी दाखवितें. [ सर्व जातात ]

---

## प्रवेश तिसरा.

[ यम आणि त्याच्यामागें थोड्या अंतरावर सावित्री. ]

**यम**—सुटलों एकदांचा! त्या खट्याळ पोरीच्या हांतून सुटेन असें मला वाटलें सुद्धां नव्हतें. बापरे! काय पेंचांत सांपडलों होतों! आणखी थोडा वेळ ती जर घासघीस करीत राहिली असती, तर सत्यवानाचा प्राण माझ्या हातून सुटला असताच म्हणायचा! एकंदरींत पोरगी गोड खरी! तिनें कांहीं मागितलें तर नाहीं म्हणावेंसें वाटतच नसे, पण काय करावें? जगाच्या नियमाला अनुसरून असल्या साध्वीची देखील नवऱ्यापासून ताटातूट करणें भाग पडतें. खुळी रे खुळी! मुलाची लालूच दाखवितांच असली हट्टी पोरगी देखील नवऱ्याला विसरली, आणि ती संधी साधून मीं देखील पळ काढला.

**सावित्री**—[ हळूच पुढें येऊन ] धर्मराज, या स्थानाचें नांव काय?

**यम**—आं !!!

**सावित्री**—या स्थळाच्या रमणीयतेनें मला अगदीं भुरळ पाडली आहे! कुठल्या तरी पूर्वी न पाहिलेल्या सुंदर प्रदेशाच्या जवळ आल्याचा भास होऊन मला फार आनंद होत आहे. इथला वारा गोड, लता गोड, वृक्ष गोड—जिकडे तिकडे जसा कांहीं माधुर्याचा सडाच घातला आहे! रस्त्यावरची धूळसुद्धां माधुर्यानें माखलेली! धर्मराज, आपण कोठें आलोंत हे?

**यम**—आधीं तूं येथपर्यंत आलीस कशी? हें स्थान मनुष्यांना अगम्य आहे.

**सावित्री**—ज्याला धर्माचें सहाय्य आहें, जीवन मार्गांत धर्म ज्याचा-सोबती आहे, त्याला साऱ्या त्रिभुवनांत अगम्य असें स्थान कुठें आहे?

**यम**—पण तूं मला सोडून दिल्याचें कबूल केलें होतेंस ना सावित्री?

**सावित्री**—मग आतां मी तुम्हांला कुठें बांधून ठेविलें आहे? तुम्हीं आपण होऊनच आपली सुटका करून घेत नाहीं त्याला मी तरी काय करूं? आपण ज्ञानी आहांत—सांगा पाहुं—माझा मार्ग कुठें आहे तो?

**यम**—राजकन्ये, आतां एक पाऊलही पुढें येऊं नकोस. मागें फीर. थोड्या वेळांत तुझ्या डोळ्यांवर काळोखाचें एक महा भयंकर आवरण पडेल, आणि तूं मला पाहूं शकणार नाहींस. इतकेंच नव्हे तर तुझी तुला ओळख राहणार नाहीं. चोहोंबाजूंनीं रस्ता बंद होऊन भयंकर संकटांत मात्र पडशील. मागें फीर—मागें फीर. तुला मित्राच्या नात्यानें म्हणून सांगत आहें कीं, मागें फीर. एक क्षणमात्र वेळ लावूं नकोस.

**सावित्री**—आपण यम, पण स्वतः नियमांचा भंग करून नांवाची सार्थकता नष्ट करीत आहांत. धर्मराज, यावेळीं मी माझ्यासाठी तुमच्याबरोबर आलें नाहीं—जगाच्या कल्याणासाठीं मला येणें भाग पडलें आहे. साऱ्या जगाचा पाया धर्मावर—तोच जर ढांसळला

तर एका घटकेंत विश्वाचा विध्वंस होईल. एवढ्यासाठीं तुम्हांला तुमच्या स्थानावर पुन्हां बसविण्यासाठीं मी येथपर्यंत आलें आहें.

**यम**—म्हणजे? मी स्थानभ्रष्ट झालों आहें काय?

**सावित्री**—यांत काय संशय? आपण मला शंभर मुलगे होण्याचा आशीर्वाद दिला, आणि आपणच माझ्या नवऱ्याला घेऊन चाललां? एकदां वर देऊन प्रतिज्ञेवर खोटें काम करणें हें काय धर्माचें लक्षण? आपण यम आहांत—सदोदित नियमाधीन आहांत. तुम्हींच आम्हां सर्वांना नियम लावून दिले आहेत आणि आतां ते तुम्हींच मोडतां? आपण मला जो वर दिला तो कांहीं भुलथापीनें दिला नाहीं. माझ्या पुण्याईच्या जोरानें तुम्हांला वर द्यावयास भाग पाडलें आहे. म्हणून मित्रत्वाच्या नात्यानें मी तुम्हांला सांगतें कीं—

पद–[ झंपा भूप. ]

**धर्मपालन जरी राहणें तव करीं। द्या पतिप्राण तरि फिरुनि मजला ॥ ना तरी हे पुरी वर्ज झाली तुम्हां कोण अडवावया पाहुं सजला ॥ कुठें चाललां हे असे धर्मराया। असुनि प्रतिकार मी दृढ कराया ॥ १ ॥**

**यम**—आं! तूं कोण आहेस? प्रत्यक्ष धर्माला ज्ञान शिकवणारी तूं आहेस तरी कोण? माझे डोळे उघडण्यासाठीं तूं आपण होऊनच हें संकट आपल्यावर ओढून घेतलेंस काय? देवी, सूर्याजवळ जसा काजवा फिका पडतो तसें तुझ्यासमोर माझें ज्ञान लटपटूं लागलें आहे. यम-धर्माचे डोळे उघडविण्यासाठीं त्याच्या नगरीच्या द्वारापर्यंत येणारी तूं आहेस तरी कोण?

**सावित्री**—मी सत्यवानाची आवडती पत्नि आहें. माझ्यामुळें तुमचें अस्तित्व! धर्मराज, तुम्हांला जर पुन्हां आपल्या अधिकारावर आरूढ होण्याची इच्छा असेल तर आधीं माझा गौरव राखा.

**यम**—आई—सती सावित्री, जगतांत सतीच्या महिम्याचा प्रसार करण्यासाठीं—पुरुष प्रकृति रूपानें सृष्टीचें संरक्षण करण्यासाठीं मी ही तुझी चिरंतन सामग्री—हा तुझा पति तुला अर्पण करीत आहें. महा सती! तुला माझा प्रणाम असो!

**सावित्री**—मी किती दूर आलें आहे ही?

**यम**—सावित्री, हें मृतसंजीवनी नगरीचें महाद्वार आहे. कृपाकरून जशी येथपर्यंत आलीस तशीच माझी ही नगरी अवलोकन करून जा. [ मोठा आवाज होऊन यम नगरी दिसूं लागते. ]

**सावित्री**—आहाहा!—किती सुंदर देखावा हा!

**यम**—सावित्री, ही पहा समोर तप्त जळानें सळसळणारी वैतरणी नदी! तीवर हा पहा मायासेतु. त्याचे रंग कसे बदलत आहेत पाहिलेंस ना? ज्यावेळीं एखादा पुण्यात्मा येथें येतो त्यावेळीं या सेतूवरील मार्ग फुलांनीं फुलून निघतो. ज्यावेळीं एखादा पापात्मा येतो त्यावेळीं त्याच्या पापाला अनुसरून सेतूचीं निरनिराळीं रूपांतरें होतात. तो पहा—तो पहा सुवर्णमय झाला! पुन्हां पहा फुलून निघाला! आणखीहि पहा, शेषाच्या असंख्य जिव्हांच्या ज्वाला सारख्या भयंकर अग्नीच्या ह्या पहा धगधगीत ज्वाला निघूं लागल्या! आतां पुढें पहा, ह्या प्रवेश द्वारावर काय लिहिलें आहे तें पहा "जीवा! येथें विचार करण्याचा अवकाश नाहीं" ह्या महाद्वाराच्या पलीकडे कांट्यानें फुललेला रस्ता आहे. त्या रस्त्यानें जाण्याचें सर्वांनां धाडस होत नाहीं. जे जातात ते स्वर्गाला जातात, पण जे विचार करण्यासाठीं मागें सरकतात ते आगीनें सळसळणाऱ्या पाण्यांत खालीं पडतात, आणि शेवटीं अनेक कालपर्यंत नरककुंडांत पचत राहतात! [ देखावा नाहींसा होतो ] सावित्री, आतां पुढें प्रहरभरच रात्र राहिली. नगरींत प्रवेश करण्याची आतां मला परवानगी दे.

**सावित्री**—जशी आपली इच्छा. [ यम तेथल्या तेथेंच गुप्त होतो ] आतां पुढें? देहभान विसरून यमाच्या मागें धांवत धांवत आलें खरी, पण आतां मागें कसें फिरावयाचें? गुरुदेव! तुम्हीं कुठें आहांत? या संकटांत तुमच्याखेरीज मला कोण सोडवील? या भयंकर काळोखां-तून मला मार्ग कोण दाखवील? कुठें आहां गुरुदेव! धांवा धांवा.

**मांडव्य**—[ भूगर्भांतून ] कुठें आहेस सावित्री?

**सावित्री**—ही मी येथें आहें. गुरुदेवा! धांवा लवकर. कुठें आहांत ते धांवत येऊन मला दर्शन द्या. [ "भिऊं नकोस, भिऊं नकोस" असें म्हणत मांडव्य भूगर्भांतून वर येतो ]

**मांडव्य**—भिऊं नकोस सावित्री भिऊं नकोस! हा मी आलों पहा. कुठें आहे सत्यवानाचा प्राण?

**सावित्री**—अंजली पुढें करावी गुरुदेव—

**पद**—[ अब न जगायो प्यार मैका. ]

**विधिकर लिखन कठोर भालीं, जीवनसम मम हृदयनाथ, मरणिं निरत, यम परि हरी, अदयतम ॥ धॄ० ॥ जीवनकुसमा, परत फिरवि यम, तुमचि हेचि सुकृपा । स्वकरिं असु घ्या शुभकालीं ॥ १ ॥**

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—द्युमत्सेनाचा आश्रम.

[ अश्वपती आणि मालवी प्रवेश करतात. ]

**मालवी**—हें काय महाराज? सावित्री कुठें आहे? सत्यवानही कुठें आहे? राजाराणी ही कुठें दिसत नाहींत? कालिंदी आणि मांडव्य ऋषिहि कुठें दिसत नाहींत? आश्रमांत तर कुणींच नाहीं! ही कृष्णच-तुर्दशीची रात्र! जिकडे तिकडे भयंकर काळोख! आतां जावें तरीं कुठें?

**अश्वपती**—घाबरूं नको राणी. एक वर्षभर या संकटाला तोंड देण्याची तयारी करण्याचा जो अभ्यास चालविला होता, त्याची आयते वेळीं माती करूं नकोस! धीर धर आणि संकटाला तोंड देण्यास तयार हो.

**मालवी**—नका हो असें बोलूं! मीं तुमच्या पायां पडतें. माझा जांवई जिवंत आहे असें मला सांगा. माझ्या सावित्रीच्या सौभाग्याचा टिळा कायम आहे असेंच सांगा.

**अश्वपती**—असें कसें सांगूं? नारदमुनींचें भविष्य कसें खोटें होईल?

[ तुंबरू आणि अश्विनी प्रवेश करितात. ]

**तुंबरू**—कधींहि नाहीं. देवर्षि नारदांचें वाक्य कधींहि खोटें व्हावयाचें नाहीं. कसें अश्विनी?

**अश्विनी**—नाहींच व्हायचें मुळीं.

**मालवी**—चांडाळणी काय बोलते आहेस हें?

**अश्विनी**—[न ऐकतां तुंबरूला] एक वर्ष झालं तरी देखील या माळें-तल्या फुलांतल्या पांकळ्या कशा टवटवीत आहेत पाहिल्यात ना?

**तुंबरू**—वाऱ्याबरोबर फुलांचा वास तरी किती गोड येत आहे म्हणून सांगूं! जशी कांहीं आंतांच खुडून आणलेलीं!

**अश्विनी**—रानांवनांतून उन्हांतान्हांतून सारखीं फिरत आहोंत, तरी देखील माळ आपली जश्शीच्या तश्शीच!

**तुंबरू**—आणि तूं देखील जश्शीच्या तश्शीच! उन्हातान्हांतून वण-वण फिरल्यानें तुझ्या अंगावरचें एक मुठभर मासतरी कमी व्हावयाचें होतें! पण नारदमुनींचें वाक्य कधिं खोटें व्हावयाला पडलें आहे?

**अश्वपती**—तुंबरू, अश्विनी, तुम्हीं काय बोलत अहांत हें?

**तुंबरू**—आतां बोलाबोली करावयाला मुळींच वेळ नाहीं महाराज. आतांपासून गळागळी. ताईसाहेब जेव्हां एकदां ही माळ वराच्या गळ्यांत घालतील तेव्हांच आमचा जीव थंड होईल.

**अश्वपती**—अरे हतभाग्या, कुणि तुला ही भलतीच आशा दाखविली?

**तुंबरू व अश्विनी**—मुसळदेवतेनें!

**अश्वपती**—कुठली मुसळदेवता?

**अश्विनी**—वराच्या गळ्यांत घालण्यासाठीं ताईसाहेबाकरितां आम्हीं माळा गुंफीत होतों, इतक्यांत खांद्यावर मुसळासारखें कायसेंसें घेऊन एक जटाधारी बुवाजी तेथें आले. त्यांनीं बरोबर एक वर्षानें ही माळा घेऊन येथें यावयास सांगितलें आहे.

**तुंबरू**—ताईसाहेबांच्या नवऱ्याला आज यमाच्या घरीं कसलेंसें निमंत्रण आहे. तेव्हां जेवणें खाणें आटोपून ते तिकडून परत येतील आणि ताईसाहेबांना जवळ घेऊन बसतील. इतक्यांत पटकन् जाऊन आम्हीं ही माळ ताईसाहेबांच्या हातांत देऊं.

**मालवी**—तुंबरू, खरें सांग—तुला मी मोठें बक्षीस देईन—तुला नारदमुनींनीं काय सांगितलें तें इत्थंभूत मला सांग. सावित्रीचा नवरा जिवंत आहे ना?

**तुंबरू**—जिवंत आहे कीं अझूनपर्यंत यमाच्याच घरीं आहे कीं वडाखालीं आहे तें मला कांहीं सांगतां यावयाचें नाहीं. हे पहा समोरून बुवाजी येताहेत. ज्यांना त्यांना "भिऊं नको भिऊं नको" असें सांगावयाची ह्यांना संवयी आहे, यानांच विचारा म्हणजे ते तुम्हांला अभय देतील. [ मांडव्य येतो ]

**मालवी**—मुनिराज—मुनिराज तुमच्या दर्शनासाठीं आमचे प्राण कासावीस होत आहेत.

**अश्वपति**—मुनिराज, दासाचा हा प्रणाम घ्यावा.

**मांडव्य**—राजा अश्वपति, राणी मालवी, तुम्हीं आलांत हें ठीक झालें! तुम्हांला आपल्या मुलीला पाहावयाचें आहे ना? जांवयाला पाहावयाचें आहे ना? या तर. यमधर्माच्या हातून मृतपतीचा प्राण

खेंचून आणणाऱ्या आपल्या मुलींचें वैभव पाहा या. स्वर्गीय तेजानें उज्वल झालेल्या सत्यवानाशेजारीं स्वतःसिद्ध दैदिप्यमान सती सावित्री कशी शोभत आहे पहा.

**मालवी**—हें खरेंच सांगत आहांत ना?

**मांडव्य**—मी खोटें कां सांगेन?

**अश्वपति व मालवी**—भगवंता, तुझी लीला अतर्क्य आहे!

**मांडव्य**—चलावें महाराज. तुंबरू, तूं स्तब्ध कां? माळा कुठें आहेत? माळेसाठीं तुझ्या ताईसाहेब तिष्ठत बसल्या आहेत; अश्विनी, तूं उगीशी कां?

**अश्विनी**—हं महाराज, थोडीशी उगिच राहिलें आहें खरी! म्हटलें, यमाच्या घरून वर आला तर यमदूत वऱ्हाडी आले नसतील ना?
[ सर्व जातात आणि सिंहासनावर सावित्री, सत्यवान, समोर मांडव्य, दोन्ही बाजूला अश्वपती, मालवी, द्युमत्सेन, शैब्या, सनातन, कालिंदी, आणि तुंबरु व अश्विनी असा देखावा दिसतो. ]

**कालिंदी**—कसें काय सावित्री, शेवटीं युद्धांत कुणी जिंकलें? विधिलेखनाचें खंडन होत नाहीं असें अझून देखील वाटत आहे काय? तसें जर असतें तर व्रतें वैकल्यें जगांत अझून शिल्लक राहिलीं असतीं काय? भगवंतांनीं स्वतःच्या मुखानें कर्माची एवढी प्रशंसा कां केली असती? या जगतांत कर्मच एक बलवान्—

**श्लोक**—[ भैरवी. ]

**कर्मणा जायते जन्तुः कर्मणैव प्रलीयते।**
**सुखम् दुखम् भयम् क्षेमम् कर्मण्येवाभिपद्यते॥ १॥**

**सावित्री**—हा सर्व तुझ्या आशीर्वादाचा प्रभाव! दुसरें काय?

**मांडव्य**—सावित्री, असाधारण अध्यवसाय, अविचलित उत्साह, गुरुभक्ति, पतिप्रेम आणि व्रतनियमादिकांच्या द्वारें तूं जें आज हें अलौकिक कार्य घडवून आणिलेंस त्याचें फल अनंत—कालपर्यंत भोगित रहा.

शतबंधूंची भगिनी हो, शतपुत्रांची जननी हो. कुठेंही, कशीही, कोणत्याही स्थितींत असलीस तरी तूंच गीता—तूंच गायत्री, तूंच सावित्री! धर्मरक्षणासाठीं जननी, भगिनी, कन्या आणि सहधर्मिणीच्या रूपानें तूं या भरतखंडांत अवतीर्ण हो. तुझ्या कृपेनें संसारांत जिकडे तिकडे आनंदी आनंद होवो. पतिसाठीं पवित्र कर्तव्याचा उदय होऊन तुझ्या आशीर्वादानें विषयलालसांतर्गत प्रणयाचीं खुळीं सोगें भरतभूमींतून नाहिंशी होवोत.

**सर्व**—तथास्तु!!

[ पडदा पडतो. ]

**चवथा अंक समाप्त.**

## भरतवाक्य-

पद-[ आम्हां सकलां शिव दे देवाजी. ]

धात्री शुभदे वरदे सावित्री माते । गीता गायत्री तूं सदये शम दे सकलांतें ॥धृ०॥ क्लांत जाहले प्रणयें जन हे, अचला भक्ती कोठें आहे ? । वरदकरे, विकास-निकरे । पाहुनियां हें येइं जगतीं, दे तव हस्तें युवतिजनांतें सरला मती रती श्रीकांते ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय.

श्रीयुत भार्गवराम विठ्ठल वरेरकर यानीं लिहिलेलीं नाटकें.

## संगीत कुंजविहारी.

सर्व महाराष्ट्रांत शेंकडों प्रयोग होऊन अत्यंत लोकप्रिय झालेलें हें पौराणिक नाटक प्रो. चिंतामण गंगाधर भानु यांच्या प्रस्तावनेसह छापून तयार आहे. नाटकांतील प्रसंगास अनुसरून घेतलेले अकरा सुंदर फोटो या पुस्तकांत घातले आहेत. किं. १ रुपया. टपाल खर्च निराळा.

## संगीत संजीवनी.

कच देवयानी आख्यानावर पौराणिक कथाभागाला कोणत्याही रीतीनें न दुखवितां लिहिलेलें हें नवीन नाटक लवकरच सचित्र छापून तयार होईल. प्रस्तुत नाटक विद्याहरणापूर्वी दोन वर्षे रंगभूमीवर आलेलें आहे.

## संगीत सरस्वती.

विषयविपासू अलकाला वीट येईपर्यंत विषयोपभोगाची परमावधि करून देऊन वैराग्यशील बनविल्याचें अत्यंत हृदयंगम चित्र, सरस्वतीच्या प्रेमाची पराकाष्ठा, आणि पतिसुखासाठीं तिनें केलेला अहेतुक आत्मत्याग दाखविणारें हें नाटक लवकरच सचित्र छापून तयार होईल.

पत्ता–१ वैश्य मासिक कचेरी गिरगांव नं. ४

२ नानाराम वामन सोहनी, नाट्यविनोद संगीत मंडळी.

३ बाळकृष्ण लक्ष्मण पाठक, बुकसेलर मोतीबाजार—मुंबई.